# माणूस

शनिवार । १३ मे १९७८ । ७५ पैसे


## दीनदयाळपुरम्....

आंध्र वादळग्रस्तांच्या पुनर्वसनात दिल्लीच्या दीनदयाळ शोधसंस्थेच्या कार्यकर्त्यांनी आघाडी मारली. अल्पावधीत एक नवे गावच त्यांनी उभे केले —दीनदयाळपुरम्.

येत्या आठवड्यात अटलबिहारी वाजपेयी यांच्या हस्ते गावातील घरांच्या उद्‌घाटनाचा कार्यक्रमही योजण्यात आलेला आहे.

रचनात्मक विचारांचे समन्वय केंद्र म्हणून काम करणाऱ्या या दीनदयाळ शोधसंस्थेची माहिती 'माणूस'ने यापूर्वीच वाचकांना सादर केलेली आहे. ( दीनदयाळ स्मृति–विशेषांक, २२ ऑक्टोबर ७७ ) या संस्थेचे काम आता सर्व प्रांतातून झपाट्याने विस्तारत आहे.

नानाजी देशमुख या संस्थेचे प्रमुख आहेत.

महाराष्ट्रातही सुरुवात म्हणून चालू आठवड्यात एक समिती या कामासाठी स्थापन झाली आहे. ५ मे चा पुण्याचा दीनदयाळ तिकिटविक्री समारोहाचा कार्यक्रमही या समितीतर्फेच आयोजित केला गेलेला होता.

या समारोहप्रसंगी भाषण करताना पुणे विद्यापीठाचे उपकुलगुरू प्रा. देवदत्त दाभोळकर यांनी माणूस दीनदयाळ स्मृति अंकाचा आवर्जून उल्लेख केला व त्या अंकाच्या मुखपृष्ठावरील पंतप्रधान मोरारजी देसाई यांच्या उद्‌गारांकडे उपस्थितांचे लक्ष वेधले. पंतप्रधान मोरारजी देसाईंचे ते उद्‌गार असे आहेत : "गांधीजींचा 'अंत्योदय' आणि दीनदयाळजींचा 'एकात्म मानव' हे दोन्ही सिद्धान्त एकच आहेत." दाभोळकर यांनी उपस्थित विचारवंतांना आवाहन केले की, त्यांनी पंतप्रधानांचे हे विधान तपासून पहावे व भिन्नभिन्न विचारसरणीतील मूलभूत साम्ये वा नेमके विरोध अधिक स्पष्ट करावेत.



प्रत्यक्ष विधायक कार्यक्रमांबरोबरच असे वैचारिक क्षेत्रातील आदानप्रदानाचे व प्रबोधनाचे, संशोधनाचे व नवनिर्मितीचे किती तरी काम दीनदयाळ समितीला करता येण्यासारखे आहे.

नानाजींना हे सर्व अभिप्रेत आहे हे त्यांच्याशी यासंबंधी बोलत असताना प्रकर्षाने जाणवले.

किंबहुना हे सर्व देशभर वेगाने घडवून आणण्यासाठी वेळ व शक्ती लाभावी म्हणूनच 'खुर्ची'च्या राजकारणापासून ते निवृत्त होऊ पाहत आहेत. हे राजकारण त्यांना किती लवकर मोकळे करते ते मात्र आज तरी सांगवत नाही.

**साप्ताहिक माणूस**

वर्ष सतरावे-अंक पन्नास

१३ मे १९७८

मूल्य पंचाहत्तर पैसे

संपादक
श्री. ग. माजगावकर
साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे
¤
वार्षिक वर्गणी :
चाळीस रुपये
¤
प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.
¤
राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.
¤
साप्ताहिक माणूस
१०२५ सदाशिव पेठ,
नागनाथ पाराजवळ
पुणे ४११ ०३०
¤
दूरध्वनी : ४४३४५९
¤

# सप्रेम नमस्कार

¤ मध्यंतरी श्री. बाळ गाडगिळांना त्यांच्या एका लेखात एका विद्यापीठात वापरल्या जाणाऱ्या 'इंग्रजी' भाषेची कथा सांगितली होती. त्या अफलातून भाषेची आठवण 'माणूस'च्या २९ एप्रिलच्या अंकातील शिरीष सहस्रबुद्धे यांनी लिहिलेले नाट्यपरीक्षण वाचताना झाली. म्हणजे काय की 'सूर्याला' ह्या मराठी नाटकाचे परीक्षण आपल्या अंकात मराठी-इंग्रजी (की आंग्लाळलेली मराठी ?) भाषेतून वाचण्याचा योग आला. पाश्चात्य-पौर्वात्य मिलाफ का काय म्हणतात ते हेच असावे !

आपल्या साडेचार पानी समीक्षणात सहस्रबुद्धे यांनी एकूण बावीस वेळा वेगवेगळ्या इंग्रजी शब्दांचा प्रयोग अगदी भ्रसूपणे केला आहे. इथे मराठीच्या अभिमानाचा प्रश्न येत नाही; पण मराठी समीक्षेत 'बोगस categorical विधान' असे शब्दप्रयोग निव्वळ हास्यास्पद ठरतात. हे अधिक स्पष्ट होण्यासाठी हा एक मासला पुरेसा ठरावा– '...political play character play व ट्रॅजेडी ह्या तिन्हींची potenticals असलेले कथानक...' आता ह्याला मराठी कसे म्हणावे हाच प्रश्न पडतो.

साहित्यिकांना स्वतंत्र प्रतिभा नाही, नाटके स्वतंत्र नसतात वगैरे तक्रारी करणाऱ्या समीक्षा-लेखकाला स्वतःची भाषाही नसावी ही गोष्ट जास्त अस्वस्थ करणारी आहे. हा प्रकार मला वाटते, दोन कारणांनी उद्भवत असावा– एक वर सांगितल्याप्रमाणे इंग्रजीच्या वापराशिवाय लेखकाला सुचतच नसावे. तसे नसते तर 'Soeial animal म्हणून जगताना' असा शब्दप्रयोग कोण सुबुद्ध समीक्षक करील? प्रस्तुत समीक्षालेखातील एकूण इंग्रजीच्या बावीस शब्दप्रयोगांपैकी निम्मे शब्दप्रयोग असे हौसेपायी किंवा सवयीपायी केलेले असावेत. कारण तसे नसते तर 'ब्यूरोक्रॅटस् आणि अनार्किस्टस्' किंवा 'नाटक political की criminal' वगैरे चित्तवृत्तींना अगदी मोहवून टाकणारे द्वैभाषिक प्रयोग केले गेले नसते. दुसरे कारण असे की, अशा समीक्षेचा डोलारा बहुशः पाश्चात्य संकल्पनांवर उभा असतो. पाश्चात्य समीक्षेच्या संकल्पना धिसाडघाईने समीक्षणात घुसवून 'प्रबुद्ध समीक्षक' बनण्याच्या प्रयत्नांपायी 'टोन Modify केलाय्', 'पात्रे flat/static होण्याकडे झुकतात.' 'निळूभाऊंनी 'गेटअप' बदललाय्' किंवा 'नाटक end-directed वाटले' अशी समीक्षा जन्म घेते. म्हणजे सहस्रबुद्धयांच्याच भाषेत सांगायचे तर पाश्चत्य समीक्षेच्या crude implantation चा हा परिणाम !

सहस्रबुद्धेंचे एक जाऊ द्यात ! पण आपल्या साप्ताहिकात काही संपादकीय संस्करण तरी होत असेलच की !

'माणूस'च्या वाचकांना इंग्रजी सहस्रबुद्धयांइतकेच चांगले येत असेल, पण अशा प्रकारचं मिश्रण वाचताना रसभंग होतो हे दुसऱ्या कोणी आपणास सांगण्याची आवश्यकता आहे काय ?

२८ एप्रिल **सुहास पळशीकर, पुणे**

¤ श्री. सुहास पळशीकर यांचं पत्र वाचलं. ओळखीचा चोर जिवानिशी गाठतो, असं म्हणतात ! श्री. पळशीकर माझे मित्र आहेत आणि मला भाषाशैलीच्या अवघड खिंडीत अचूक गाठून त्यांनी हे खरं करून दाखवलंय. असो. माझं लिखाण इतक्या बारकाईनं अभ्यासणारा कुणी तरी मला माणूस जगाच्या पाठीवर आहेच, या जाणिवेनं वारंवार दाटून येणारा आनंदाचा गहिवर बाजूला सारून मी असा खुलासा करू इच्छितो की–

१. श्री. पळशीकरांच्या पत्रातल्या आधारभूत विचाराशी मी पूर्णपणे सहमत आहे. शुद्ध मराठीत लेखन करावं याबाबत त्यांच्या-माझ्यात दुमत नाही. एवढंच नव्हे तर या प्रश्नात भाषाभिमान व भाषाशुद्धीसारखे प्रश्न गुंतलेले असते तरीही मला त्यात काही वावगं वाटलं नसतं. मातृभाषा म्हणून मराठीबद्दल योग्य तो आदर, प्रेम व अभिमान मला वाटतोच आणि त्यामुळं (व अन्य कारणांनी) मराठीतून (अथवा अन्य कोण-

त्याही एका भाषेतून) लिखाण करताना त्यात परभाषिक शब्दांचा मोकाट संचार नसावा हेही मला तत्त्वतः संपूर्णपणे मान्य आहे, हे मी प्रथमच स्पष्ट करायला हवं आणि माझा हा पवित्रा श्री. पळशीकरांच्या पत्रानंतरचा नसून बराच आधीचा आहे, हेही सांगायला हवं.

अशी परिस्थिती असतानाही माझ्या 'सूर्यास्त'वरील लेखात इंग्रजी शब्दांचा बराच वापर झाला आहे, ही विसंगती मला मान्य आहे आणि त्याबद्दल मी दिलगिरी प्रदर्शित करतो. 'माणूस'मधून प्रसिद्ध झालेल्या माझ्या फुटकळ लिखाणासंबंधी गेल्या दीड-दोन वर्षांत दोनतीनदा तरी याच स्वरूपाची तक्रार करण्यात आली आहे व त्या सर्व वेळी मी तोंडी अथवा लेखी क्षमायाचना, सर्वच वाचकांकडे केली आहे. याही वेळी माझ्यासमोर अन्य पर्याय नाही. (अर्थात याचा अर्थ मी निर्ढावलेला गुन्हेगार आहे असा अर्थ घेण्याचे कारण नाही, कारण– )

२. हा प्रश्न श्री. पळशीकरांच्या पत्रावरून भासतो तेवढा वरवरचा व सरळसोपा नाही. 'महाराष्ट्र टाइम्स'मधील पत्रव्यवहारात, याला जवळच्याच असणाऱ्या मराठी-इंग्रजी वादावर बराच ऊहापोह अलीकडेच झाल्याचे स्मरते. 'सत्यकथे'च्या एप्रिल १९७८ च्या मलपृष्ठ क्र. तीनवर श्री. प्रज्ञानानंद यांचं एक पत्र प्रसिद्ध झालं असून सत्यकथेतील लेखांमध्ये वापरण्यात आलेल्या भरमसाट इंग्रजी शब्दांवर त्यांनीही याच आशयाची जळजळीत टीका केलेली आहे. प्रज्ञानानंद व पळशीकर यांचे अनेक युक्तिवाद व दोषारोप समान अथवा समांतर आहेत. प्रज्ञानानंदांच्या क्रोधाग्नीत सापडलेल्या 'सत्यकथे'च्या लेखकांपैकी एक, माझे मित्र श्री. विनय हर्डीकर व मी यांच्या चर्चेतून निघालेले तीन मुद्दे पुढे उल्लेखीत आहे, ते या संदर्भात विचारात घेतले जावेत असं वाटतं–

(अ) एखाद्या कलाकृतीविषयी परीक्षणात्मक लेखन करणारा लेखक प्रामुख्याने समीक्षा लिहीत असतो, मराठी भाषा नव्हे. भाषा ही समीक्षकाला साहित्यिकापेक्षा अत्यधिक प्रमाणात साधनमात्र असते. समीक्षकाचे प्रधान उद्दिष्ट संदर्भित कलाकृतीचे रसग्रहण वाचकांपर्यंत पोचविणे हा असतो; भाषासौष्ठवाचे नमुने सादर करणे हा नसतो. (याचा अर्थ त्याला भाषेचे काहीही करण्याचा परवाना द्यावा असा नाही; पण–) त्यामुळे तो जे करायला निघालाच नव्हता ते न साधल्याबद्दल त्याला किती प्रमाणात दोष देणे सयुक्तिक ठरेल?

(ब) मुद्दा (अ) हा पुढे नेऊन असं म्हणता येईल की, कलाविष्काराची जशी एक स्थलकालस्थितिनिरपेक्ष भाषा असू शकते (उदाहरणार्थ, मोना लिसा, ताजमहाल, शेक्सपियर, बीथोव्हन इत्यादींचे स्थलकालस्थितीची बाधा न होणारे आस्वादन.) तशी कलासमीक्षेची एक वैश्विक भाषा कल्पिता येईल काय?–की ज्यायोगे एखादी भाषा, तिची शुद्धाशुद्धता यांच्या बंधनांपलीकडे जाऊन कुणासही श्रेष्ठ कलासमीक्षाविलास उपभोगता यावा? थोडक्यात माध्यमापेक्षा आशयावर जास्त भर दिला जावा? (अशा श्रेष्ठ जागतिक कलासमीक्षकांमध्ये स्वतःचा समावेश करण्याची कल्पना मी स्वप्नातही करणे शक्य नसल्यामुळे हा मुद्दा मी आत्मसमर्थनार्थ वापरू इच्छित नसल्याचे स्पष्ट व्हावे.) कलासमीक्षा (मग ती कोणत्याही पातळीवर असो) ही अशा प्रकारे एकच विद्याशाखा मानून त्या दृष्टीने पाहण्याचा प्रयत्न केल्यास प्रस्तुत आक्षेपांपैकी काय उरते?

(क) मराठी समीक्षकांवर कल्पनादारिद्र्याचा/इंग्रजीच्या बौद्धिक गुलामगिरीचा गंभीर आरोप उभय पत्रलेखकांनी केलेला आहे. एक तर 'इंग्रजी शब्दांचा अतिरिक्त वापर' हे कारण या आरोपाला पुरेसे वाटतच नाही. तसे मानले तरी वस्तुस्थिती अशी आहे की, मराठीत सातत्याने व गांभीर्याने रसग्रहणात्मक लेखन करू इच्छिणाऱ्या अनेकांना मराठीचा समीक्षाप्रांतातील अपुरेपणा–विशेषतः भाषिक व संकल्पनात्मक अभाव–तीव्रतेने जाणवतो. (हा स्वानुभव आहे व याचा ठपका मी कुणावरही ठेवू इच्छित नाही. मात्र त्याचा अंशमात्र दोष माझ्याकडे येत असल्यास तो स्वीकारण्याचीही माझी तयारी आहे.) अशा वेळी इंग्रजीसारख्या समीक्षादृष्ट्या अतिसंपन्न असलेल्या भाषेचा वापर त्याला सोयिस्कर वाटला तर ते (दुःखद असले तरी) आश्चर्यकारक/क्रोधजनकही ठरू नये. भाषातज्ज्ञ/भाषाभिमानी यांनी अशा तुरळक लेखकांवर आगपाखड करून समाधान मानण्यापेक्षा मराठीतील कलासमीक्षेचे दालन समृद्ध करण्याचा डोळस प्रयत्न (शब्दकोश–अनुवादादी मार्गांनी) केला तर त्यांचा भाषिक अभिनिवेश खरा बावनकशी असल्याचे सिद्ध होणार नाही काय? ज्यांना मराठीत समर्पक व चपखल प्रतिशब्द सापडत नाहीत, प्रचलित नाहीत (पण ज्यांचा वापर समीक्षेत करणे अटळ असते,) अशा किती समीक्षाविषयक संज्ञा/संकल्पनांची यादी द्यायला हवी? नियतकालिकांतून आम्ही नाटक–सिनेमाविषयी जे थातुरमातुर लिखाण करतो ते सोडून द्या; पण नाटक–सिनेमा–कवितांची सविस्तर व सुटीसुटी अशी वाङ्मयीन/प्रात्यक्षिक समीक्षा करण्याचे गंभीर प्रयत्न मराठीत किती समीक्षकांनी/प्राध्यापकांनी केले आहेत? किती विद्यापीठांच्या मराठी विभागांनी नवे साहित्य, आधुनिक समीक्षा यांचे जाणीवपूर्वक संशोधन-संवर्धन करण्याची धडपड चालविली आहे? विविध क्षेत्रांतील परभाषांचा प्रभाव कमी करण्यासाठी अनुवाद, शब्दकोशनिर्मितीसारख्या किती योजना कार्यान्वित झालेल्या आहेत? खरं दुखणं तिथं आहे आणि इलाजही तिथूनच सुरू व्हायला हवा. वर्षातून एकदा फक्त 'मराठी वाचवा' परिषद भरवून भाषणं करणं आणि पत्रलेखनाद्वारे आमच्यासारख्या किरकोळ भाषिक गुन्हेगारांच्या शिकारीला धावणं ही दोन्ही कार्ये सारखीच अनुत्पादक आहेत आणि ब्रेन टच्यूमरच्या रोग्याच्या डोक्याला तेलमालिश करण्याचा उपाय करावा तशी आहेत हे माझ्या भाषाशुद्धिसमर्थक मित्रांना कधी आणि कसे उमजेल? दुसरे, माझा लेखनदोष मी मान्य केलेलाच आहे; पण त्याबद्दल माझी निर्भर्त्सना करताना रत्नचोराला सन्मानपूर्वक सोडून पाकिटमाराला

**जाणीवपूर्वक संशोधन-संवर्धन किती विद्यापीठांतून चालू आहे?**

फाशी दिल्याचा न्याय होऊ नये असे वाटते.

३. 'पाश्चात्य समीक्षेच्या संकल्पना मी घिसाडघाईने समीक्षणात घुसविल्या आहेत' असा श्री. पळशीकरांचा आरोप दिसतो, तो मला नाकबूल आहे. अशा कोणत्या संकल्पना आहेत ते त्यांनी सोदाहरण सांगितले असते तर बरे झाले असते. (निदान माझे पाश्चात्य समीक्षेचे वाचन बरेच असल्याचे तरी सिद्ध झाले असते!) 'टोन मॉडिफाय करणं' किंवा 'गेटअप बदलणं' या काही समीक्षेच्या संकल्पना नव्हेत आणि त्या पाश्चात्य असणेही अत्यावश्यक नाही. पळशीकरांचा हा आरोप अपुऱ्या माहितीच्या आधारावर किंवा बेछूटपणे करण्यात आलेला आहे, असं मला नाइलाजानं म्हणावंसं वाटतं. कारण वस्तुस्थिती अशी आहे की, मराठी रंगभूमीवरील संगीताचा सुवर्णकाळ वगैरे संपल्यानंतर उगम पावलेली अत्याधुनिक / समकालीन नागरी मराठी रंगभूमी ही बव्हंशी पाश्चात्य नाट्यशास्त्रावरून, नाट्यसंकल्पनावरून प्रेरणा घेऊनच वाढत गेली आहे. इब्सेन, शॉ, स्टॅनिलाव्स्की, मोलियर, गॉल्सवर्दी, बेकेट आणि अलीकडे ब्रेश्त यांचा व इतर अनेक पाश्चात्य नाट्यश्रेष्ठींचा मराठी नाट्यसृष्टीवरील प्रभाव सुस्पष्टपणे दिसून येतो. लेखनातच नव्हे तर नाट्यतंत्राच्या बाबतीतही (उदा. रंगमंचविषयक चमत्कृती—नेपथ्य, प्रकाशयोजना वगैरे) आपल्या रंगभूमीने पाश्चात्य नाट्यसृष्टीचे सढळ अनुकरण केले. अशा परिस्थितीत पाश्चात्य समीक्षासंकल्पना साक्षेपाने स्वीकारल्याखेरीज समीक्षालेखन करणे कसे शक्य आहे? इंपोर्टेड बेलबॉटम घालून मग त्याचं रसग्रहण रामायणकालीन वल्कलांच्या पार्श्वभूमीवर करावं अशी अपेक्षा बाळगण्यात काय अर्थ आहे? आता पूर्णतः भरतमुनीच्या नाट्यशास्त्रावर आधारलेलं नाटक लिहिलं गेलं तर त्याची समीक्षा त्या अंगाने करणेच आवश्यक ठरेल. मग 'मुद्राराक्षस'चं परीक्षण लिहिताना भरताच्या स्तरनिविष्ट रंगमंचाची चर्चा अपरिहार्यपणे केली जाईल; पण ब्रेश्तचं जे Alienation technique दूरीकरण तंत्र?) आज आमच्या रंगभूमीनं मोठ्या उत्साहानं आत्मसात करायला काढलं आहे आणि ज्याला मराठीत अद्याप समर्पक शब्दही तयार झाल्याचं ऐकिवात नाही, त्याची चर्चा पाश्चात्य नाट्यसंकल्पनांचा हवाला न देता कशी करणार? ही अपरिहार्यता श्री. पळशीकरांनी जाणून घ्यावी आणि उच्चभ्रू महिलांना इंपोर्टेड साड्या / गाड्यांविषयी जे आकर्षण वाटते तेच मला पाश्चात्य संकल्पनांविषयी वाटत असेल, हा आपला भ्रम (असल्यास) दूर करावा अशी माझी विनंती आहे.

४. यानंतर खाली राहतात, ते माझे मित्र श्री. पळशीकर यांनी माझ्यावर केलेले व्यक्तिगत हेत्वारोप. तथापी त्यांना जाहीर सविस्तर उत्तरे देऊन वाद माजविणे प्रशस्त वाटत नाही. या विषयातल्या मूळ प्रश्नांशीही त्यांचा फारसा संबंध नाही, तेव्हा त्यांची अगदी संक्षेपाने दखल घेतो.

(अ) इंग्रजी शब्दप्रयोग मी 'हौसेपोटी' करतो असं म्हणणं काहीसं अपमानकारक आहे. श्री. प्रज्ञानानंद यांनी त्यांच्या पत्रातही हाच सूर धरला होता असं अंधुक आठवतं. हौसेनं इंग्लिशच्या ज्ञानाचं प्रदर्शन करण्याइतका मी अल्पशिक्षित गावंढळ नव्हे हे पळशीकरांना माहीत असावं. मी इंग्लिशचा विद्यार्थीच असल्याने माझी तद्विषयक हौसमौज भागवायला 'माणूस'चे व्यासपीठ वापरण्याची गरज मला नाही.

(ब) मी स्वतःला प्रबुद्ध किंवा सुबुद्ध समीक्षक (किंबहुना साधा समीक्षकही) समजत नाही हे मी पूर्वीही स्पष्ट केलेले असल्याने त्यासाठी कोणताही खास प्रयत्न करायची आवश्यकता मला वाटत नाही. मी एक सामान्य नाट्यरसिक या भूमिकेतून लिहितो आणि माझ्या लायकीची मला कल्पना असल्याने प्रबुद्ध समीक्षकपदापर्यन्त पोचण्याचा खटाटोप आणि तोही इंग्लिशची शिडी लावून, करण्याचे प्रयोजनच उरत नाही.

(क) मला स्वतःची भाषा नसेल तर त्यामुळे श्री. पळशीकरांनी अस्वस्थ होण्याचे कारण काय? (मुळात 'स्वतःची भाषा नसणे' म्हणजे नेमके काय? मी माझी भाषा मराठी मानतो. श्री. पळशीकरही पत्राच्या सुरवातीला तिला मिंग्रजी, आंग्लाळलेली मराठी अशी सुबकसाजिरी नावे देतातच. या उप्परही मला माझी भाषा नाही असे कसे बरे म्हणावे? किमान तीन हजार शब्दांच्या लिखाणात बावीस इंग्रजी शब्द वापरल्याबद्दल श्री. पळशीकर माझा मराठी भाषेचा हक्क नाकारीत असले तरी हरकत नाही. आपली मिंग्रजी तर कुठे गेली नाही ना? संपादक छापताहेत आणि काही वाचक वाचताहेत तोपर्यंत मिंग्रजीतून लिहू! तिचे आविष्कारसामर्थ्य अपुरे वाटले, तर त्यात 'इराठी' भाषेतले शब्द वापरू! (मुख्य जागतिक भाषा दोन हजारांहून अधिक आहेत असे ऐकतो!) बहुधा पळशीकरांना मला स्वतःची शैली नाही अशासारखं काही तरी म्हणायचं असावं. तसं असलं तरी त्यानंही काही बिघडत नाही. कारण शैली हे माझं साध्य नव्हे. भाषासौंदर्य हेही नव्हे. मला लिहिताना (बहुधा) स्वतःचं काही तरी म्हणायचं – मांडायचं असतं. ते परम महत्त्वाचं साध्य. ते जमेल त्या मार्गानं व्यक्त करणं, वाचकांपर्यंत पोचविणं ही प्रक्रिया. त्यातली साधनं–भाषा, शैली इ.–शुद्ध, सुंदर वगैरे वापरता आली तर उत्तमच; पण तरीही ते उद्दिष्ट दुय्यमच. तेव्हा ते साधलं नाही तर मलाही फारसं अस्वस्थ वाटत नाही. श्री पळशीकरांनीही आपली विलक्षण नजर माझ्या भाषेवरून आशयावर मधूनमधून वळविली तर त्याची अस्वस्थताही बरीच कमी होण्याचा संभव आहे.

५. असो. खुलासा बराच लांबतोय असं वाटतं. शेवटी एवढंच म्हणतो की माझ्या दृष्टीनं कलाविष्कारात काय किंवा कलासमीक्षेत काय आशय व त्याचं संक्षेपण? / संप्रेषण? (Communication) महत्त्वाचं. ते यशस्वी करण्यासाठी अपरिहार्य तिथे मी इंग्लिश शब्द वापरले. माध्यमाला महत्त्व देणाऱ्याला ते खटकणं स्वाभाविक आहे. तथापी त्यातल्या बहुसंख्य शब्दांना मराठी प्रतिशब्द नाहीतच व ज्यांच्यासाठी देता येतील तेथे ते पुरेसे समर्पक व चपखल वाटत नाहीत, असा माझा विश्वास (Conviction) होता व आहे. मी सामान्य लेखक असून भाषाशास्त्रज्ञ नसल्याने असे प्रतिशब्द हुडकून वा तयार करून वापरण्याचे कसब / क्षमता / सवड वगैरे माझ्यापाशी नाही व असलेले भाषाशास्त्रज्ञ आपले काम चोख बजावताना दिसत नाहीत, तेव्हा माझ्या तद्विषयक असमर्थतेला बोल लावणे न्यायाचे होईलसे वाटत नाही. त्यामुळे या खुलाशात मी आत्मसमर्थनाचा खटाटोप केला असेल तर तो, माझी असमर्थता व अपरिहार्य व्यावहारिक अडचण ह्यांना बेजबाबदारपणाचा रंग दिला जाऊ नये यासाठीच आहे. एरवी श्री पळशीकरांचा मूळ मुद्दा मी मान्य केलाच आहे. या प्रश्नाकडे व्यक्तिगत दृष्टिकोन टाळून शास्त्रीय व व्यावहारिक दृष्टिकोनातून पाहिले जाणार असेल, तर माझ्या आंग्लाळलेल्या मराठी लिखाणामुळे ज्यांचा रसभंग

झाला असेलं त्यां सर्वं वाचकांना माझी मनः-पूर्वक दिलगिरी पुनश्च कळवावी.

–शिरीष सहस्रबुद्धे, पुणे

□ श्री. सुहास पळशीकर यांचं पत्र वाचलं. श्री. शिरीष सहस्रबुद्धे यांच्या 'सूर्यास्त' या नाटकावरील परीक्षणामध्ये बावीस इंग्लिश शब्द आल्याचं त्यांनी निदर्शनास आणून दिलं आहे, याबद्दल श्री. पळशीकर अभिनंदनास निश्चितच पात्र आहेत. कारण 'साप्ताहिक माणूस'मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या लेखांमधील विचार समजावून घेण्याचा प्रयत्न 'साप्ताहिक माणूस'चे बहुतेक वाचक करीत असतात. श्री. पळशीकरांच्या नजरेतून ते कदाचित सुटले असतील; पण भाषा आणि संख्या या दोन्ही शास्त्रांवरील आपलं प्रभुत्व त्यांनी निश्चितच सिद्ध केलं आहे.

पत्राच्या शेवटी त्यांनी 'संपादकीय संस्करण' या विषयावरही काही मौल्यवान विचार व्यक्त केले आहेत. मी स्वतः 'साप्ताहिक माणूस'च्या संपादकीय विभागात काम करीत असल्यामुळे या मुद्द्यांची मला तरी गंभीरपणे दखल घेतली पाहिजे.

'साप्ताहिक माणूस'चे जे नियमित वाचक आहेत त्यांना हे माहीतच असेल की, या साप्ताहिकाने निरनिराळे विचार आणि मतं यांना जास्त प्राधान्य देण्याचा प्रयत्न सातत्याने केला आहे. मग या प्रयत्नात भाषेचा फुलोरा ( किंवा डोलारा ) फार सुबकपणे उभा राहिला नाही तरी चालेल. कारण शेवटी भाषा हे विचार व्यक्त करण्याचं माध्यम आहे, साध्य नव्हे. शिवाय आजकाल शब्दबंबाळ भाषेचा फुलोरा अनेक ठिकाणी दिसतो, विचारांची परिपक्वता क्वचितच अनुभवास येते. 'साप्ताहिक माणूस' यातील दुसऱ्या गोष्टीसाठी प्रयत्नशील आहे. दुसरा मुद्दा असा की, कोणत्याही संपादकाकडे राजकीय, सामाजिक, आर्थिक तसंच इतर कलांवरील अनेक प्रकारचे लेख येत असतात. या प्रत्येक विषयामध्ये संपादक प्रवीण असणं अशक्य आहे. अशा वेळी 'संपादकीय संस्करण' या नावाखाली सुशिक्षित आणि अशिक्षित या दोघांनाही समजू न शकणारी भाषा संपादकाने वापरात आणण्यापेक्षा मूळ लेखातील चार इंग्लिश शब्द तसेच ठेवल्याने जर कम्युनिकेशन साधत असेल तर 'माणूस' त्याच्या आड येऊ इच्छीत नाही.

अर्थात श्री. पळशीकरांचा हा उपक्रम निश्चितच स्तुत्य आहे. 'साप्ताहिक माणूस'च्या एका नव्या वाचकवर्गाचा परिचय त्यामुळे आम्हाला झाला आहे.

–सतीश कामत

# अवती-भवती

शरद कृष्णन्

## राजनारायण....आखाड्यातून राजकारणाकडे

ऑल द प्राइममिनिस्टर्स मेन या पुस्तकामुळे तुफान लोकप्रिय झालेल्या जनार्दन ठाकूर यांनी ऑल द जनता मेन नावाचे नवीन पुस्तक लिहिले असून त्यातील कुस्त्यांच्या आखाड्यातून राजकारणात उतरलेल्या आणि आज भारताचे आरोग्यमंत्रिपद भूषणविणाऱ्या राजनारायण यांचे व्यक्तिचित्र विशेष वेधक आहे. राजनारायण यांचा राजकीय प्रवास जसा विचित्र आहे त्याचप्रमाणे त्यांचे खाजगी आयुष्यही मोठे विचित्र आहे. त्यांच्या खाजगी आयुष्याबद्दल फारशी वास्तापुस्त केलेली त्यांना आवडत नाही. गेली कैक वर्षे आपण ब्रह्मचारी आहोत असे जरी ते तोंडाने सांगत असले तरी त्यांनाही संसार आहे, मुलेबाळे आहेत. फक्त या घरेलू गोष्टींचा तपशील ते आपण होऊन कधी सांगणार नाहीत आणि पत्रकाराने अथवा अन्य कोणी यासंबंधी विचारलेच तर मी गेली कित्येक वर्षे ब्रह्मचारी आहे हे हुकमी उत्तर देऊन मोकळे होतील! अर्थात त्यांच्या या ब्रह्मचर्यापूर्वीचे संसारपर्वही खूप मोठे आहे.

तथापी या संसारपर्वामध्ये राजनारायण फारसे गुरफटलेले नाहीत यासंबंधीची एक-दोन उदाहरणे देण्यासारखी आहेत. एकदा त्यांचे पहिले गुरु कै. राम मनोहर लोहिया यांच्या अध्यक्षतेखाली लखनौ येथे संयुक्त समाजवादी पक्षाची एक बैठक चालू होती. बैठक चालू असतानाच बाहेरगावाहून फोन आल्याने राजनारायण यांना मध्येच उठावे लागले. राजनारायणजी फोनवर बोलण्यासाठी उठून गेले आणि काही वेळाने पुन्हा येऊन बैठकीमध्ये सामील झाले. बैठक संपवून उठता उठता के. लोहिया यांनी सहज विचारले, 'काय हो, कुणाचा फोन होता?' राजनारायण यांनी सहज सांगितले की, बनारसहून फोन आला होता– आणि माझा मुलगा वारल्याची माहिती मला फोनवर देण्यात आली. बैठक संपवून बाहेर पडत असलेल्या मंडळींना पुन्हा बोलावून बैठक घेऊन लोहियाजींनी एक दुखवटयाचा ठराव पास करून घेतला. या साऱ्या प्रकारात राजनारायण ज्या अलिप्तपणे वावरले त्यामुळे लोहियाजीही चक्रावून गेले. बैठक संपल्यावर राजनारायणजी तातडीने बनारसला जातील अशी अपेक्षा होती; परंतु प्रत्यक्षात ते पक्षाच्या कामातच मश्गुल राहिले! आजही कोणी आग्रहाने त्यांना कुटुंबियांबद्दल विचारले तर ते सांगतात माझा कुटुंबियांशी जवळजवळ संबंध नाहीच म्हणा ना! मला वाटते माझी पत्नी बनारसमध्ये राहते. एक मुलगा शेतीवाडी किंवा तसलेच काही तरी करतो. एक अजून शिकतो आहे आणि एक मला वाटतं बहुधा सरकारी नोकरीमध्ये आहे. स्वतःच्या मुला-माणसांबद्दल हा गृहस्थ कमालीचा उदासीन आहे असा ग्रह व्हावा अशा पद्धतीनंच ते बोलत असतात. बऱ्याच प्रदीर्घ कालावधीनंतर एकदा त्यांच्या काही पाठीराख्यांनी त्यांच्या पत्नीला दिल्लीत आणले. इकडे राजनारायण भारताचे आरोग्यमंत्री झाले होते. अवती-भवती माणसांचा पसारा पसरला होता. कोणी नोकरीसाठी, कोणी सल्ल्यासाठी, कोणी आशीर्वाद घेण्यासाठी तर कोणी आशीर्वाद देण्यासाठी अशी बरीच मंडळी नेहमीप्रमाणे त्यांच्या आगेमागे होती. कोणा हितचिंतकाने राजनारायण यांचे लक्ष त्यांच्या पत्नीकडे जावे यासाठी त्याने सौ. राजनारायण यांना त्या भाऊगर्दीतून पुढे आणून उभे केले. काही वेळ त्यांच्याकडे पाहून राजनारायण म्हणाले, 'कोण हो या बाई?' बाईंना आणणाराला राजनारायण यांच्या स्वभावाची चांगली पारख होती. त्यामुळे त्यांच्या या विचित्र प्रश्नामुळेही त्याची करमणूक झाली. त्याने शांतपणे सांगितले– या आपल्या पत्नीच नाहीत का? काही तरी आठवल्यासारखा भाव चेहऱ्यावर ठेवून राजनारायण म्हणाले, 'खरंच की, पण मी तर त्यांना कित्येक वर्षांत पाहिले नव्हते

पृष्ठ २४ वर

राजधानी दिल्ली

प्रतिनिधी

# पक्ष आहे, सत्ता आहे आणि बेशिस्तही भरपूर आहे

कर्नालने धोक्याचा कंदील दाखविल्यानंतर आक्षमगडच्या दिशेने वाटचाल करताना जनता पक्षाचे केंद्रीय आणि राज्यपातळीवरील नेतृत्व आपल्यावरील जबाबदारीचे भान दाखवील अशी जी अपेक्षा होती ती पूर्णपणे फोल ठरली आहे. गेल्या वर्षभरात या पक्षाला दुहीने आणि अन्तर्कलहाने जेवढे ग्रासले नव्हते तेवढी भांडणे गेल्या एका आठवड्यात उजेडात आली असून त्यांना आवर घालण्याचे सामर्थ्य केंद्रीय नेतृत्वापाशी उरलेले नाही याचे भरपूर पुरावेही मिळालेले आहेत.

गेल्या सोमवारी म्हणजे १ मे रोजी पहिला वाढदिवस साजरा करण्यासाठी रामलीला मैदानावर जनता पक्षाच्या वतीने जाहीर सभा भरलेली असताना, मोरारजी देसाई, जगजीवनराम, चंद्रशेखर आणि अटलबिहारी बाजपेयी या चारही नेत्यांनी आपला पक्ष वर्षपूर्वी जेवढा एकात्म होता तेवढाच तो आजही आहे अशी ग्वाही दिलेली असली तरी तिच्यात सत्याचा फारच थोडा अंश आहे, हेच हरयाना, मध्यप्रदेश आणि उत्तरप्रदेश या दिल्लीलगतच्या तीन राज्यांतील घटनांनी दाखवून दिले आहे. पक्षाचे अध्यक्ष चंद्रशेखर त्या वेळी म्हणाले की, आमचे टीकाकार सुरवातीला असे भविष्य वर्तवीत होते की हा पक्ष अवघ्या एक महिन्यात फुटेल; परंतु एका महिन्यातच काय पण एका वर्षातही तसे काही घडलेले नाही. पक्षकार्यकर्त्यांच्या मनामध्ये घबराट निर्माण होऊ नये म्हणून जर हे वरिष्ठ नेते आपला पक्ष अभंग असल्याची खात्री देत असले तर ते समजण्यासारखे आहे; परंतु त्यामुळे त्यांना वस्तुस्थिती लपवून ठेवता येणार नाही, हेही तितकेच खरे आहे.

आणि याचा प्रत्यय त्याच दिवशी आलेला आहे.

रामलीला मैदानावरील जाहीर सभेला जाण्यापूर्वी हे चारही नेते संसदीय मंडळाचे सदस्य म्हणून एकत्र जमले होते. ती बैठक तातडीने बोलविण्यात आली होती ती चरणसिंगांच्या राजीनाम्याचा विचार करण्याकरिता. चरणसिंग यांनी आपला राजीनामा परत घ्यावा अशी सदिच्छा या बैठकीत व्यक्त करण्यात आली असली तरी संसदीय मंडळाने चरणसिंग यांच्या पत्रातील आरोपांबाबत काहीही प्रतिक्रिया व्यक्त करण्याचे टाळले. हा प्रश्न राष्ट्रीय कार्यकारिणीकडे सोपवावा एवढेच त्या वेळी ठरविण्यात आले. चरणसिंगांनी केवळ कार्यकारिणीचाच राजीनामा सादर केलेला नाही. त्यांनी संसदीय मंडळातूनही आपल्याला मुक्त करावे असे पत्रात म्हटले आहे. अशा परिस्थितीत चरणसिंगांच्या राजिनाम्यासंबंधी कार्यकारिणीप्रमाणे संसदीय मंडळामध्येही विचार होणे उचित ठरले असते. कारण संसदीय मंडळाने आपला विचार अंतिम मंजुरीसाठी कार्यकारिणीकडे पाठविला असता तर तिलाही निर्णय करणे सोपे होणार होते.

हा मार्ग का अवलंबिण्यात आला नाही यामागच्या कारणाचा उलगडा करणे मुळीच अवघड नाही. आपण कार्यकारिणीचा आणि संसदीय मंडळाचा राजीनामा देत आहोत असे जाहीर करताच आपले अन्य सहकारी घाबरून जाऊन आपली भेट घेण्यासाठी धावतील आणि राजीनामा परत घेण्याची याचना करतील अशी चरणसिंगांची अपेक्षा असली पाहिजे. आपण आपल्या होकाराच्या बदल्यामध्ये देवीलाल आणि रामनरेश यादव यांचे आसन स्थिर करून घेऊ असाही चरणसिंगांनी आपल्या मनाशी हिशोब बांधलेला असावा. मोरारजी देसाई आणि चंद्रशेखर यांनी रुग्णालयात जाऊन चरणसिंगांची भेट घेतली. त्याचप्रमाणे 'चरणसिंगांशिवाय जनता पक्ष ही कल्पनाच करवत नाही !' असे बाजपेयीही म्हणाले; परंतु एवढ्यावरच हे प्रकरण थांबले. देवीलाल यांच्याविरुद्ध उफाळून आलेला असंतोष दडपून टाकण्यात मोरारजी देसाई किंवा चंद्रशेखर पुढाकार घेतील हा चरणसिंगांचा कयास खरा ठरलेला नाही.

देवीलाल यांच्या बहिष्कारामुळे शनिवारी दुपारी स्थगित करण्यात आलेली बैठक रविवारी सकाळी मोरारजीभाईंच्या घरी भरली. त्या बैठकीलाही अडतीस सदस्य हजर आहेत हे पाहिल्यानंतर देवीलाल यांनी पुन्हा एकदा बहिष्कार टाकला. या बैठकीला निरीक्षक म्हणून हजर असलेले सरचिटणीस रामकृष्ण हेगडे यांनी ही बैठक संपल्यानंतर असे जाहीर केले की, देवीलाल यांना बहुमताचा पाठिंबा राहिलेला नसल्यामुळे लवकरच हरयाना विधानसभा जनता पक्षाची नवा नेता निवडण्यासाठी बैठक घेण्यात येईल. हेगडे यांच्या या निवेदनामुळे वातावरण अधिकच चिघळेल हे बाजपेयींच्या ध्यानात आले आणि म्हणून ते लगेच मोरारजीभाईंकडे गेले. त्यानंतर अर्ध्या तासातच वेगळा खुलासा करण्यात आला. त्यात असे म्हटले होते की, बहुमताचा आपल्याला पाठिंबा आहे किंवा नाही हे अजमावून पाहण्यासाठी देवीलाल यांनी आठ तारखेला चंडीगड येथे विधानसभा पक्षाची बैठक बोलवावी आणि तीत देवीलाल यांनी पाठिंबा गमावलेला आहे असे आढळून आले तर नव्या नेत्याची निवड करण्यात यावी.

त्यामुळे साहजिकच आपल्याला सोयिस्कर ठरतील अशा हालचाली करायला देवीलालना सवड मिळालेली आहे. तिचा ते योग्य लाभ करून घेत आहेत अशी चिन्हे दिसू लागली आहेत. देवीलाल यांना पाठिंबा

देणाऱ्यांची संख्या गेल्या रविवारी अडतीस होती. आता ती त्रेचाळीस झाली असून बैठक भरेपर्यंत या संख्येत भर पडावी याकरिता देवीलाल यांनी आपले प्रयत्न जारी ठेवले आहेत. याचा अर्थ असा की मिळालेल्या आठ दिवसांचा फायदा घेऊन देवीलाल यांनी आपले आसन स्थिर केले आहे. पूर्वी सत्तालोभी सदस्य एका पक्षातून दुसऱ्या पक्षात जात असत. त्याच कारणाकरिता आता ते एका गटातून दुसऱ्या गटात दाखल होतात. त्यासाठी त्यांना साधा मोबदलाही पुरेसा ठरतो. थोडक्यात काय तर माणसे फोडण्याची कला अवगत असली की कोणालाही आपली खुर्ची सुरक्षित ठेवता येते हेच देवीलालनी दाखवून दिले आहे. देवीलाल यांच्या या यशामुळे त्यांच्या विरोधात उभ्या ठाकलेल्या सदस्यांची पंचाईत झाली आहे. श्रीमती सुषमा स्वराज्य आणि तारासिंग यांनी आपल्या मंत्रिपदांचे राजिनामे दिल्लीहून तारेने देवीलाल यांच्याकडे धाडून दिले ते त्यामुळेच.

मध्यप्रदेशात आता वीरेंद्रकुमार सकलेचा यांच्यासारखा 'मजबूत' माणूस मुख्यमंत्रिपदावर आरूढ झालेला असल्यामुळे कैलास जोशी यांच्या कारकीर्दीत जे मंत्री मुख्यमंत्र्यांना पेचात पकडण्यासाठी धडप-पडत असत त्यांची हालचाल थंडावली आहे. म्हणून तो गट संघटनेच्या पातळीवर पेचप्रसंग निर्माण करू पहात आहे. रघु ठाकूर आणि अखंड प्रतापसिंग हे दोघे त्या खटाटोपाचे सूत्रधार आहेत. समाजवादात घोळल्या गेलेल्या या मंडळींचा जनसंघद्वेष केव्हा प्रकट होईल हे सांगणे कठीण असते. जर या खारावलेल्या समाजवाद्यांना जनसंघासंबंधी इतका तिटकारा वाटत होता तर त्यांनी जनता पक्ष स्थापन झाला तेव्हाच बंडाचा झेंडा उभारून आपला वेगळा तंबू ठोकायला हवा होता. निवडणूक जिंकण्यासाठी जनसंघाची मदत घ्यायची आणि सत्ता हातात आल्यानंतर त्या पक्षाला बदनाम करण्यासाठी आघाडी उघडायची हा दुटप्पी डाव रघू ठाकूर आणि अखंड प्रतापसिंग खेळू लागले आहेत. त्यांनी लेखणीच्या एका फटकाऱ्यासरशी मध्यप्रदेशातील अठरा जिल्ह्यांमध्ये आपल्या हस्तकांना हाताशी धरून समांतर समित्या स्थापन केल्या. वर मल्लीनाथी अशी की पक्ष बलवान करण्यासाठीच आम्ही हे पाऊल उचलले आहे. खरे म्हणजे त्यांना खटकत आहे ते कुशाभाऊ ठाकरे यांचे अध्यक्षपद; पण तसे उघड बोलता येत नाही. म्हणून पक्षहिताचा पायघोळ बुरखा अंगावर घेऊन त्यांनी मध्यप्रदेशापुरता आपला वेगळा जनता पक्ष स्थापन करण्याचा उपद्व्याप आरंभिला आहे. या पक्षद्रोहाची सजा म्हणून कुशाभाऊ ठाकरे यांनी त्या दोघा वाचिवीरांना पक्षातून निलंबित केले. पक्षांतर्गत शिस्तीसंबंधी केंद्रीय नेतृत्वाला आच असेल तर त्याने कुशाभाऊ ठाकरे यांच्या कृतीचा पाठपुरावा केला पाहिजे. अशा वेळी मधू लिमये, ठाकरे आणि ठाकूर या दोघांनाही दोष देत आहेत हे लक्षात घेण्यासारखे आहे. चंद्रशेखरही ठाकूर–अखंड प्रतापसिंग या युतीच्या आक्षेपार्ह कारवाईचा झडझडून निषेध करीत नाहीत. कारण त्या दोघांच्याही सहानुभूतीचा काटा जुन्या ऋणानुबंधामुळे रघु ठाकूर यांच्याकडे झुकलेला आहे. समांतर समित्या स्थापन करणे हा पक्षशिस्तीच्या दृष्टीने सर्वांत गंभीर अपराध ठरत असताना चंद्रशेखर आणि मधु लिमये (आणि कदाचित आणखी एक सरचिटणीस रबी रॉय) रघुजी ठाकूर यांना माफी करणार असतील तर हेच तंत्र इतर राज्यांत त्यांच्या माणसांविरुद्ध वापरले जाऊ शकेल. मध्यप्रदेशातील पेचप्रसंगाबाबत चंद्रशेखर यांनी जो तडजोडीचा मसुदा तयार केला आहे त्यातही रघु ठाकूर यांनाच झुकते माप देण्यात आलेले आहे.

हरयानाचे देवीलाल आणि उत्तरप्रदेशाचे रामनरेश यादव यांची कारभार करण्याची पद्धत अगदी समान आहे. त्या दोघांना किंचितही मतभेद सहन होत नाही. त्याच कारणासाठी परवा रामनरेश यादव यांनी सत्यप्रकाश मालवीय यांना तडकाफडकी आपल्या मंत्रिमंडळातून काढून टाकले. यादव यांना मालवीय नकोसे झालेले असतील तर एक तर त्यांनी मालवीय यांच्याकडे राजिनामा मागायचा आणि तसे करायला मालवीय यांनी नकार दिला तर आपल्या मंत्रिमंडळाचा राजिनामा देऊन नवे मंत्रिमंडळ बनवायचे; परंतु त्यांना मालवीय यांच्याबाबतीत भलतीच घाई झाली होती. त्यांच्या या कृत्याचा निषेध करण्यासाठी उत्तरप्रदेश विधानसभेतील जनता पक्षाच्या बावीस सदस्यांनी चंद्रशेखर यांना पत्र लिहून रामनरेश यादव यांच्या जागी नवा नेता निवडण्याची मागणी केली आहे. या मागणीला काटशह देण्यासाठी यादव यांनी सात जणांवर मंत्रिपदांची खैरात केली. शिवाय अनेक उपमंत्र्यांना बढती देऊन खूष करून टाकले आहे. चरणसिंगांचे खास विश्वासू सहकारी राजनारायण लखनौला येताच हे सगळे घाईगडबडीने उरकण्यात आले. यावरून चरणसिंगांना हरयानाप्रमाणे उत्तरप्रदेशातही आपल्या सामर्थ्याचे मोजमाप करायचे आहे हेच दिसून येते.

या सगळ्या पार्श्वभूमीवर पक्षशिस्तीची कठोर अंमलबजावणी करण्याची रामकृष्ण हेगडे यांची प्रतिज्ञा हास्यास्पद ठरते. व्यक्ती कितीही मोठी असो, तिच्याकडून पक्षशिस्तीचा भंग झाला तर तिची अजिबात गय करण्यात येणार नाही असे हेगडे यांनी बजावले असून त्यासाठी एक स्वतंत्र समिती नेमण्याचा मनोदयही जाहीर केला आहे. ही समिती निःपक्षपातीपणे वागेल काय हा या संदर्भातील पहिला प्रश्न आहे. त्यापेक्षाही महत्त्वाचा दुसरा प्रश्न आहे की या समितीचा आदेश एखाद्याने मान्य केला नाही तर त्याला कोणते शासन करण्यात येईल? कारण रघु ठाकूर काही एकट्या मध्यप्रदेशातच आहेत असे नाही. त्यांच्या छोट्यामोठ्या आवृत्त्या सगळीकडेच विखुरलेल्या आहेत. □

# पक्षाची कार्यपद्धती

## काही संकेत पाळायला हवेत

वा. दा. रानडे

कार्यपद्धतीचे काही लोकशाही संकेत जनता पक्ष रूढ करणार आहे की नाही, की त्याचे मुख्यमंत्री इंदिरा गांधी आणि बन्सीलाल यांची एकतंत्री पद्धतच अवलंबिणार आहेत असा प्रश्न उत्तरप्रदेश मंत्रिमंडळाच्या पुनर्घटनेवरून उपस्थित झाला आहे. मुख्यमंत्री रामनरेश यादव यांनी सत्यप्रकाश मालवीय यांना मंत्रिमंडळातून काढून टाकले व सात नवे मंत्री नेमले. आपणास मंत्रिमंडळातून वगळणार आहेत याची श्री. मालवीय यांना मुख्यमंत्र्यांची मंत्रिमंडळ पुनर्घटनेची घोषणा होईपर्यन्त कल्पना नव्हती. त्यांना तसे कळविण्याचे साधे सौजन्यही मुख्यमंत्री यादव यांनी दर्शविले नाही. इंदिरा गांधी मंत्रिमंडळाची पुनर्घटना करीत त्या वेळी काही मंत्र्यांना आश्चर्याचे धक्के बसत. आपल्याला काढून टाकण्यात येणार आहे याची त्यांनाही शेवटपर्यंत कल्पना नसे. इंदिरा पद्धतीनेच आमचे मुख्यमंत्री वागणार असतील तर इंदिरा गांधींच्या हुकुमशाहीविरुद्ध लढा कशासाठी दिला असा प्रश्न मनात येतो.

मुख्यमंत्र्याच्या निवडीपासून मंत्रिमंडळाच्या कार्यपद्धतीपर्यन्त निर्णय कशा पद्धतीने घ्यावयाचे याचे संकेत जनता पक्षाने निश्चित करायला हवेत. नेत्याची निवड विधिमंडळ पक्षाच्या बैठकीत गुप्त मतदानाने व्हायला हवी. केन्द्रीय नेतृत्वाने त्यात कोणताही हस्तक्षेप करता कामा नये, दडपण आणता कामा नये किंवा आपल्या पसंतीचा नेता लादण्याचा प्रयत्न करता कामा नये. काँग्रेस पक्ष नेत्यांच्या निवडीत इंदिरा गांधी विधिमंडळ पक्षाला स्वातंत्र्य न देता आपल्या पसंतीचा नेता लादीत असत. या निवडीवर शिक्कामोर्तब करणे एवढेच विधिमंडळ पक्षाचे काम. त्यांच्या राजवटीत विधिमंडळ पक्ष म्हणजे रबरी शिक्के बनलेले होते. जनता पक्षाने ही पद्धती बदलून विधिमंडळ पक्षाला नेतानिवडीचे स्वातंत्र्य पुन: मिळवून दिले. गेल्या वर्षी जूनमध्ये उत्तरेकडील राज्यांत विधानसभा निवडणुका झाल्या. त्यानंतर जनता विधिमंडळ पक्षाचे नेते पक्षबैठकीत पूर्ण लोकशाही पद्धतीने निवडले गेले. केंद्रीय नेतृत्वाने कोणताही दबाव किंवा दडपण आणले नाही. हा एक स्वागतार्ह बदल होता.

नेतानिवडसभेच्या वेळी केन्द्रीय नेतृत्वाने आपला निरीक्षक तरी पाठवायचो आवश्यकता आहे का ? असा प्रश्न उपस्थित होतो. सर्व निवडसभांना केंद्रीय निरीक्षक उपस्थित होते. निवडणूक योग्य पद्धतीने होत आहे ना, एखादा गट दबाव आणून गैरप्रकार करीत नाही ना यावर लक्ष ठेवण्यासाठी निरीक्षक हवेत; पण या निरीक्षकांच्याच निःपक्षपातीपणाबद्दल शंका घेतली जाते तेव्हा काय करावयाचे ? हरियानातील जनता विधिमंडळ पक्षाच्या ३० एप्रिलला झालेल्या सभेस जनता पक्षाचे एक सरचिटणीस के. एस. हेडगे निरीक्षक म्हणून उपस्थित होते. ते पक्षपाती असल्याची टीका देवीलाल यांनी केली तेव्हा ८ मेच्या नेता निवड सभेसाठी, अटलबिहारी वाजपेयी यांना निरीक्षक म्हणून पाठविण्याचे केन्द्रीय नेतृत्वाने ठरविले. हा निर्णय योग्य होता का ? हेडगे यांच्यावर हा एक प्रकारे अविश्वासच नाही का ? पक्षपातीपणाचा त्यांच्यावरील आरोप केन्द्रीय नेतृत्वालाही मान्य आहे असेच यातून सूचित होते असे कोणी म्हणाले तर त्यात काय चुकीचे आहे ? वाजपेयी यांच्याबद्दल अशीच टीका विरोधी गटाने केली तर केंद्रीय नेतृत्व त्याबाबत काय भूमिका घेईल ? दर वेळी निरीक्षक बदलणार काय ? तसे करणे योग्य नाही. खेळात पंचांचा निर्णय जसा सर्वांनी मानायला हवा तसाच निरीक्षकांचा निर्णय मानायला हवा.

पक्षसभेत खुल्या मतदानाने निर्णय घेतला जावा ही देवीलाल यांची मागणीही योग्य नव्हती. खुल्या मतदानात सभासद निर्भयपणे मतदान करू शकत नाही, त्याच्यावर दडपण येते. आपल्याविरुद्ध कोणी मते दिली हे कळल्याने त्यांच्याविरुद्ध आकसाने कारवाया केल्या जाण्याचा संभव असतो. या सर्व गोष्टी लक्षात घेऊनच गुप्त मतदानाची पद्धती रूढ झालेली असून ती बदलण्याचे काहीही कारण नाही.

नेतानिवडीनंतरचा प्रश्न मंत्रिमंडळ बनविण्याचा. आपले सहकारी निवडण्याच्या बाबतीत मुख्यमंत्र्याला पूर्ण मोकळीक हवी. दिल्लीची वारी करून मंत्र्यांच्या यादीस केंद्रीय नेतृत्वाची मान्यता घेण्याची काही आवश्यकता नाही. केन्द्रीय नेतृत्वाने याबाबतीत फक्त सर्वसाधारण मार्गदर्शक तत्त्वे निश्चित करावीत. मंत्रिमंडळ बनविण्याच्या बाबतीत मुख्यमंत्र्यास पूर्ण मोकळीक हवी. तशीच मंत्रिमंडळाच्या पुनर्घटनेच्या बाबतीतही हवी. एखाद्या मंत्र्यावरचा विश्वास उडाला असेल, त्याच्याशी सहकार्याने काम करणे शक्य नसेल तर त्याला मंत्रिमंडळात ठेवण्यात काय अर्थ? अशा मंत्र्यास वगळण्याचा अधिकार मुख्यमंत्र्यास हवाच; पण त्याने तो लोकशाही पद्धतीने वापरला पाहिजे. अशा मंत्र्याचा राजिनामा मुख्यमंत्र्याने मागावा आणि त्याने राजिनामा देण्याचे नाकारले तरच त्याला काढण्याची शिफारस राज्यपालांकडे करावी. उत्तरप्रदेशच्या मुख्यमंत्र्यांनी मालवीय यांचा राजिनामा का मागितला नाही याचा खुलासा केंद्रीय नेतृत्वाने त्यांना विचारला आहे तो योग्यच आहे. असे प्रकार पुन्हा घडणार नाहीत अशी दक्षता जनता पक्षाने यापुढे घ्यायला हवी आणि उत्तरप्रदेश मुख्यमंत्र्यांना त्यांच्या चुकीची जाणीव द्यावयास हवी.

नेता बदलण्याबाबत काय पद्धती असायला हवी ? साध्या बहुमताने नेता बदलावा का? नेत्याने बहुमताचा विश्वास गमावला असेल तर दुसरा नेता निवडायला हवा हे लोकशाहीशी सुसंगतच आहे; पण आयाराम—गयारामांच्या लहरीनुसार वारंवार बदलणारे अस्थिर बहुमत हे खऱ्या अर्थाने बहुमत म्हणता येईल का, याचा विचार पक्षाने करायला हवा. पक्षात गटबाजी असेल तर संधिसाधू सभासद नेहमी एका गटालाच धरून राहतील असे नाही. सत्तेच्या तोलानुसार त्यांनी गट बदलला की बहुमतही बदलणार. मग प्रत्येक वेळी नवा नेता निवडायचा म्हटल्यावर अस्थिर राजवटींचा जमाना सुरू होईल. हे टाळण्यासाठी मी पूर्वी केलेलीच एक सूचना पुन: करीत आहे. ती म्हणजे पक्षनेता केवळ साध्या बहुमताने न निवडता दोन-तृतियांश बहुमताने निवडावा आणि नेता बदलायचा असेल तर तोही दोन-तृतियांश बहुमतानेच बदलावा.

आपल्या गटाचे बळ वाढविण्यासाठी अपक्ष आमदारांना पक्षात सामील करून घेण्याच्या प्रवृत्तीलाही उत्तेजन दिले जाता कामा नये. या तंत्राचा अवलंब करून हरियानाच्या मुख्यमंत्र्यांनी तीन व उत्तरप्रदेशच्या मुख्यमंत्र्यांनी सात सभासदांना पक्षात सामील करून घेतले आहे. यातून पक्ष बळकट न होता अपक्ष आमदारांना मात्र भलता भाव येईल. तेव्हा पक्षांतरबंदीचे बिल पास होईपर्यंत वाट न पाहता त्यासंबंधीचे संकेत जनता पक्षाने स्वतःच पुढाकार घेऊन स्वतःपुरते कसोशीने पाळायला हवेत.

नेतानिवड, नेताबदल, मंत्रिमंडळाची निवड व पुनर्घटना, अपक्ष आमदारांना प्रवेश या अलीकडे उपस्थित झालेल्या काही प्रश्नांच्या अनुरोधाने पक्षाच्या कार्यपद्धतीविषयी काही विचार येथे मांडले आहेत. शिस्तबद्ध पक्षनिर्मितीसाठी त्याचा अधिक सखोल विचार व्हावयास हवा. ☐

विकेंद्रीकरण, रोजगारनिर्मिती, जिल्हावार उद्योगकेंद्रे... यावर चर्चा तर सध्या जोरात सुरू आहे...

# एका सहकारी कापूसजिनिंगची व्यथा

दादा शिंदे, फलटण

जिंती हे फलटण तालुक्यात नीरा नदीकाठी वसलेले छोटेसे गाव. अंतर फलटणपासून सात मैल. नीरा कालव्याखाली जमीन भिजू लागली अन् इथे हरितक्रांतीची चाहूल लागली. कापूस–उसासारखी पैशाची अमाप पिके पिकू लागली. सहकारी संस्थांनी बाळसं धरलं. नीरा-परिसरात तीन सहकारी साखर कारखाने ग्रामीण नेतृत्वाने उभारले. सहकाराने एकीचे बळ दाखवले. शेतकरी आर्थिक दृष्टीने विचार करू लागला. गावातही सहकाराचे वारे संचरले. गाव म्हटलं की, पिढीजात वैर नि गल्ली-गल्लीतील, आळीआळीतील हेवेदावे असणारच; पण ते सर्व विसरून उत्साही कार्यकर्ते एकत्र आले. त्यांनी ठरवले, 'आपणही गावात सहकारी कापूस जिनिंग फॅक्टरी काढायची. कापसाची पिलाई गावातच करून, डायरेक्ट मिलला कापूस द्यायचा, भाव चांगला मिळवायचा!'

सहकारातील बड्यांचा सल्ला घेतला. एक राष्ट्रीयीकृत बँक मदतीला आली. ७१ साल म्हणजे राष्ट्रीयीकरणानंतरचे दुसरे वर्ष. त्यामुळे शेतीकर्जदेण्याबाबत चढाओढ लागलेली. बँकेने खळखळ न करता जिनिंगचे शेअर्स विकत घेण्यासाठी शेतकऱ्यांना पीककर्जे दिली. छोट्या-मोठ्या शेतकऱ्यांकडून प्रत्येक शेअरला २०० रु. प्रमाणे रक्कम गोळा केली. त्याच सुमारास एका ज्येष्ठ मंत्र्यांचा दौरा या भागात झाला. कार्यकर्ते त्यांना भेटले. साहेबांनी सांगितले, 'शेतकऱ्यांची योजना आहे ना? मग ताबडतोब कामाला लागा. संस्था नोंदणीची अडचण यायची नाही, त्यावाचून अडायचं नाही!' मोठ्यांचा शब्द शिरोधार्य मानून कार्यकर्ते कामाला लागले. बिचाऱ्यांना काय ठाऊक की सरकारी यंत्रणेत दाखवायचे दात वेगवेगळे असतात!

भागधारक व बँक मिळून दीड लाख रुपयांची गुंतवणूक केली. इमारत उभी राहिली. मशिनरी बसविली. कापसाचा हंगाम सुरू होण्याआधी सर्व तयारी पूर्ण झाली. बस्स्! फक्त कापूसखरेदीचाच अवकाश होता. फलटणचा कापूसबाजार सुरू झाला. कार्यकारीमंडळ कापूस खरेदीस बाजारात गेले तर संकट आ वासून उभे! सरकारी अधिकाऱ्यांनी सांगितले की, संस्थेची नोंदणी झाल्याशिवाय जिनिंग सुरू करता येणार नाही. कापूस खरेदीत अर्थ नव्हता. सर्व प्रयत्नावर पाणी पडले. मग नोंदणीसाठी धावधाव नि अर्ज-विनंत्या सुरू झाल्या; पण दखल कोण घेणार, अननुभवी आणि राजकारणाच्या खाचाखोचांपासून अनभिज्ञ असणाऱ्या कार्यकर्त्यांच्या विनंतीची? खाते-सहकारी; पण सहकार्य मात्र शून्य. सहकारमंत्र्यापर्यंत वाऱ्या झाल्या. तेव्हा कुठे जाग आली. कागदपत्रे हलली; पण तोपर्यंत हा हा म्हणता कापसाचा सीझन संपून गेला. ना यंत्राची चाके फिरली ना कापसाची पिलाई झाली!

पुढील वर्षी सरकारने एकाधिकार कापूस खरेदी योजना कार्यवाहीत आणली. नेमके इथेच सहकारी तत्त्वावर सुरू केलेल्या जिनिंगचा उद्देश साफ कोसळला. जिंती पंचक्रोशीतील कापूसउत्पादकांची व्यापार-दलालांच्या तावडीतून सुटका करावी, तसेच शेतकऱ्याच्या कापसास चांगला भाव मिळवून द्यावा या उद्देशाने जिनिंगची उभारणी केली होती; पण आता एकाधिकार खरेदी सुरू झाल्यावर फक्त सरकार कापूस खरेदी करणार होते. कापसाचा भावही सरकार ठरवणार होते. त्यामुळे कापूसउत्पादकांचे भवितव्य, सरकारचे धोरण आणि कर्मचाऱ्यांची कार्यक्षमता यावर अवलंबून राहिले. एकाधिकार खरेदीमुळे शेतकऱ्यांची पिळवणूक करणाऱ्या व्यापारी-दलाल-अडते यांचे स्थान संपुष्टात आले. 'उत्पादकांच्या भल्याची योजना' असे गोंडस नावही कित्येकांनी या योजनेस दिले; परंतु धोरणातील अस्थिरता व राजकारण्यांचा वारंवार हस्तक्षेप यामुळे खेड्यापाड्यांवर शेतकऱ्यांनी उभारलेल्या सहकारी जिनिंगचे अस्तित्वच धोक्यात आले. एकमेव उपाय म्हणजे अशा जिनिंगच्या गावी मार्केटिंग फेडरेशनने कापूस खरेदी केंद्र सुरू करणे आणि त्या जिनिंगकडून कापूस पिलाई करून घेणे.

एकाधिकार खरेदी घोषणेनंतर जिनिंग चालू करण्यातील स्वारस्य संपले होते; पण थांबून चालणार नव्हते. दीड लाख रुपये गुंतून पडले होते. प्राप्त परिस्थितीत मार्ग म्हणून मार्केटिंग फेडरेशनने जिंतीस कापूस खरेदी केन्द्र सुरू करावे असे कार्यकर्त्यांनी प्रयत्न सुरू केले. एकाधिकार योजनेचे ते पहिले वर्ष. त्यामुळे कामकाजात सुसूत्रता नव्हती. खरेदी केन्द्र देण्यासंबंधी धोरण लवकर ठरत नव्हते. हंगाम सुरू झाला होता. जिंतीत कापूस उत्पादकांची बैठक झाली. 'आपल्या गावास खरेदी केन्द्र मिळणार आहे तेव्हा पंधरा दिवसपर्यंत शेतकऱ्यांनी आपला कापूस फलटणच्या केन्द्रांवर विक्रीसाठी नेऊ नये' असे ठरले. पंधरा दिवस निघून गेले तरी खरेदीकेन्द्रांचा निर्णय लागेना. शेतकरी कंटाळले. त्यांनी कापूस फलटण केंद्रावर नेला. जिनिंगच्या दृष्टीने दुसरे वर्षही फुकट गेले.

तिसऱ्या वर्षी म्हणजे १९७४ साली जिंतीस कापूस खरेदी केन्द्र मिळाले. जवळपासच्या दहा गावांचा कापूस केन्द्रावर आला. फेडरेशनने कापसाची पिलाई जिनिंगकडून वाजवी भावाने करून घेतली. जिनिंगमध्ये तीन पाळ्यांसाठी ४० स्त्री मजूर लागत. शिवाय फिटर, सुपरवायझर, क्लार्क, व्यवस्थापक अशा नोकऱ्या गावातील शिक्षित तरुणांना उपलब्ध झाल्या. मार्केटयार्डात कापूस-पोत्यांची–भोतांची चढउतार-वाहतूक यासाठी मोठ्या प्रमाणावर हमाल लागत. गावातील ट्रक आणि ट्रॅक्टरना कापूस वाहतुकीचे काम मिळाले. हे सर्व एका हंगामात चालले. पुढे ७५ मध्ये एकाधिकार खरेदीचे घोडे अडले. योजना एक वर्षासाठी स्थगित ठेवली गेली. कापूस फलटणच्या खुल्या

बाजारात व्यापाऱ्यांनी खरेदी केला. जिनिंग बंद ठेवण्याशिवाय गत्यंतर नव्हते.

७६ मध्ये पुन्हा एकाधिकार योजना अंमलात आली. खरेदी केन्द्र मिळाले. जिनिंग सुरू झाली. पिलाईचा मोबदला म्हणून मिळणाऱ्या पैशात जिनिंगचे व्यवहार चालू होते; पण तेवढ्याने भागणार नव्हते. बॅन्केकडून घेतलेल्या परतफेडीची समस्या होती. कारण उत्पादक सभासदांना दिलेल्या कर्जास; बॅन्केकडे जिनिंग जामीनदार होती. बदलत्या परिस्थितीत कर्ज–परतफेडीची व्यवस्था करण्याचे कोणतेच साधन जिनिंगच्या हाती राहिले नव्हते. फेडरेशनने कापसाच्या विलातून पैसे कापावेत अशी अपेक्षा होती; पण ते नीट जमत नव्हते. पतपुरवठा सोसायटचा व भूविकास बँकांचे कर्जफेडीचे नंबर अगोदर होते. सहाजिकच परतफेड झालेली नाही. बँक अधिकाऱ्यांचे हेलपाटे व तगादे वाढत आहेत.

एकाधिकार योजना मूलत: शेतकऱ्यांच्या हिताची असूनही कारभारातील अकार्यक्षमता कापूस–बिलाबाबत झालेली दिरंगाई यामुळे शेतकऱ्यांची नाराजी वाढत गेली. त्याच वेळी योजनेसाठी लागणारा पैसा देण्याचे केन्द्रसरकारने अमान्य केले. परिणामत: ७७ च्या कापूस हंगामापासून योजना स्थगित झाली. कापूस व्यापार खुला झाला. खाजगी व्यापाऱ्यांनी फलटणला कापूस खरेदी सुरू केली. जिनिंगवर गंडांतर आले. व्यापाऱ्यांनी कापूस फलटणला खरेदी करावा नि पिलाईसाठी जितीस आडमार्गावर पाठवावा असा आतबट्ट्याचा व्यवहार करणे व्यापाऱ्यांना शक्य नव्हते; पण जिनिंग पूर्णत: बंद ठेवली तर सुमारे १०० स्त्रीपुरुषांची मजुरी जाणार होती. तोडगा म्हणून असे ठरले की जिनिंगने स्वत:च्या खर्चाने व्यापाऱ्यांचा कापूस जितीस न्यायचा व पिलाई करून स्वखर्चाने पुन्हा पोचवायचा. फक्त पिलाईचा मोबदला व्यापारी देतील. या व्यवहाराने गेल्या हंगामात जिनिंग कशीबशी चालली.

यंदाचा कापूसहंगाम जवळ येत आहे. कापूस लागवड जोरात झाली आहे, पण सरकारी धोरणाची अनिश्चिततेची टांगती तलवार उत्पादकाच्या मानेवर आहे. परवाच मुख्यमंत्री वसंतदादा म्हणाले, 'एकाधिकाराचा पुनर्विचार करता येईल.' म्हणजे पुन्हा उत्पादक गोंधळात. खुल्या व्यापाराचे धोरण कायम ठेवले तर सहकारी जिनिंग बाजारात कापूस खरेदी करील. तसेच सभासदाचा कापूस खरेदी करून त्याची पिलाई करून मिलसना विकील. पण एवढी तयारी केल्यावर एकाधिकाराची घोषणा झाली तर मोठी पंचाईत होईल. ह्या एकाच जिनिंगची अशी अवस्था आहे असे नाही तर मार्केटसेंटरपासून म्हणजे तालुका ठिकाणापासून दूरच्या खेडेगावात असलेल्या अनेक सहकारी जिनिंगची ही अवस्था आहे. एकट्या फलटण तालुक्यात अशा ४ सहकारी जिनिंग आहेत.

आज सर्वत्र उद्योगाचे विकेंद्रीकरण, ग्रामीण रोजगार निर्मिती, जिल्हावार उद्योगकेंद्रे यांवर चर्चा चालू आहे. गांधीजींच्या तत्त्वांना आदर्श मानून ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या पुनर्जीवनासाठी जनता सरकार धोरणे आखीत आहे. अशा वेळी वर दिलेली एका जिनिंगची व्यथा पाहिल्यावर सत्य वस्तुस्थितीवर प्रकाश पडतो. नोकरशाहीचा रगाडा, धोरणातील विसंगती, भांडवलशाहीचे हितसंबंध जपून घेतलेले निसटते निर्णय यामुळे ज्यांच्यासाठी योजना आहेत तो तळाचा गट उपेक्षितच राहतो. □

# तुमच्या शहराचा अभ्यास करा.

दिनांक २७ मे ते १० जूनपर्यंत पुण्यात नेतृत्ववर्धिनी संस्थेतर्फे ' Know your city and know your civic body ' ' शहराचा व स्थानिक स्वराज्यसंस्थेचा अभ्यास ' असे शिबिर घेतले जाणार आहे. शिबिरासाठी १५ ते २० या वयोगटातील फक्त ४० मुलामुलींना प्रवेश दिला जाईल. शिबिराला २० रु. शुल्क असेल. १५ मे पूर्वीच म. गं. पटवर्धन, शिबिरसंयोजक, सुमती, १२०४–३० शिवाजीनगर, पुणे ४ या पत्त्यावर नावे नोंदवावी. शिबिरात खालील विषय असतील. महानगरपालिकेचे अधिकारी, काही कार्पोरेटर व स्थानिक अभ्यासू व्यक्ती शिबिरात मार्गदर्शन करतील.

शिबिरात सकाळी भाषणे व चर्चा असतील व दुपारी संस्थाभेटींचा कार्यक्रम राहील.

### विषय

१. शहराचा अभ्यास करावयाचा म्हणजे नेमके काय करायचे ?
२. पुणे शहराचा अभ्यास.
३. पुणे शहराचे सांस्कृतिक जीवन.
४. पुणे शहराचे संरक्षणक्षेत्रातील स्थान.
५. पुणे शहराचे शैक्षणिक विशेष.
६ पुणे शहरातील संशोधनसंस्था.
७. पुणे शहरातील करमणुकीची साधने.
८. पुणे शहराचे औद्योगिक महत्त्व.
९. शहरातील व्यापाराच्या घडामोडी.
१०. पुणे शहराचे राजकीय क्षेत्रातील कार्य.
११. पुणे शहरातील वर्तमानपत्रे.
१२. पुणे शहरातील समाजसेवा–संस्था.

कॉर्पोरेशनशी संबंधित असलेल्या खालील विषयांची सखोल माहिती मुलांना दिली जाईल.

१. कॉर्पोरेशनची कार्यालयीन माहिती व विविध समित्या.
२. म्युनिसिपल फायनान्स.
३. बस-वाहतूक.
४. पाणीप्रश्न.
५. आरोग्याचा प्रश्न.
६. कॉर्पोरेशनपुढील समस्या.
७. पुणे शहराची संभाव्य वाढ.
८. शिक्षण.
९. निवडून येण्यासाठी मला काय करावे लागेल.

सर्वांना ग्लायडरमध्ये बसायला नेले जाईल. शहराचा एकेक नकाशा दिला जाईल.

नेतृत्ववर्धिनीच्या, from Monitor to Corporator या शिक्षणाच्या, अभ्यासक्रमात शालेय विद्यार्थ्यांना मॉनिटर्स ट्रेनिंग, कॉलेजमधील विद्यार्थ्यांना जिमखाना विभागाचे प्रशिक्षण व त्यापुढे यशस्वी कॉर्पोरेटर होण्यासाठी शहराचा सर्व अंगांनी अभ्यास, अशा चढत्या क्रमाने शिक्षणशिबिरे आयोजित केली जातात. □

# प्रमाणशीर प्रतिनिधित्वाची पद्धती कशी योग्य ठरेल ?

द. अ. देसाई

अस्थैर्य किंवा हुकुमशाही याशरख्या धोक्यांपासून भारतीय लोकशाहीचे रक्षण करायचे असल्यास प्रचलित निवडणूकपद्धतीत आमूलाग्र बदल करणे आवश्यक आहे. सध्याच्या निवडणूकपद्धतीत पक्षाला खरे महत्त्व नाही. सत्ता मिळविण्याकरता काही उमेदवारांनी बनविलेली टोळी अशी व्याख्या करता येईल, असेदेखील पक्ष आज निवडणुका लढवू शकतात व सत्तेवर येऊ शकतात. राजनीतीमध्ये नीती अनावश्यक आहे असे जे आजचे चित्र दिसते ते जर बदलायचे असेल तर तत्त्वशून्य माणसे सहजपणे सत्ता काबीज करू शकणार नाहीत, अशा प्रकारच्या तरतुदी निवडणूकपद्धतीत कराव्या लागतील. निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींच्या वर्तनाचा जाब विचारण्याचा अधिकार कोणत्या तरी प्रकारे मतदारांना असला पाहिजे. जयप्रकाशजींची ही मागणी अव्यवहार्य म्हणून दूर सारण्याऐवजी व्यवहार्य ठरेल अशी पर्यायी योजना तयार करण्याकड राजकीय विचारवंतांनी व नेत्यांनी तातडीने लक्ष पुरविले पाहिजे.

आजच्या आपल्या निवडणूकपद्धतीमुळे आपली राजकीय सत्तायंत्रणाच अशी बनली आहे की, नैतिक मूल्ये मानणारे, प्रामाणिक नेतृत्व बाजूला फेकले जावे व विधिनिषेधशून्य, सत्तापिपासू नेतृत्वाकडे सारी सत्ता केंद्रित व्हावी. ही सत्ता एका व्यक्तीच्या हातात केंद्रित होते की काही व्यक्तींच्या गटाच्या, हा मुद्दा महत्त्वाचा नाही. दोन्ही गोष्टी सारख्याच अरिष्टकारक आहेत. स्वतंत्र भारताचा राजकीय इतिहास पाहिल्यास वरील निष्कर्षाचा भरपूर पुरावा मिळेल. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर सत्तेवर आलेले कॉंग्रेसचे नेतृत्व नीतीचे उच्च आदर्श मानणारे, गांधीजींच्या तालमीत तयार झालेले होते; पण सत्ताग्रहणानंतर ते आदर्श टिकले नाहीत किंवा ते नेतृत्व तरी टिकले नाही. आणीबाणीतील संघर्षानंतर सत्तेवर आलेल्या जनता नेतृत्वाच्याबाबतीत वेगळे घडेल अशी आशा करणे इतिहासाशी सुसंगत नाही.

नैतिक आवाहने, भावनात्मक आवाहने संघर्षमय राजकारणात; नकारात्मक राजकारणात यशस्वी होतात; पण संघर्ष संपला, लढाई जिंकली की मिळालेल्या 'लुटी'च्या वाटण्या करताना नैतिक आदर्श मानणारे नेतृत्व बाजूला सारले जाते. गांधीजींचा व जयप्रकाशजींचा संघर्षकालात जनतेवर फार मोठा प्रभाव होता; पण संघर्ष संपून विजय मिळाल्यानंतर त्यांचा तो प्रभाव टिकला नाही, ही ऐतिहासिक वस्तुस्थिती आहे. त्यामागची कार्यकारणपरंपरा समजून घेण्याचा आपण प्रयत्न करू. संघर्षाच्या काळात त्यागाला महत्त्व असते. जास्त त्याग करणारे नेतृत्व अशा काळात पुढे येते. त्याग करणाऱ्यांत अंतर्गत स्पर्धा असत नाही; पण संघर्ष यशस्वी झाल्यानंतर जेव्हा सत्ता हस्तगत होते तेव्हा त्या सत्तेचे वाटप सर्वजणात सारखे शक्य नसते. मग सत्ता असणारे व सत्ता नसणारे असा भेद निर्माण होतो. साहजिकच या भेदभावामुळे सत्ता हस्तगत करण्याकरिता अंतर्गत स्पर्धा सुरू होते. संघर्षकालात खांद्याला खांदा लावून लढणारेच आता एकमेकांविरुद्ध लढायला उभे ठाकतात. संघर्ष नसलेल्या काळातील त्याग दुर्लक्षित राहातो व असा त्याग करण्याची क्षमता फारच थोड्या व्यक्तींत असते. अशा व्यक्तींनी सत्तेकरिता संघर्ष न करण्याचा त्याग केला तर विधिनिषेधशून्य नेतृत्व सत्ता काबीज करते; पण अशा व्यक्तींना सत्तेसाठी संघर्ष करतानादेखील नैतिक मूल्यांना रजा देता येत नाही. त्यामुळे साहजिकच विधिनिषेध नसलेले नेतृत्व त्यांना सत्तेवरून बाजूला करू शकते आणि ज्या व्यक्ती सत्तेकरिता नैतिक मूल्यांना रजा देऊ शकतात त्या तत्त्वनिष्ठ राहूच शकत नाहीत. अशी ही शृंगापत्ती असल्यामुळे सत्तेची नेहमीच विधिनिषेधशून्य नेतृत्वाकडे जाण्याची प्रवृत्ती असेल, असे एक सामान्य सत्य आपल्याला मांडता येईल. अशा परिस्थितीत सत्तेवरील नेतृत्वावर मतदारांना आपला अंकुश कसा ठेवता येईल एवढाच विचार आपण करू शकतो.

जनतेच्या हिताचा विचार करण्याऐवजी बऱ्याचदा आपले लोकप्रतिनिधी विधानसभांतून व संसदेतून आपल्या विरोधकांची अडवणूक कशी करावी व त्यांना सत्तेवरून खाली कसे खेचावे या विचारात व त्या विचारातून सुचलेले डावपेच लढविण्यात तो आपली शक्ती खर्च करताना दिसतात. आपण लोकहिताकरिता मते मागितली होती याचाही त्यांना विसर पडतो. या सगळ्याचे कारण त्यांच्या वर्तनाचा जाब विचारण्याचा अधिकार मतदारांना घटनेने दिलेला नाही. निवडून आल्यानंतर सत्तारूढ पक्षाचे ध्येय सत्ता टिकविणे व विरोधी पक्षाचे ध्येय सत्तारूढ पक्षाला खाली खेचणे आणि हे करताना आपल्या उद्दिष्टांना उपयुक्त ठरेल अशी लोकसेवा करणे, एवढेच जर व्हायला लागले तर लोकशाही या शब्दाचा अर्थ काय ?

आजची आपली निवडणूकपद्धती सरंजामशाही प्रस्थापित करणारी आहे. निवडणुकीचे तिकिट मिळविण्यापासून निवडणूक जिंकण्यापर्यंत सर्व गोष्टींकरिता कार्यकर्त्यांचे ताफे जवळ बाळगण्याची ज्यांची ऐपत असते अशांना सत्ता मिळविता येते. ज्या ठिकाणी संघर्ष असेल तिथेच फक्त प्रामाणिक पण गरीब व्यक्ती यशस्वी होऊ शकतात. निष्ठावान

पक्षकार्यकर्त्यांचा आवाज या भाडोत्री कार्यकर्त्यांकडून बंद करणे या 'नेत्यां'ना सहज शक्य होते. त्यामुळे असे नेते आपल्या शेकडो अनुयायांसह ज्या पक्षाकडून सत्ता मिळण्याची शक्यता दिसते त्या पक्षात सामील होतात. जोपर्यंत आपल्या पक्षात आयाराम-गयाराम यांची चंगळ असते तोपर्यंत पक्ष तत्त्वप्रणालीनुसार ठरतात असे मानणे कठीण आहे.

लोकशाही राज्यकारभार जनतेच्या हिताकडे लक्ष ठेवून काही तात्त्विक भूमिकेनुसार चालावा असे वाटत असल्यास, जनतेच्या हिताकरिता काय केले पाहिजे याबद्दल ज्याला गंभीरपणे व प्रामाणिकपणे विचार करण्याची गरज वाटत नाही, तो लोकप्रतिनिधी म्हणून पैशाच्या जोरावर निवडून येऊ शकणार नाही व निवडून आलेला लोकप्रतिनिधी जनतेचे हित विसरू धजणार नाही, अशी परिस्थिती घटनेद्वारा निर्माण केली पाहिजे.

## योग्य निवडणूक पद्धतींची गरज

आजच्या आपल्या निवडणूकपद्धतीमुळे अनेक प्रकारचे असमतोल निर्माण होतात. सर्वांत जास्त मते मिळविणाऱ्या विजयी उमेदवारची मते बऱ्याचदा त्याच्या विरोधकांना मिळालेल्या एकूण मतांपेक्षा कमी असतात. बहुसंख्य मतदारांचा विरोध असलेला पक्षदेखील त्यामुळे अधिकारावर येऊ शकतो. सत्तारूढ पक्षाला वेगवेगळ्या भागांतून मतांच्या प्रमाणात जागा न मिळाल्याने काही भागांना सत्तारूढ पक्षात कमीअधिक प्रतिनिधित्व मिळते. याच्यातून फुटीरतेच्या भावना जोपासल्या जाण्याची शक्यता असते. ही पद्धती फक्त दोनच पक्ष जिथे आहेत अशा देशात जरी ठीक असली तरी भारतासारख्या अनेक भाषा, धर्म, जाती असलेल्या व आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक पात्रतेत प्रचंड फरक असलेले समाजस्तर असलेल्या देशात द्विपक्षपद्धती अस्तित्वात येणे कठीण दिसते. शिवाय असे दोनच पक्ष निर्माण झाले तर ते राजकीय प्रबोधन करू शकणार नाहीत. कारण अशा पक्षांना कोणतीही विशिष्ट विचारप्रणाली स्वीकारणे त्यांच्या सर्व समावेशक वृत्तीमुळे शक्य होणार नाही. या दृष्टीने भारतात अनेक पक्ष राहतील हे गृहीत धरूनच आपल्याला योग्य अशी निवडणूकपद्धती शोधून काढली पाहिजे. परदेशी तंत्रज्ञान आयात केले जाते तशी परदेशातील लोकशाहीची चौकट आपल्या देशातील वस्तुस्थितीचा विचार न करता येथे आणली तर चालू शकत नाही हे लक्षात ठेवणे आवश्यक आहे.

प्रमाणशीर प्रतिनिधित्वाच्या निवडणूकपद्धतीत सध्याच्या आपल्या पद्धतीतून उद्भवणारे असमतोल नाहीसे होतील; पण फुटीरवृत्ती, प्रादेशिकतावाद यासारख्या अनिष्ट प्रवृत्तींना प्रोत्साहन मिळणार नाही अशी तरतूद ही पद्धती लागू करण्याआधी करावी लागेल. लोक प्रतिनिधिपदावरून अयोग्य व्यक्तींना दूर करण्याचे अधिकार अप्रत्यक्षपणे मतदारांकडे असतील अशी व्यवस्थाही करावी लागेल. पक्षांतर्गत हुकुमशाहीला वाव राहू नये म्हणून उमेदवारांच्या निवडीबद्दलचे अधिकार पक्षनेतृत्वाकडे न ठेवता खालच्या पक्षशाखांच्या पदाधिकाऱ्यांकडे ठेवले पाहिजेत.

अशा अनेक गोष्टी विचारात घेऊन व प्रमाणशीर प्रतिनिधित्वाच्या पद्धतीवरील आक्षेप विचारात घेऊन एक सुधारित प्रमाणशीर प्रतिनिधित्वाची निवडणूकपद्धती खाली सुचविली आहे.

एखाद्या विशिष्ट मतप्रणालीचा प्रचार करण्याचा व त्या विचारप्रणालीला मतदारांची मान्यता असल्यास सत्ता मिळवून राज्यकारभारात योग्य ते बदल करण्याचा अधिकार लोकशाहीत प्रत्येक नागरिकास आहे; पण एकाकी व्यक्ती किंवा लहानसा गट सत्तेवर येऊ शकत नाही. राजकीय सौदेबाजी अशक्य होईल अशी घटनेत तरतूद केल्यास असे गट आपला प्रभाव पाडू शकणार नाहीत. म्हणून लहान पक्षांना व अपक्षांना निवडणुकीत भाग घेता येऊ नये अशी तरतूद एकूण देशाच्या हिताचीच ठरेल. निवडणुकीत भाग घ्यायचा असल्यास अपक्षांना किंवा लहान पक्षांना कोणत्या तरी पक्षात सामील व्हावे लागेल. निवडणुकीत भाग घेण्यास पात्र ठरण्याकरिता पक्ष किती मोठा असावा व ही पात्रता कोणत्या निकषावर ठरवावी यासारख्या गोष्टी तज्ज्ञ ठरवू शकतील. या गोष्टीदेखील घटनेत अंतर्भूत केल्या जाव्या? लहान पक्षांना निवडणुकांत भाग घेता न आल्याने त्यांना राजकीय महत्त्वाकांक्षा असल्यास जवळच्या मतप्रणालीच्या मोठ्या पक्षात विलीन व्हावे लागेल. वैयक्तिक कारणामुळे पक्षांचे तुकडे करण्याचा किंवा नवीन पक्ष काढण्याचा खेळ यामुळे बंद पडेल. या गोष्टी राष्ट्रीय एकतेला हितकारक ठरतील. तरी देखील भारतासारख्या देशातील वैविध्ये पाहता सात-आठ मोठे पक्ष राष्ट्रीय पातळीवर राहण्याची शक्यता आहे. एवढे पक्ष निवडणुकांत उतरले व कोणत्याही एका पक्षाला पूर्ण बहुमत मिळाले नाही तर राजकीय अस्थिरता येण्याची शक्यता आहे. आजच्याप्रमाणे निवडून आलेले लोकप्रतिनिधी जर हव्या तशा आघाड्या बनवायला स्वतंत्र असले, सत्तेचे एकमेव उद्दिष्ट समोर ठेवून तत्त्वशून्य तडजोडी करण्याची त्यांना मुभा असली तर देशात अस्थैर्य माजेल. या अडचणीवर मात करण्याकरिता पक्षांना जर आघाड्या करायच्या असल्या तर निवडणुकीपूर्वीच त्यांनी त्या केल्या पाहिजेत व निवडणुकीनंतर कोणत्याही घटक पक्षांना एक आघाडी सोडून दुसऱ्या आघाडीत सामील होता येणार नाही असे घटनात्मक बंधन पक्षावर घातले पाहिजे. असे केल्यास ज्या पक्षात काही महत्त्वाच्या आर्थिक व सामाजिक उद्दिष्टांविषयी समान विचार आहेत असे पक्ष एकत्र येऊन आघाडी बनवतील. अशा आघाडीच्या किमान कार्यक्रमाचा जाहीरनामा निवडणुकीपूर्वी प्रसिद्ध केला जाईल. निवडणुकीत प्रत्येक पक्ष आपल्या स्वतःच्या जाहीरनाम्याचा व ज्या आघाडीत तो सामील झालेला असेल त्या आघाडीच्या किमान कार्यक्रमाचा प्रचार करील. अशा आघाड्यांमुळे पक्षावर आपल्या आघाडीतील इतर पक्षांना मान्य नसलेल्या विचारांचा प्रचार न करण्याचे बंधन येणार नाही. मतदार मतदान करताना पक्षांनाच करतील; पण त्या पक्षांनी केलेली आघाडी पसंत नसल्यास मतदार मत न देऊन आपली नापसंती पक्षाला दर्शवील. त्यामुळे सत्तेकरिता तत्त्वशून्य आघाड्या करण्यास पक्ष धजणार नाहीत.

मतदार पक्षाच्या चिन्हावर शिक्का मारून पक्षाला मतदान करतील. एकूण मतदानाच्या जेवढ्या प्रमाणात एखाद्या पक्षाला मते मिळतील तेवढ्या प्रमाणात एकूण लोकप्रतिनिधींच्या जागांपैकी त्या पक्षाला जागा मिळतील. एखाद्या पक्षाला एकट्यालाच पूर्ण बहुमत

मिळाले तर तो स्वतःच्या जाहीरनाम्यानुसार कारभार करू शकेल. कारण आघाडीच्या इतर घटक पक्षांच्या आधाराची त्याला जरूर राहणार नाही. एखाद्या पक्षाला सत्तेवर येण्यात रस नसला तर तो कोणत्याही आघाडीत सामील न होता स्वतंत्रपणे निवडणुकांत भाग घेऊ शकेल.

पक्षातील लोकप्रतिनिधी म्हणून कोणत्या नेत्यांना निवडायचे ते ठरविण्याकरिता पक्षाच्या जिल्हापातळीवरील सर्व पदाधिकाऱ्यांचे एक निवडणूक मंडळ (electoral college) बनवावे. प्रथम प्रत्येक पक्षशाखेने योग्य वाटतील अशा एक किंवा दोन नावांची पक्षकार्यकारिणीला शिफारस करावी. या सर्व नावांतून लोकप्रतिनिधी निवडण्यासाठी पक्षीय निवडणूक मंडळाने मतदान करून नेत्यांबद्दलची पक्षातील लोकप्रियता ठरवावी. प्रेफरेन्शियल (preferential) मतदानपद्धतीनुसार मतदान करून त्यानुसार अशी यादी बनविता येईल. अशी यादी निवडणुकीच्या आधी जाहीर करण्याचे बंधन घटनेने पक्षावर घालावे म्हणजे अयोग्य व्यक्ती निवडून देण्यास पक्षीय निवडणूकमंडळाच्या सदस्यांवर दडपण येणार नाही. कारण अशा अयोग्य भ्रष्टाचारी व्यक्तींच्या नावांमुळे मतदार त्या पक्षाला मतदान न करण्याची शक्यता पक्ष लक्षात घेईल. पक्षाला निवडणुकीतील मतांच्या प्रमाणानुसार निवडणूकआयोग जेवढ्या जागा देईल तेवढ्या पक्षाच्या यादीतील पहिल्या क्रमांकाच्या उमेदवारांना निवडले गेले असे समजले जाईल. अशा निवडल्या गेलेल्या सर्व पक्षांच्या उमेदवारांची संसद बनेल. संसदेतील नेता वगैरे सध्याच्या पद्धतीनुसारच ठरविला जाईल.

प्रमाणशीर प्रतिनिधित्वाच्या पद्धतीत मतदारसंघ व त्या मतदारसंघातून निवडून आलेला लोकप्रतिनिधी हा प्रकार नसल्याने जनतेच्या अडचणी सोडविण्यास कोणीच पुढे येणार नाही, असा एक आक्षेप असू शकतो. सध्याच्या पद्धतीत सत्तारूढ पक्षातील लोकप्रतिनिधी आपल्या मतदारसंघाचा विकास व्हावा व विरोधकांच्या

---


# जनांचा प्रवाहो चालिला

लेखक : विनय हर्डीकर

आणीबाणीचं आसुरी आव्हान ओळखणारं,
त्या आव्हानानं अस्वस्थ होऊन पेटून उठणारं आणि
विकासशील वैचारिक निष्ठेनं या जुलमाला
प्रकटपणे हटकणारं.......विनयचं
संवेदनाक्षम, चिकित्सक, रसरशीत मन....

या मनाची
अन् या मनात पडलेल्या असंख्य, अथांग प्रतिबिंबांची
ही मार्मिक आणि मर्मभेदक कहाणी....

या लेखनाला कादंबरी म्हणावं की आत्मकथन ?
की आपलं कहाणीच ?
म्हणावं काहीही, एक खरं...
प्रांजळ मनानं वाचणाऱ्याला ही कहाणी मनोमन बोलकं करील,
अंतर्मुख करील, प्रत्येकापुढे निर्लेप आरसा धरील—
जबाबदारीनं, सहानुभूतीनं....आणि
आपुलकीच्या कडव्या उत्कटतेनं.

दुर्मिळ असे अस्सल बावनकशी क्षण विनय जगला.
ते वाया गेले नाहीत.
या कहाणीत त्या क्षणांना तितकंच अस्सल,
तितकंच बावनकशी रूप लाभलं आहे.

—प्रा. स. शि. भावे

प्रसिद्ध झाले

राजहंस प्रकाशन

१०२५ सदाशिव, पुणे ३०

मतदारसंघातील विकासाची कामे रेंगाळावी असा प्रयत्न करू शकतात. विकास हवा असेल तर सत्तेवर येण्याची शक्यता असलेल्या पक्षाच्या उमेदवारालाच मत द्या असा प्रचार देखील निवडणुकीत केला जातो, या सर्व गोष्टी भ्रष्टाचारात जमा होतात. कित्येक वेळा भ्रष्टाचारी नेते आपल्या मतदारसंघातील जनतेला खुष करून निवडून येतात व ज्यांचा त्यांना विरोध असतो अशा इतर मतदारसंघातील जनतेवर सत्ता गाजवितात. या गोष्टीला सध्याच्या पद्धतीत आळा घालणे अशक्य आहे. लोकांच्या अडचणी सोडविण्याकरिता प्रमाणशीर प्रतिनिधित्वाच्या पद्धतीने निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींना यापेक्षा जास्त योग्य प्रकारे भाग पाडता येईल. प्रत्येक पक्षाने आपले जेवढे उमेदवार निवडले गेले तेवढ्या विभागात देशातील पक्षशाखांचे गट बनवावे व अशा प्रत्येक गटाला एकेक उमेदवार जबाबदार ठरवावा. जनतेच्या अडचणी पक्षशाखांनी त्या लोकप्रतिनिधीपर्यंत पोचवाव्या व त्याच्याकडून त्या सोडवून घ्याव्या. या पद्धतीमुळे ग्रामीण पातळीवरील तळाच्या पक्षकार्यकर्त्यांना सत्ता व प्रतिष्ठा लाभेल. आज जसे दोन निवडणुकांच्या मधल्या काळात पक्षकचेऱ्यांना काही काम नसते तशी स्थिती येणार नाही. पक्षकार्यकर्ते जनतेत खरे समाजकार्यकर्ते ठरतील. जर पक्षशाखांना त्या लोकप्रतिनिधीचे कार्य समाधानकारक वाटले नाही तर त्या पक्षशाखांना दोनतृतियांश मताधिक्याने त्या प्रतिनिधीवर अविश्वास व्यक्त करून त्याला काढून टाकता येण्याची तरतूद ठेवावी. अशा तरतुदीमुळे तो लोकप्रतिनिधी त्या भागातील पक्षशाखांना व पर्यायाने जनतेला जबाबदार राहील. लोकप्रतिनिधीचे लोकप्रतिनिधित्व रद्द करण्याचा हक्क अशा प्रकारे पक्षाकडे ठेवल्यामुळे उगीचच असंतोष भडकवून लोकप्रतिनिधीला ब्लॅकमेल करण्याची शक्यता राहात नाही. या प्रकारे स्थानिक जनतेशी पक्षशाखा जास्त संपर्क साधतील, मतदार आपल्या अडचणींचे निवारण करण्याकरिता स्थानिक कार्यकर्त्यांकडे सहज जाऊ शकतील. पक्ष हे फक्त निवडणुकीत मत मागण्यापुरतेच आज जनतेकडे जातात, हा फार मोठा आक्षेप त्यामुळे नाहीसा होईल. मतदारांचा उमेदवार प्रत्येक ठिकाणी निवडून आलेला असल्याने त्यांना आधार वाटेल. लोकप्रतिनिधी पक्षशाखांच्या द्वारा त्या मतदारांशी संपर्क साधील. त्या मतदारांच्या अडचणी तो लोकप्रतिनिधी सोडवू शकत नसल्यास पक्षशाखा त्याचे प्रतिनिधित्व काढून घेऊन त्या ठिकाणी पक्षाच्या यादीतला दुसरा उमेदवार मिळवू शकतील. एखाद्या लोकप्रतिनिधीचे निधन झाले किंवा एखाद्याचे प्रतिनिधित्व काढून घेतले तर पोटनिवडणुका घेण्याची आवश्यकता या पद्धतीत राहात नाही. पक्षाच्या उमेदवारांच्या यादीतील क्रमाने पुढचे उमेदार निवडून आल्याचे घोषित करणे, एवढेच काम फक्त निवडणूक-आयोगाला राहील.

## राजकीय शिक्षण

या पद्धतीमुळे सर्व पक्ष आपल्या विचारांचा खेड्यापाड्यांतून प्रसार करण्याचा प्रयत्न करतील व त्याकरिता पक्षशाखा सुरू करतील. खेड्यातल्या मागासलेल्या जनतेला यामुळे खरेखुरे राजकीय शिक्षण मिळेल. सध्याच्या पद्धतीमध्ये निवडून येणारा उमेदवार आपल्या मतदारसंघातून विरोधकांच्या कार्यकर्त्यांना नेस्तनाबूत करण्याच्या किंवा सामदामादि उपायांनी आपल्या पक्षात आणण्याचा प्रयत्न करतो. खेड्यापाड्यांतून पक्षकार्यकर्ते म्हणून टिकून राहायचे असले तर गुंडगिरी करण्याची पात्रता आज अंगात असावी लागते. पडेल उमेदवाराच्या कार्यकर्त्यांची निवडणुकांनंतर फार वाईट अवस्था होते. या तळाच्या कार्यकर्त्यांना प्रतिष्ठेने व निर्भयपणे आपले काम करणे वर सुचविलेल्या पद्धतीत शक्य होईल. पक्षबांधणी करणे म्हणजे गुंडांना पोसणे हे जे समीकरण आज आढळते ते चुकीचे ठरेल. प्रामाणिक, बुद्धिमान व लोकशाहीवर श्रद्धा असलेली माणसे पक्षकार्यकर्ते म्हणून कार्य करण्यास पुढे येतील. तथाकथित 'जनतेचा आवाज' उठविणाऱ्या भाडोत्री कार्यकर्त्यांची सेना जवळ बाळगणाऱ्या सरंजामदारांना हजारो अनुयायांसह एका पक्षातून दुसऱ्या पक्षात सन्मानपूर्वक जाण्याची जी आज सोय आहे ती नाहीशी होईल.

या पद्धतीत आजच्याप्रमाणे एका पक्षास प्रचंड बहुमत व विरोधकांना थोड्याशा जागा असा प्रकार घडण्याची शक्यता फारच कमी राहील व त्यामुळे सत्तेचा समतोल राहील. प्रत्येक पक्षाला आजच्यापेक्षा जास्त जबाबदारीने वागावे लागेल. प्रादेशिक तंट्यात दोन शेजारच्या राज्यांत आज जसे हे पक्ष विरोधी भूमिका घेऊ शकतात तसे या पद्धतीत करता येणार नाही. धर्म, जात यांचा पगडा कमी होईल. निवडणुकांत उधळपट्टी करण्याचे टाळता येईल. प्रचार, हेवेदावे व मारामाऱ्या यांच्यापासून निवडणुका मुक्त ठेवणे शक्य होईल. निवडणुका आज लढविल्या जातात त्या या पद्धतीप्रमाणे शर्यतीसारख्या खेळल्या जातील. थोड्याशा मतांच्या फरकामुळे निवडणुकीत मिळणाऱ्या जागांवर आजच्याप्रमाणे प्रचंड परिणाम घडणार नसल्यामुळे राज्यकर्त्यांना देशहिताचे निर्णय कोणत्याही तडजोडी न करता ठामपणे राबविता येतील. सत्ताधारी पक्षाला खाली खेचणे हेच एकमेव राजकारणाचे उद्दिष्ट मानून डावपेच लढविण्यात शक्ती वाया घालविणारे संसदीय राजकारण बंद होईल. कारण सत्ताधारी पक्षाचा अशा पद्धतीने पराभव करून विरोधकांना सत्ता मिळविता येणार नाही. आज जे व्यक्तीकडे, म्हणजेच उमेदवाराची जात, धर्म, नाते यासारख्या गोष्टींकडे पाहून मत दिले जाते त्याऐवजी, पक्षाच्या विचाराकडे पाहून मत द्यायचे असल्यामुळे सामान्य मतदार पक्षाचे विचार समजून घेण्याचा प्रयत्न करील. जे पक्ष उक्ती व कृती यात मेळ राखीत नाहीत ते अविश्वासार्ह ठरतील.

आज जर सर्वांत महत्त्वाच्या अशा कोणत्या एका गोष्टीचा आपल्या निवडणुकात अभाव असेल तर तो पक्षांच्या प्रामाणिकपणावरील विश्वासाचा. जोपर्यंत मतदाराला राजकारणी पक्षाच्या प्रामाणिकपणाची खात्री पटत नाही तोपर्यंत आपली लोकशाही धोक्यात आहे आणि जोपर्यंत पक्षांच्या तळाचे कार्यकर्ते मानाने व निर्भयपणे आपले काम करू शकत नाहीत तोपर्यंत अशी विश्वासार्हता मतदारांच्या मनात निर्माण करणे अशक्य आहे. पक्षांचे जाहीरनामे व नेत्यांची आश्वासने यातील शब्दांना आज अर्थ राहिलेला नाही. त्यात अर्थ आणायचा असल्यास निवडणूकपद्धती व पक्षयंत्रणा यात आमूलाग्र बदल होणे आवश्यक आहे.

□

लुइजी पिरँदेलो, ज्याँ अनुई, बरटॉल्ट ब्रेख्ट
युरोपमधील गेल्या काही शतकातील या प्रमुख न–नाटककारांचा परिचय
लेखकाने यापूर्वी माणूसमधून ( जून, ७६ ) करून दिला होता.



# कळसूत्री माणसांच्या एका आगळ्याच दुनियेत व्यक्तिमत्वाचं गूढ शोधणारा श्रेष्ठ न-नाटककार

# यूजीन आयोनेस्को

प्रा. शांताराम शिंदे

नाटककार आयोनेस्को हा जगातल्या नाट्य–लेखनइतिहासातला एक चमत्कार आहे.

वयाच्या छत्तिसाव्या वर्षापर्यंत त्यानं एकही नाटक लिहिलं नव्हतं. आपण नाटककार होऊ असं त्याला कधी स्वप्नात तरी वाटलं होतं की नाही कुणास ठाऊक ! पण छत्तिसाव्या वर्षी एक छोटंसं नाटक त्यानं लिहून काढलं. दोन वर्षांनी त्याचा पहिला प्रयोग झाला आणि आपटला. सतत सहा वर्षं त्याच्या या नाटकाचे आणि इतर काही छोट्या नाटकांचे प्रयोग होत राहिले आणि आपटत राहिले. कधीकधी फक्त तीनच प्रेक्षक रंगमंदिरात असायचे आणि प्रयोग बंद करावा लागायचा !

फक्त सहा वर्षांत यक्षिणीची कांडी फिरावी तसा चमत्कार झाला आणि आयोनेस्को एक विश्वविख्यात नाटककार होऊन बसला. आपल्याला नाटकं आवडत नाहीत, त्यापेक्षा सिनेमा बरा, बाहुल्यांचा खेळ बरा, असं म्हणणारा आयोनेस्को कायमचा नाटककार होऊन बसला. एक अतर्क्य अपूप घडून गेलं.

हा विरोधाभास आणि अंतर्विरोध आयुष्यभर त्याची साथ करीत होता. १९६८ मध्ये त्यानं आपल्या आठवणी लिहून प्रसिद्ध केल्या. तिथंही तेच ! तो म्हणतो– 'मी अशा एका माणसाच्या आठवणी लिहितो आहे की, जो आपली स्मरणशक्तीच हरवून बसलाय !' आता अशा लेखकाच्या आठवणी कशाला वाचायच्या ? पण वाचायला सुरुवात केली की उडत्या गालिच्यावरून वाचकाला अशा ठिकाणी घेऊन जातो की वाचक स्वतःलाच विसरून बसतो. स्वतःचं व्यवहारी व्यक्तिमत्त्व विसरून जातो– मी एक डॉक्टर आहे, एक शिक्षक आहे, एक पत्रकार आहे, एक व्यापारी आहे– असलं व्यक्तिमत्त्व विसरतो आणि 'मी कोण आहे ?' 'हे जग काय आहे ?' 'आयुष्य म्हणजे काय ?' असे व्यक्तित्वांशाचे शोध घेणारे विलक्षण प्रश्न लेखकाबरोबर विचारू लागतो. शेवटी त्याच्याशी एकरूप होऊन वाचकही म्हणू लागतो– 'मृत्यू काहीही असो ! मी आहे म्हणजे आहे ! असणार ! मी संपणार नाही ! मी अमर आहे ! अनंत आहे !'

पण हे विलक्षण प्रश्न आजच माणसाला सतावताहेत. या विसाव्या शतकात. दोन महायुद्धांनी होरपळून निघालेल्या युरोपीय देशात हिटलर आणि हिरोशिमा या दोन हिंस्र शब्दांनी दचकून भानावर आलेला आयोनेस्को आपल्या दैनंदिनीत लिहितो–

'एक काळ होता– फार फार वर्षांपूर्वी– जेव्हा माणसाला हे जग अर्थाशयांनी संपन्न दिसलं... त्या वेळी असे विलक्षण प्रश्न विचारायला माणसाला सवडच कुठं होती ?– अत्यंत समाधानाची गोष्ट म्हणजे देवांच्या अस्तित्वाच्या खुणा जागोजाग दिसत होत्या... हे सगळे देव हे जग सोडून कधी बरं निघून गेले असावेत ?... आम्हाला आमच्यावर सोपवून देव निघून गेले आणि भोवताली उरला फक्त एकांत, फक्त भीती...आणि या प्रश्नांचा जन्म झाला– काय आहे हे जग ? कोण आहोत आम्ही ?...'

'खुर्च्या' हे आयोनेस्कोचं एक गाजलेलं नाटक. त्याचा विषय काय ? सिल्व्हियन धोम या दिग्दर्शकाला लिहिलेल्या एका पत्रात आयोनेस्को म्हणतो– 'माझ्या या नाटकाचा विषय रिकाम्या खुर्च्या हाच आहे. म्हणजे लोकांचा अभाव, सम्राटाचा अभाव, देवाचा अभाव– आध्यात्मिक शून्य !...'

आपली आजची संस्कृती वस्तूंचा पसारा मांडण्यात धन्यता मानते. खुर्च्या, टेबलं, कपाटं यांच्या पसाऱ्यात माणूसच हरवून गेलेला आहे. इतरांना दिसेनासा झाला आहे आणि स्वतःला गवसेनासा झाला आहे. वस्तूंच्या वाढत्या पसाऱ्यात हरवलेला माणूस हा आयोनेस्कोच्या अनेक लहानमोठ्या नाटकांचा विषय आहे. 'द किलर' या नाटकात लष्करी ट्रक्सनी जाम झालेले रस्ते आहेत, 'द न्यू टेनंट' या नाटकात फर्निचरमध्ये हरवलेला नवा भाडेकरू आहे, तर 'खुर्च्या' या नाटकातलं नव्वदी ओलांडलेलं जोडपं रिकाम्या खुर्च्यांनी रंगमंच भरून गेल्यावर मनोऱ्यावरून उड्या टाकून आत्महत्या करतं ! वस्तूंच्या पसाऱ्यात माणूस स्वतःला आणि देवाला हरवून बसलेला आहे, या शोकाकुल करून टाकणाऱ्या भयाण स्थितीची इतकी हास्य-विव्हल करून टाकणारी प्रहसनं इतक्या बोधदुर्लभ शैलीत कुणीही लिहिली नसतील ! परंतु या प्रहसनांचा गंभीर आशय शेवटी सर्वांना

मान्यच करावा लागला. अनूईनं तर 'खुर्च्या' या नाटकाचा 'एक अप्रतिम कलाकृती' म्हणून गौरव केला. १९५६ साली झालेल्या प्रयोगानंतर अनूईनं लिहिलं की, 'हे नाटक स्ट्रिंडबर्गपेक्षाही प्रभावी आहे. कारण यातला काळा विनोद भयंकर गुदगुल्या करतो, हसवता हसवता भयभीत करून सोडतो; त्यामागं दडलेला अर्थाशय तीव्र आणि सत्य आहे...'

या नाटकाची स्तुति करणारे अनेक लेख प्रसिद्ध झाले. 'आर्टस्' या नियतकालिकात प्रसिद्ध झालेल्या स्तुतिलेखाखाली आठ–दहा विख्यात लेखक–दिग्दर्शक– आणि नटांच्या सह्या होत्या. त्यात सॅम्युएल बेकेट होता आणि विख्यात कवि आणि कादंबरीकार रेमंड क्वीनो हासुद्धा होता. या नाटकानं आयोनेस्कोला जगद्विख्यात करून सोडलं, तरीसुद्धा अजूनही क्वचित काही ठिकाणी त्याची नाटकं चांगलीच आपटी खात होती. उदाहरणार्थ, याच काळात त्याच्या 'द लेसन' या नाटकाचा ब्रुसेल्स इथं प्रयोग झाला तर प्रेक्षकांनी दंगा करून नाटक बंद पाडलं, पैसे परत मागितले आणि नाटकात प्रमुख भूमिका करणाऱ्या नटाला जीव घेऊन पलायन करावं लागलं...

असे ख्याति– कुख्यातीचे हेलकावे खात आयोनेस्को जगासमोर येत गेला– वाढत, फुलत, बहरत गेला आणि १९६९ साली त्याचं नाव नोबेल पारितोषिकासाठी पाठविण्यात आलं, त्यालाच ते पारितोषिक मिळणार असं जवळजवळ नक्की झालं आणि थोडक्यात हुकलं! त्या वर्षीचं नोबेल पारितोषिक सॅम्युअल बेकेटला मिळालं– म्हणजे एका न– नाटककारालाच मिळालं. बेकेटला हे पारितोषिक जाहीर करताना पारितोषिकसमितीनं या गोष्टीचा जाहीर उल्लेखसुद्धा केला. बेकेटला हा मान मिळाला म्हणून ज्यांना-ज्यांना आनंद वाटला त्यांनीसुद्धा आयोनेस्कोला तो मान मिळाला नाही म्हणून प्रकटपणानं हळहळ व्यक्त केली.

विरोधाभास आणि अंतर्विरोध यांनी आडव्याउभ्या विणलेल्या आयोनेस्कोच्या आयुष्यात नोबेल पारितोषिकाची ही करुणमधुर हकीकत कशी छान उठून दिसते!

या हकीकतीच्या आधीच– तब्बल तीस वर्षांपूर्वी– १९३९ साली हरविलेलं बालपण शोधायला गेलेला आयोनेस्को दैनंदिनीत लिहितो "मी एकसारखा लिहितोय, लिहितोय, लिहितोय... हे सगळं कुणाला गोड वाटणाराय? माझं दुःख, माझी निराशा, इतरांपर्यंत पोचविणं मला शक्य तरी आहे काय?... मला कुणीच ओळखत नाही... तसा मी कुणीच नाही... तरी सुद्धा जगातल्या इतर सगळ्या माणसांसारखाच मीही एक आहे... जो कुणी माझ्या अंतरंगात डोकावून पाहील त्याला त्याची स्वतःचीच प्रतिमा दिसेल..'

न– नाट्याचा हा श्रेष्ठ पुरस्कर्ता (आणि जनकसुद्धा!) आयुष्यभर स्वतःलाच शोधीत होता असं दिसतं. "मी ज्याचा शोध घेतोय ते अगदी माझ्याजवळ आहे... हे मला नक्कीच ठाऊक आहे... पण ते मला नीटसं कळत नाही, माझं मलाच ते दिसत नाही–" असं जेव्हा तो लिहून जातो तेव्हा "तुझे आहे तुजपाशी। परी तू जागा चुकलासी" म्हणणारा संतश्रेष्ठ तुकाराम जणू काही फ्रेंच बोलीत आपले खडे बोल सुनावतो आहे असं वाटतं.

"द किलर" या नाटकात एक म्हातारा ज्याला त्याला विचारतो–' डॅन्यूब नदीकडं कोणती वाट जाते हो?' नाटकाच्या नायकाला-बेरेंजरला विचारतो, पोलिसाला विचारतो, सैनिकाला विचारतो, सर्वांना विचारतो. वास्तविक तो पॅरिसच्या रस्त्यात उभा आहे, एवढंच नव्हे तर पॅरिसचाच कायमचा रहिवासी आहे. त्याला नक्कीच ठाऊक आहे की पॅरिसमध्ये डॅन्यूब नदी नाही. म्हणजे हा शुद्ध मूर्खपणा झाला. न–नाट्यातल्या संवादपद्धतीची ही एक झलक आहे; पण या म्हाताऱ्याच्या तोंडून आयोनेस्कोच बोलतोय. डॅन्यूबच्या खोऱ्यात, रुमानियात, जन्माला आलेला, मायदेशाला पारखा झालेला, वयाच्या चौथ्या वर्षापासून वडील, भाऊ, बहीण, आपलं घर, गृहस्थी कुटुंब असला वत्सल गोतावळा युद्धाच्या फटक्यानं गमावून फ्रान्समध्ये स्थायिक झालेला प्रौढ आयोनेस्को आपलं बालपण शोधतोय, स्वतःलाच शोधतोय, हे जर लक्षात घेतलं तर म्हाताऱ्याचा हा वेडा प्रश्न केवढा करुण होऊन उठतो! आयोनेस्कोनं 'द लेसन' या आपल्या नाटकाचं वर्णन 'शोकात्म प्रहसन' असं केलंय. 'हसऱ्या पापण्यांच्या काठावर थरथरणारा शल्य तीक्ष्ण दुःखाचा थेंब' असंच आयोनेस्कोच्या सगळ्या उत्तम नाट्यकृतींचं वर्णन करावं लागेल.. आणि या वर्णनाच्या भिंगातून पाहिल्यावर त्याच्या नाटकातून वारंवार येणाऱ्या आत्महत्या आणि मृत्यू यांचा सुद्धा अन्वयार्थ मनावर डाग दिसल्यासारखा बिंबून जातो. 'द लेसन' या नाटकात चाळीस मृत्यू आहेत, 'खुर्च्या' या नाटकात नव्वदीच्या पलीकडचं जोडपं आत्महत्या करतं आणि त्यांचं वय नव्वदीच्या पुढचं आहे एवढं नीट ध्यानात घेतल्यावर रंगमंचावरच्या प्रत्येक रिकाम्या खुर्चीतला न येऊ शकलेला प्रत्येक माणूस केव्हाच मरण पावलेला आहे ही सूचना केवढी भीतिदायक, भयंकर, भीषण आहे!), 'द किलर' या नाटकात तर मृत्यूची साखळीच आहे आणि शेवटीही नायकाचा मृत्यू आहे. 'आमिदी' या नाटकात तर एक प्रेतच सर्व पात्रांत जिवंत आणि चैतन्यपूर्ण आहे, 'ऱ्हायनोसरस' या नाटकात शहरातली सगळी माणसं, पुरुषांप्रमाणे स्त्रियासुद्धा, मनुष्यरूप टाकून ऱ्हायनो होतात, याचा अर्थ माणसाचाच नव्हे तर मानवी संस्कृतीचाच मृत्यू आहे! मृत्यु आणि मृत्युभीती हे आयोनेस्कोच्या जवळपास सगळ्याच नाटकांचे स्थायी कथागर्भ (themes) आहेत. त्यानं आपल्या दैनंदिनीत लिहून ठेवलं– 'मृत्यूच्या भीतीनं माझा फार छळ केलाय, अजून तो छळ संपलेला नाही!' पुढे याच दैनंदिनीत त्यानं एक भव्य आशावादसुद्धा नोंदवून ठेवलाय. तो लिहितो– 'सर्वांचे डोळे क्षितिजावर खिळून आहेत. हा प्रकाश केव्हा एकदा वितळतो आणि एका अनंत विराट प्रकाशात विरघळून जातो त्याची सगळे वाट पहात आहेत...'

'द किलर' या नाटकात रम्य सुखालय अशा बालपणापासून प्रौढपणापर्यंत आणि वस्तूंच्या पसाऱ्यात हरवलेल्या प्रौढपणापासून (आपण मरायचं हे खरं परंतु का म्हणून मरायचं असा असह्य संताप करीत भोगाव्या लागणाऱ्या) अटळ मृत्यूपर्यंत व्यक्तीच्या जीवनातला शोकप्रवास दाखविलेला आहे. या उलट 'आमिदी' या नाटकात मृत्यूपासून मुक्तीपर्यंतचा विलक्षण प्रवास दाखविलेला आहे.

असं भव्य संसारदर्शन उभं करणाऱ्या आयोनेस्कोची न– नाटक-

कार म्हणून आजही आपल्याकडे विटाळहेटाळणी होते तेव्हा अचंबा वाटतो. वास्तविक पिरँदेलोपासून सुरू झालेला हा व्यक्तित्व आणि अस्मिताशोधाचा प्रवास चेकॉव्हचं एकमेव आणि एकांगी वळण घेऊन आयोनेस्कोच्या काव्योदात्त हिमशिखरावर लखलखीत स्थिरावून बहरलेला आहे, तर्कशास्त्रापलीकडच्या कल्पकतेच्या तीरावरच्या शांग्रिला देशात संपन्न झालेला आहे, ही सांगून पटणारी गोष्ट नव्हे ! तिचा प्रत्यक्ष कलानुभवच घ्यायला हवा! यायला हवा ! आस्वादायला हवा ! कलात्म संवेदनांच्या तल्लख जिव्हांनी चाखायला हवा !

........................

आयोनेस्कोचा जन्म १९१२ साली रुमानियात झाला. आई फ्रेंच होती, त्यामुळं अर्थातच त्याची मातृभाषा फ्रेंचच झाली. पितृभाषा रुमानियन तो वयाच्या तेराव्या वर्षी शिकला आणि तिशी ओलांडल्यानंतर इंग्रजी शिकला. त्याचं संपूर्ण शिक्षण मात्र फ्रान्समधे फ्रेंच भाषेच्या माध्यमातूनच झालं. भाषेच्या या तिरंगी अभ्यासामुळंच असेल कदाचित, की तो मानवी भाषेचाच अव्हेर करून उठला ! भाषा हे विचारांच्या देवाणघेवाणीचं माध्यम होऊ शकतं यावरचा त्याचा विश्वासच उडून गेला. माणूस शब्द वापरतो, भाषा वापरतो ते सत्य झाकण्यासाठी, स्वत्व लपविण्यासाठी, अशी त्याची खात्री झाली. म्हणूनच आपल्या अनेक नाटकांतून आयोनेस्कोनं भाषा पार मोडून टाकली आहे, शब्द अस्ताव्यस्त विसकटून टाकलेत आणि वाक्यांचे संदर्भच पार बदलून टाकलेत ! 'द लेसन' या नाटकात प्रोफेसर आपल्या शिष्येचा खून करतो. हातात चाकू असला तरी हा खून तो शब्दांनीच घडवून आणतो आणि शेवटी प्रोफेसरची मोलकरीण नाटकाचा सारांशच बोलून जाते–' गणितातून भाषाशास्त्र निर्माण होतं आणि भाषाशास्त्रातून गुन्हेगारीचा जन्म होतो !'

आयोनेस्को चार वर्षांचा असताना त्याचे वडील युद्धावर गेले. जर्मनीचा पाडाव झाला, त्यात अनेक मारले गेले, अनेक पकडले गेले. आपला नवराही युद्धात मारला गेला असावा असं समजून आयोनेस्कोला त्याच्या आईनं मुकाट सांभाळलं. काबाडकष्ट केले; परंतु युद्ध संपल्यानंतर दोनेक वर्षांनी एकाएकीच आपल्या नवऱ्याचा शोध घ्यायचं तिच्या मनात आलं आणि आपला नवरा मारला गेला नाही, तर जिवंत आहे आणि खुशाल दुसरं लग्न करून संसार थाटून बसला आहे असं तिच्या ध्यानात आल्यावर–धक्का बसला तरी– तिनं मुकाट माघार घेतली. आयोनेस्कोला चार-सहा महिने त्याच्या वडिलांच्या नव्या घरी तिनं ठेवून बघितलं. त्या नव्या घरात नव्या बायकोच्या आणि तिच्या माहेरच्या लोकांचा वरचष्मा होता. साहजिकच छोट्या आयोनेस्कोचा तिथं छळ झाला. नव्या बायकोची लीना म्हणून एक धाकटी बहीण होती. ती सर्वांचीच घरात लाडकी. तिनं तर छोट्या आयोनेस्कोच्या बालसुलभ हट्टांचासुद्धा पार चेंदामेंदा करून टाकला. आयोनेस्कोच्या आईनं भोगलेला हा वैवाहिक जीवनातल्या प्रतारणेचा दाह आयोनेस्कोच्या कण्यामणक्यात कायमचा बुदबुदत राहिला. म्हणूनच त्याच्या अनेक नाटकांतून पतिपत्नींची बदसूर संसारचित्रं विकटरूप घेऊन आपल्यासमोर येतात. 'जॅक्स' या नाटकात जॅक्स या तरुण पोराला घरचे लोक आणि ज्या मुलीशी त्याचे लग्न व्हायचे आहे तिच्याकडचे सगळेच लोक एक वाक्य म्हणायला भाग पाडतात. 'मला बिनसोललेले बटाटे आवडतात'–हे ते वाक्य ! जॅक्स काही केल्या हे वाक्य म्हणायला तयार होत नाही. 'तुला रॉबर्टाबरोबर लग्न करायचं आहे ना, मग म्हण हे वाक्य !'–असंच जणू काही सर्वांना सुचवायचं असतं. त्याची बहीणसुद्धा त्याला आग्रह करते. तो ऐकत नाही असं पाहून 'घड्याळाचा काटा' म्हणून हिणवते आणि तो शरणागती पत्करतो. सर्वांहून वेगळं व्हायचं त्याचं स्वप्न चिरडून जातं आणि कुटुंबसंस्थेचा तो केवळ एक घटक होऊन जातो. बंडखोर व्यक्तिमत्त्वाचा जॅक्स हळूहळू स्वतंत्र व्यक्तिमत्त्व गमावून बसतो आणि सर्वांसारखाच एक प्रजननशील पशू होऊन जातो. ही व्यक्तिस्वातंत्र्याची शोकांतिका नाट्य म्हणून समोर येते तेव्हा त्याचं हास्यरूप भयंकर भयभीत करून सोडतं. या नाटकाला 'सब्मिशन' (शरणागती) असं एक पर्यायी नाव आयोनेस्कोनं दिलेलं आहे. नाटकाच्या शेवटी जॅक्सची संपूर्ण शरणागती दाखविली आहे आणि कुटुंबसंस्थेचा हा विजय साजरा करण्यासाठी नाटकाच्या शेवटी जॅक्स आणि रॉबर्ट या नवपरिणित युगुलाच्या भोवती दोन्ही कुटुंबातली माणसं फेर धरतात आणि बीभत्स हावभाव करीत नाच करतात. 'आमिदी' या नाटकातसुद्धा याच विषयाची इलेक्ट्रिक गिटार ऐकू येते. दुसऱ्या अंकाच्या शेवटी अंधाराची वाट पहात बसलेल्या आमिदा आणि त्याची पत्नी मेदलीन यांना एक स्वप्नदृश्य दिसतं. या दृश्यात आमिदी सुखस्वप्नात हरवून जातो आणि म्हणतो –'आपण सुखी आहोत. काचेच्या घरात. प्रकाशाच्या घरात. आणि मेदलीन म्हणते –'पितळेच्या घरात. रात्रीच्या घरात !' दोघांच्या परस्परविरोधी स्वभावानं केलेला वैवाहिक जीवनाचा फजितवाडा हा या नाटकाचा विषयसुद्धा छोट्या आयोनेस्कोनं भोगलेल्या दुःखाच्या काषायरंगात न्हाऊन निघालेला आहे.

आयोनेस्कोच्या बालपणीचे आणखी दोन अनुभव त्याच्या नाट्यलेखनपद्धतीच्या दृष्टीने महत्त्वाचे आहेत. अगदी लहान असताना, पॅरिसमधल्या लुक्सेम्बुर्ग पार्कमध्ये त्याची आई त्याला घेऊन जात असे. तिथे चाललेला कळसूत्री बाहुल्यांचा खेळ पाहताना तो इतका तल्लीन व्हायचा की, आईनं कितीही सांगितलं तरी तो तिथून हलायचा नाही की तिलाही जाऊ द्यायचा नाही ! पंच आणि जूडी या बाहुलाबाहुलीमध्ये चाललेला प्रणय, कलह, अबोला, आनंद आणि दुःख यांचा खेळ त्याला बेभान करून टाकी. चालत्याबोलत्या जिवंत माणसांपेक्षाही हे बाहुले त्याला जास्त जिवंत वाटले असावेत, म्हणूनच त्याच्या नाटकातली अनेक पात्रं अशी बाहुलाबाहुलींसारखी कळसूत्री आहेत. त्याच्या प्रारंभीच्या नाटकातली पात्रं वाढत नाहीत, बदलत नाहीत, विकास पावत नाहीत. त्याची नाटकं कुठलीही, कसलीही कथा सांगत नाहीत त्यामुळं घटनांच्या साखळीतून कथेचा विकास ही गोष्ट सुद्धा असंभाव्य ! 'फक्त एकाच अवस्थेचं चित्र'

**म्हणून त्याच्या अनेक नाटकांतून पतिपत्नींची बदसूर संसारचित्रं आपल्याला दिसतात.**

असं त्याच्या नाटकांचं वर्णन करता येईल. मात्र हे चित्र शोभायंत्रात दिसणाऱ्या आकृत्यांसारखं विविध रूपी आहे, विविध रंगी आहे, विविध अंगी आहे. माणसंच सगळी कळसूत्री होऊन गेली आहेत. ती स्वतःला विसरून गेली आहेत. आपण कोण आहोत याचीच आठवण हरवून बसली आहेत. 'व्हिक्टिम्स ऑफ ड्यूटी' या नाटकात शूबर्ट हा नायक स्मरणशक्तीच हरवून बसलाय. त्याच्या मेंदूत निर्माण झालेली ही पोकळी भरून काढण्यासाठी त्याला त्याचे कुटुंबीय आणि मित्र एकसारखं खायला घालतात. तोही समोर येईल ते बकाबका खात सुटतो; पण पोकळी काही भरून निघत नाही. सार्त्रच्या अस्तित्ववादात माणूस हीच एक पोकळी आहे या विश्वातली. या विश्वपसाऱ्याच्या केंद्रस्थानी असलेलं शून्य म्हणजे माणूस. म्हणून त्याचा स्वभाव, त्याचे गुणदोष, त्याचं कर्तृत्व किंवा त्याचा नकर्तेपणा या गोष्टींचा विचार आयोनेस्कोच्या नाटकातून कधीच डोकावत नाही. 'माणसाला व्यक्तिमत्त्व नाही' असं तो साफ स्वच्छ सांगून टाकतो. मग नाटकातून काय दाखवायचं? तर माणसामाणसामधला कंटाळवाणा संवादखेळ, बीभत्स शृंगारचेष्टा आणि बाहुलाबाहुलीत चालतो तसला निर्जीव (तरी हास्यप्रस्फोटक) भावव्यवहार! 'द बाल्ड प्रायमाडॉना' या त्याच्या पहिल्याच नाटकात श्री. आणि सौ. मार्टिन पाहुणे म्हणून श्री. आणि सौ. स्मिथ यांच्या घरी येतात. श्री. आणि सौ. स्मिथ कपडे बदलण्यासाठी आत जातात तेव्हा श्री. आणि सौ. मार्टिन यांच्यामध्ये जो 'संवाद' होतो तो अनेक दृष्टींनी महत्त्वाचा आहे. श्री. मार्टिन हळूच सौ. मार्टिनकडे बघतो आणि म्हणतो—'मी तुम्हाला कुठं तरी पाहिल्यासारखं वाटतं!' नंतरच्या संवादात दोघांच्याही ध्यानात येतं की दोघंही एकाच फ्लॅटमध्ये राहतात आणि एकाच अंथरुणात गेली कित्येक वर्षं झोपतात. अरेच्या! म्हणजे मग दोघेही पतिपत्नी असली पाहिजेत हे दोघांच्याही ध्यानात येतं. म्हणजे अनेक वर्षं एकत्र संसार करूनही एकाला दुसऱ्याची ओळख पटली असेलच असं नाही! सहवासानं, सहभावना, सहसंवेदना निर्माण होतेच असं नाही तर! याचं कारण एकच—माणूस हा नुसता ठोकळा होऊन गेलाय. लाकडाच्या ठोकळ्यात, बाहुलाबाहुलीत, कसली होणाराय विचारांची किंवा भावनांची देवाणघेवाण! या जगात सगळीच देवाणघेवाण अशक्य आहे. कारण या जगात सगळंच अप्रज्ञ (Absurd) आहे.

दुसरा अनुभव आयोनेस्को आठ वर्षांचा असतानाचा आहे. पॅरिसमध्ये त्याला ॲनिमिया झाला म्हणून एका दूरच्या मामाच्या घरी—एका खेड्यात—डॉक्टरांनी हवापालट करण्याचा सल्ला दिला म्हणून—त्याला ठेवण्यात आलं. हा मामाही व्याधिग्रस्त. हवापालटासाठी कायमचाच खेड्यात जाऊन राहिलेला. त्याच्या भल्याथोरल्या वाड्यात आयोनेस्को पोरवयात जाऊन राहिला. तो भलामोठा वाडा, त्या खेड्यातली शाळा, शाळेतले खेडूत विद्यार्थी-सोबती, भोवतालच्या परिसरातला 'रहस्यमय' प्रकाश, एखाद्या किल्ल्यासारखं दिसणारं तिथलं चर्च, शेतावर काम करणारी मुलं-माणसं, रात्र पडली रे पडली की जाणवणारा एकांत, तिथल्या भुताखेतांच्या गोष्टी आणि अशा गोष्टी ऐकून पडणारी भयानक स्वप्नं,—या सगळ्या गोष्टींची आयोनेस्कोच्या मनावर छिन्नी-हातोडीनं कोरल्यासारखी चित्रं कायमची उमटली. त्या अनोख्या खेड्यात बहरलेलं आणि हरवलेलं आपलं बालपण शोधण्यासाठी वयाच्या सत्ताविसाव्या वर्षी आयोनेस्को पुन्हा एकदा त्या खेड्यात गेला. त्या वेळी अकस्मात फुटून गेलेल्या आरशासारख्या त्याच्या आठवणींचे तुकडे इतस्ततः विखुरलेले त्याला दिसले. त्या तुकड्यात आपण शेजारपाजारच्या मुलांबरोबर 'नाटक नाटक' हा खेळ खेळलो होतो असाही एक भाग होता. त्याच्याबरोबर त्या खेड्यातल्या शाळेत शिकलेली मुलं आता थोराड बाप्ये झाली होती. माणसंसुद्धा स्वप्नात पाहिल्यासारखी त्याला वाटली—'थोराड नाकांची, तीन वाकड्या शरीरांची, पांगळी, हसतानासुद्धा भयंकर वाटणारी...' जणू ती माणसाची दुःखंच होती, मोठमोठ्या डोळ्यांनी या तुमच्याआमच्या जगाकडं प्रश्नार्थक पाहणारी...उत्तरं नसणाऱ्या प्रश्नांसारखी बटबटीत, आपलं शोकरूप विसरून फक्त हास्यरूप उरलेली......

आणि हे प्रश्नसुद्धा फक्त डोळ्यांपुरतेच उरलेले. बटबटीत. जगाकडं आश्चर्या-अवर्ण्यानं पाहणारे. अश्रुहीन. संवेदनाशून्य. संज्ञाशून्य. कळसूत्री बाहुल्यांच्या रंगीत डोळ्यांसारखेच. आयोनेस्कोच्या सगळ्याच नाटकांतून अशी रंगीत बाहुल्यांसारखी माणसं आहेत किंवा लहान मुलांनी रंगीत खडूनं पांढऱ्या भिंतीवर रेखाटल्यासारखी. जगण्यातला रस संपून गेलेली. सुव्यवस्थित समाजात यंत्रवत् जीवन जगणाऱ्या माणसांच्या चवशून्य जीवनावरची ही नाटकं म्हणजे हलकीशी टीका आहे. या माणसांच्या समोरचे सगळे प्रश्नसुद्धा संपून गेलेले आहेत. जठराग्नी आणि कामाग्नी हे दोन अग्नी तृप्त झाले की खलास! पुढे प्रश्न नाहीत. कुठं एखाद्या प्रश्नानं मेंदूत भोक पाडलंच तर शूबर्टप्रमाणं ('व्हिक्टिम्स ऑफ ड्यूटी') बकाबका खात सुटायचं आणि अन्नानं ते भोक बुजवून टाकायचं किंवा जॅक्सप्रमाणं अत्यंत कुरूप स्त्रीशीसुद्धा लग्न करून कामाग्नी तृप्त करायचा प्रजोत्पादनाच्या हेतूनं. देहाच्या पलीकडचे प्रश्न इथं नाहीत. या माणसांच्या जगात आहे फक्त आध्यात्मिक शून्य. इथं प्रश्न नाहीत तसे कुठलेही नियम नाहीत. तर्कशास्त्राच्या नियमांच्या पलीकडं गेलेलं हे जग आहे. हे नियमांच्या पलीकडचं जग म्हणूनच अप्रज्ञ (absurd) आहे. अशा जगात जगण्याला काय अर्थ आहे? 'आणि तरीही,' आयोनेस्को म्हणतो—'आम्ही इथं (या जगात) आहोत. आपल्या आकलनशक्तीच्या पलीकडचं एखादं कारण, आपण जगतो याचं कारण, असलं पाहिजे. असेलही. काही अशक्य नाही. सगळंच इतकं अप्रज्ञ (absurd) आहे की, हेसुद्धा शक्य आहे.' ('आर्टस्' या नियतकालिकातला आयोनेस्कोचा लेख—१९५९.)

या अप्रज्ञ जगात प्रेम हेच कदाचित तारक तत्त्व असण्याची शक्यता आहे; पण आयोनेस्कोच्या जगात प्रेमाचासुद्धा वध झालेला आहे आणि हा वध आम्हीच केलेला आहे. यंत्रसंस्कृतीच्या पसाऱ्यात प्रेमाची जागा फक्त कामाग्नीनं घेतलेली आहे. या अग्नीच्या तृप्तीसाठी लग्न करून एकत्र येणारी जोडपी संसार सजविताना प्रेमाचा वध करून निष्प्रेम, नीरस आयुष्य जगत—कसंबसं कंठत राहतात. मृत प्रेमाच्या संसारात दोघांच्याही सर्जनशील जीवनेच्छा सावकाश मरून जातात. प्रेम बहरण्याऐवजी प्रेमाचं प्रेत विद्रूप विस्तारत जातं. 'आमिदी' या पहिल्याच तीन अंकी नाटकात आयोनेस्कोनं हा विषय समर्थपणानं हाताळलेला आहे. एका आधुनिक इमारतीच्या दोन खोल्यांच्या फ्लॅटमध्ये आमिदी आणि त्याची पत्नी मेदलीन

राहात आहेत. एका खोलीत एका तरुणाचं प्रेत असल्यानं गेली कित्येक वर्षं हे जोडपं एकाच खोलीत राहातंय. ते प्रेतही इतकं विचित्र आहे की, कुजून-सडून जाण्याऐवजी रोज थोडंथोडं वाढतंय. *त्याच्या एका खोलीतल्या अस्तित्वामुळं दुसऱ्या खोलीतसुद्धा* जिकडं, तिकडं आळंब्या (कुत्र्याच्या छत्र्या) उगवल्या आहेत. म्हणजे त्या फ्लॅटमध्ये राहणं अशक्य होऊन गेलंय; परंतु दुसरीकडं रहायला जावं तर त्या प्रेताची कशी वाट लावायची? या विचित्र परिस्थितीत कुणा मित्रमंडळींनाही बोलावता येणं शक्य नाही. कुणाकडं जाणं-येणं नाही आणि कुणाला बोलावणं-सवरणं नाही. अशा स्थितीत वर्षानुवर्षं ती दोघं त्या जागेत राहतायत आणि ते प्रेत तर इकडं वाढत सुटलंय. पहिल्या अंकाच्या शेवटी तर ते प्रेत अचानक एवढं वाढलं की, दोन खोल्यांच्या मधलं बंद दार फोडून त्याचे पाय *बाहेरच्या खोलीत येतात.* दुसऱ्या अंकाच्या शेवटपर्यंत ते वाढत जाऊन त्याचे पाय फ्लॅटच्या बाहेरच्या दारापर्यंत जाऊन टेकतात. आता मात्र दोघंही चांगलेच घाबरून जातात. गेली बारा वर्षं दडपून ठेवलेलं हे प्रेत आता फ्लॅटच्या बाहेर पडणार आणि शेजाऱ्या-पाजाऱ्यांना हे रहस्य समजणार. त्याच्या आत त्याची काही तरी विल्हेवाट लावलीच पाहिजे! तिसऱ्या अंकात आमिदी त्या प्रेताचे दोन्ही पाय खांद्यावर घेतो आणि मागच्या भिंतीतल्या खिडकीतून ते बाहेर ओढून घेऊन जातो. या वेळी आणखी एक चमत्कार होतो. खिडकीतून बाहेर—त्या फ्लॅटमधून तब्बल बारा वर्षांनंतर बाहेर—*पडल्यानंतर* ते प्रेत एखादा फुगा फुगावा तसं फुगतं आणि हवेत तरंगू लागतं आणि त्याच्या पायांना घट्ट धरून लोंबकळत आमिदी-सुद्धा हवेत उडू लागतो, उंच उंच जाऊ लागतो—'आता मी स्वतंत्र झालोय...मी आकाशगंगेकडं चाललोय...' असं आनंदानं ओरडू लागतो. रस्त्यात जमलेल्या मुलांच्याकडं आपल्या खिशातले पेपरमिंट आणि चॉकलेट टाकू लागतो...मोठ्या माणसांसाठीही काही भेटी फेकू लागतो...

या नाटकातल्या विलक्षण विषयाचा *अर्थ काय? आयोनेस्कोच्या* नाटकांचा अर्थ लावण्याचा प्रयत्न करण्यात काही अर्थ नाही असं *म्हणत म्हणत एका टीकाकारानं या नाटकातल्या* प्रेताचा अर्थ लावण्याचा प्रयत्न केलाय. तो म्हणतो, हे प्रेत त्या जोडप्यात लग्नाच्या वेळी जे प्रेम असेल त्या प्रेमाचं प्रेत आहे. म्हणजे निष्प्रेम जीवन सक्तीनं एकत्र राहून जगणाऱ्या कुटुंबाची ही कहाणी आहे. बरं, या प्रेमाचा मुडदा कुणी पाडला असेल? तर त्या दोघांनीच! दोघां-मधल्या परस्परविरोधी स्वभावानं. आपल्या प्रेमाचं प्रेत खांद्यावर घेऊन आमिदी जेव्हा त्या दोन खोल्यांच्या बंदिशाळेतून बाहेर पडतो तेव्हा तो खऱ्या अर्थानं मुक्त होतो, *आकाशगंगेकडं प्रवास* करू शकतो, नक्षत्रांचं तेजस्वी विश्व जवळ करू शकतो.

हे *नाटक म्हणजे आयोनेस्कोच्या* अस्सल प्रतिभाशक्तीचा प्रत्यय देणारी एक श्रेष्ठ कलाकृती आहे. अप्रज्ञ (Absurd) रंगभूमीच्या विकासेतिहासातला हा एक अनमोल, अविस्मरणीय टप्पा आहे. जागतिक नाट्येतिहासात आयोनेस्कोला अमरांच्या तेजस्वी पंक्तीत अढळ स्थान देणारा हा एक कालोचित प्रतिभाविलास आहे. पिकासो आणि काफ्का या दोघांबरोबर आयोनेस्कोचंही नाव घ्यायला लावणारी त्याची दोन नाटकं. एक 'आमिदी' आणि दुसरं 'ऱ्हायनोसरस.'

'ऱ्हायनोसरस' या नाटकाचा विषयसुद्धा असाच थक्क करून सोडणारा आहे. साहित्याच्या क्षेत्रात त्याच त्या विषयांचं उदंड पीक नेहमीच येतं. नवा विषय सुचणं ही दैवदुर्लभ गोष्ट! ऑस्कर वाइल्डला 'द पिक्चर ऑफ डोरायन ग्रे' या कादंबरीत असा नवा विषय सुचला. काफ्काला 'मेटॅमॉर्फसिस' या कथेत असा नवा विषय सुचला आणि आयोनेस्कोला एकच नव्हे तर दोन नवे विषय सुचले. 'आमिदी' आणि 'ऱ्हायनोसरस' या दोन नाटकांत.

'ऱ्हायनोसरस' हे आयोनेस्कोचं दुसरं तीन अंकी नाटक. त्याच्या नाटकातून कथा नसते. त्यामुळं 'एकांकिका' हेच त्याच्या प्रतिभेचं योग्य माध्यम आहे असं 'चोखंदळ' समीक्षक म्हणू लागले होते. या समीक्षकांना आयोनेस्कोनं ही दोन तीन अंकी नाटकं लिहून गोड धक्के दिले. समीक्षकांना असले धक्के देण्यात आयोनेस्कोला नेहमीच मौज वाटली. तरुणपणी रुमानियामध्ये शिक्षकाची नोकरी करीत असताना त्यानं रुमानियातल्या तीन प्रसिद्ध लेखकांच्यावर प्रखर अशी प्रतिकूल टीका लिहून प्रसिद्ध केली. त्या वेळच्या समीक्षकांनी मग आयोनेस्कोच्या लेखावर, त्यांच्या बौद्धिक कुवतीवर वृत्तपत्रातून भरपूर शब्दसुख घेतलं. नंतर काही महिन्यांनी आयोनेस्कोनं त्याच तीन लेखकांवर दुसरा एक लेख लिहून प्रसिद्ध केला. या लेखात त्यानं हे तीन लेखक किती श्रेष्ठ आहेत, त्यांचं साहित्य कसं श्रेष्ठ अभिरुचीला मानवणारं असं दर्जेदार आहे याचं विवेचन केलं आणि आयोनेस्कोच्या पहिल्या लेखावर ताडनलेख लिहून भरपूर शब्दसुख घेणारे स्तंभलेखक संपूर्ण गोंधळून गेले. शेवटी आयोनेस्कोनं जाहीर करून टाकलं की एकाच कलाकृतीवर अनुकूल आणि प्रतिकूल अभिप्राय देणं शक्य आहे. म्हणजे तरुण वयातच आयोनेस्कोचा *तर्कशास्त्रावरचा विश्वास उडून गेलेला होता असं दिसतं.* म्हणून आपल्या अनेक नाटकांतून त्यानं तर्कशास्त्रज्ञांची टिंगल उडविलेली आहे. असे धक्के देण्यातला सुद्धा त्याचा हेतू सुस्पष्ट आहे. तर्कसुसंगत असं या जगात, या जीवनात काहीच नाही. हे जग आणि जीवन एकदम अप्रज्ञ (Absurd) आहेत.

या अप्रज्ञतेचा (Absurdity चा) नवलपूर्ण आविष्कार म्हणजे 'ऱ्हायनोसरस' हे नाटक. या नाटकाचा नायक बेरिंजर हा एका पुस्तकप्रकाशनाच्या कार्यालयातला साधा कारकून आहे. आळशी, काहीसा एकलकोंडा, कार्यालयातल्या कामकाजाचा मनापासून तिटकारा असलेला आणि दैनंदिन जीवनातला कंटाळा घालविण्यासाठी अधूनमधून दारू पिणारा असा सरळ सीधा माणूस. त्याचा मित्र जां हा त्याच्या थेट उलट स्वभावाचा आहे—कर्तव्यबुद्धीनं नोकरी करणारा, नोकरीतले कष्ट करण्यात सार्थक मानून झिजणारा, शिस्त, कष्ट अशा सनातन गोष्टींवर कमालीचा विश्वास असलेला. हे दोन मित्र एका प्रातःकाळी एका हॉटेलच्या गच्चीवर न्याहारी करीत

## 'आमिदी' ही त्याच्या अस्सल प्रतिभेचा प्रत्यय देणारी श्रेष्ठ कलाकृती

आहेत आणि जां नेहमीप्रमाणं बेरिंजरची कानउघाडणी करीत आहे अशी नाटकाची सुरुवात होते. थोड्याच वेळात एक ऱ्हायनोसरस स्टेजच्या मागून धडाधडा धावत जातो. तो ऱ्हायनोच होता की नव्हता याची चर्चा सुरू होते, एवढ्यात दुसरा एक ऱ्हायनो धावत जातो. हॉटेलचा मॅनेजर, जां आणि इतरांच्यात चर्चा सुरू होते. हा ऱ्हायनो कुठून आला असावा, गावात कसा काय घुसला असावा वगैरे. वेगवेगळ्या नागरिकांच्या प्रतिक्रियांतून आजच्या संस्कृतीवर, यंत्रवत जीवन जगणाऱ्या माणसांच्यावर आयोनेस्कोने हास्याचा विकट प्रकाश टाकलेला आहे. दुसऱ्या अंकात मात्र वस्तुस्थितीवर प्रकाश पडू लागतो. हे ऱ्हायनो आफ्रिकेतून किंवा इतर कुठल्याही देशातून आलेले नाहीत, तर आपल्याच गावातल्या नागरिकांचा अचानक कायापालट व्हायला सुरुवात झालेली आहे आणि एकामागून एक माणसं ऱ्हायनो व्हायला लागलेली आहेत हे सत्य उजेडात येतं. बेरिंजरचा शिस्तप्रिय मित्र जां खुद्द बेरिंजरच्या नजरेसमोर ऱ्हायनो होतो आणि त्याच्यावर हल्ला करण्याचा प्रयत्न करतो, तेव्हां बेरिंजर त्याला स्नानगृहात बंद करून बाहेरून कुलुप लावतो आणि मदतीसाठी फ्लॅटच्या सेविकेला बोलवायला जातो. तिचं दार ठोठावतो. सेविका जेव्हा दार उघडून बाहेर येते तेव्हा बेरिंजरला आणखीन एक धक्का बसतो. तिचं डोकं ऱ्हायनोचं आणि शरीर स्त्रीचं असतं. तिच्यामध्येसुद्धा रूपांतर व्हायला सुरुवात झालेली असते...

तिसऱ्या अंकात जिकडं तिकडं ऱ्हायनोंची एकच गर्दी उसळते. खिडक्यांतून, दारांतून त्यांची डोकी डोकावतात. बेरिंजरच्या कार्यालयातला मित्र ड्युडार्ड म्हणतो की आपण ऱ्हायनोंची विचारसरणी समजून घेतली पाहिजे. त्याच्या विचारांना कंटाळून विषयांतर करण्यासाठी बेरिंजर त्याला जेवायचं आमंत्रण देतो; पण ड्युडार्ड ते आमंत्रण नाकरतो आणि म्हणतो की, आता त्याला गवतावर निर्वाह करावा असं वाटू लागलंय. शेवटी बेरिंजरची मैत्रीण डेझी येते. दोघांच्या संभाषणातून आपल्याला कळतं एव्हाना सगळेच ऱ्हायनो झालेत. मानवी प्राणी म्हणून ती दोघंच आता उरलीत. ऱ्हायनोंनी जेत्या आक्रमकांसारखं टेलिफोन, रेडिओस्टेशन सगळंच ताब्यात घेतलंय. ती दोघं मग ठरवतात की, या ऱ्हायनोंच्या जगात आपण दोघांनी तरी एकत्र राह्यचं, या ऱ्हायनोंना दाद द्यायची नाही; पण थोड्या वेळानं तिचं डोकं दुखू लागतं आणि तीही म्हणू लागते की आपण ऱ्हायनोंना समजून घेतलं पाहिजे. त्यांची भाषासुद्धा समजून घेतली पाहिजे, ज्या जगात सगळेच ऱ्हायनो झालेत तिथं आपणच दोघांनी वेगळं राहून दुःखी होण्यात काय अर्थ आहे? शेवटी डेझीसुद्धा बेरिंजरला सोडून निघून जाते आणि बेरिंजर एकटाच उरतो. तो स्वतःशीच बोलू लागतो तेव्हा त्याच्या ध्यानात येतं की आपली भाषा आता दुसऱ्या कुणालाच समजणार नाही. आता या भाषेचा काहीच उपयोग नाही. ऱ्हायनोंच्या जगात मानवी भाषा भावनांची देवाणघेवाण करायला असमर्थ आहे. आयोनेस्कोचा भाषेवरचा विश्वासच उडून गेलेला आहे, ही गोष्ट या नाटकातसुद्धा त्यानं एका वेगळ्याच ढंगात मांडलेली आहे. माणूस शेवटी एकटा आहे. त्याला सोबत फक्त त्याचीच आहे; पण ही सोबत करणारा 'स्वतः'सुद्धा या अप्रज्ञ जगात विरूप, विशक्त होऊन गेलेला आहे. डेझी निघून गेल्यानंतर बेरिंजर सोबत म्हणून दोनतीन मोठमोठे फोटो कपाटातून काढून भिंतीवर लावतो. हे आपलेच फोटो आहेत असं तो म्हणतो; पण भिंतीवर ते फोटो तो लावतो तेव्हा ध्यानात येतं की, दोन फोटो दोघा विद्रूप म्हाताऱ्यांचे आहेत आणि एका फोटोत एक गलेलठ्ठ बाई आहे. व्यक्तिमत्त्वाचा असा विद्रूप ऱ्हास या जगात झालेला आहे. पिरँदेलोच्या नाटकातून सुरू झालेला व्यक्तिमत्त्वाचा शोध तीन दशकांनंतर हा असा संपलेला आहे. आता असले सगळेच शोध निरर्थक आहेत. सर्वसत्तावादी (totalitarian) अशा या जगात व्यक्तिमत्त्वाचा असा ऱ्हास आणि अंत होणं ही केवळ अटळ अशीच गोष्ट आहे. जो कुणी असा शोध घेऊ पाहील तो बेरिंजसारखा एकटा राहील, मित्रहीन, प्रियाहीन. स्वतःचं व्यक्तिमत्त्वसुद्धा या ऱ्हायनोंच्या, पशूंच्या, जगात विद्रूप झालेलं त्याला पाहावं लागेल. समता म्हणजे सारखेपणा नव्हे. माणसांमाणसांमध्ये यंत्रासारखा सारखेपणा आणून माणसाला सुखी करता येणार नाही. गणवेषांची, युनिफॉर्मची कल्पना युद्धखोराला शोभते. युद्धखोर आणि सर्वसत्तावादी दोघंही सारखेच फॅसिस्ट आहेत आणि हे मानवी विश्व तर त्यांच्याच कलानं आता रंग बदलू लागलेलं आहे. या रंगात 'श्रीरंग' कुठं आहे; बालपणातला मुक्त स्वातंत्र्याचा आनंद कुठं आहे? 'मी' कुठं आहे? या जगात हे प्रश्न संकटसूचक आहेत, भयंकर आहेत. स्वातंत्र्य ही कल्पनाच मोठी यातनाकारक आहे. नकोच ते स्वातंत्र्य. सर्वांसारखं होऊनच आता जगलं पाहिजे, जगू या; पण बेरिंजर मात्र आपला विद्रूप वेगळेपणा शेवटपर्यंत टिकवून धरण्यासाठी कटिबद्ध आहे. नाटकाचा शेवटचा पडदा पडण्यापूर्वी तो ओरडतो– 'या सगळ्यांच्या विरुद्ध, एकजात सर्वांच्या विरुद्ध, मी लढा देणार आहे. या जगातला मी शेवटचा माणूस आहे आणि शेवटपर्यंत मी माणूसच राहणार आहे. मी माघार घेणार नाही, सर्वांसारखा होणार नाही...'

राजकीय आणि सामाजिक संदर्भांनी भरून आलेल्या आमच्या विश्वकोशात बेरिंजरच्या एकाकी विचारांच्या अशा विद्युत्-लहरी कडाडून चमकतात, तेव्हा आयोनेस्कोच्या सार्वकालिक, अमर प्रतिभेचा प्रत्यय एखाद्या ज्वालेसारखा आपल्या मनाला चाटून जातो.

'द किलर' हे आयोनेस्कोचं आणखीन एक तीन अंकी नाटक. या नाटकाचा नायकसुद्धा बेरिंजर हाच आहे. (या नाटकाचा प्रयोग 'ऱ्हायनोसरस'च्या आधी झाला होता. म्हणजे बेरिंजर या पात्राची पहिली निर्मिती 'द किलर' या नाटकात आधी झाली होती.) हा चार्लीचॅप्लिनसारखा लहानखुरा, सरळसीधा, बाल–माणूस (Child–man) आहे. सौंदर्याच्या, प्रकाशाच्या दर्शनानं हरखून जाणारा आहे. पहिल्या अंकात तो एका तेजस्वी नगरात (radiant city मध्ये) हिंडतो आहे. हे नवलनगर रचणारा रचनाकार– आर्किटेक्ट हासुद्धा त्याच्याबरोबर आहे. या रचनाकाराबरोबर बेरिंजर नगर पहात, भिंतींची, रस्त्यांची, इमारतींची वाहवा करीत, रचनाकाराची भरल्या मनानं प्रशंसा करीत हिंडत आहे. या नगरात सुंदर बगीचे आहेत आणि एक लहानसा तलावही आहे. इथलं आकाशसुद्धा एकदम वेगळं आहे. वसंतऋतूतल्याप्रमाणं या आकाशातून बाराही महिने स्वच्छ, नितळ, ऊन पडतं आणि वनश्री बहरते. पावसाची रिपरिप इथं नाही. सगळा नगराच्या बाहेर, दूर पडतो आणि ते पाणी भूपृष्ठा-

खालून या नगरीतल्या वनश्रीला, तलावाला पुरवलं जातं. या विलक्षण रम्य नगरीची बेरिंजर तारीफ करीत राहतो आणि आर्किटेक्ट मात्र थंडपणानं ती ऐकत राहतो. बेरिंजरला त्याच्या थंडपणाचं आश्चर्य वाटतं आणि तो विचारतो– 'मी बोलतो आहे हे तुमच्या नीटसं ध्यानात आलेलं दिसत नाही. कदाचित मीच माझे विचार व्यवस्थितपणे मांडले नसतील, होय ना?' या प्रश्नाला आर्किटेक्ट जे उत्तर देतो ते अप्रज्ञ नाटचातल्या संवादपद्धतीचं सुरेख उदाहरण आहे. तो म्हणतो– 'तुम्ही मांडता ते विचार व्यवस्थित आहेत की नाहीत याचा निर्णय घेण्याचा मला अधिकार नाही ते माझं कामही नाही. ते अधिकार तर्कखात्याला दिलेले आहेत.'

हळूहळू बेरिंजरच्या ध्यानात येऊ लागतं की या सुंदर नवलनगरीत कुणीही माणसं राहात नाहीत. ही नगरी संपूर्णपणानं निर्जन आहे. आर्किटेक्टची सुंदर सेक्रेटरी डेनीसुद्धा इथं काम करायला नाराज आहे. एवढ्यात बेरिंजरच्या दिशेनं कुणी तरी दगडफेक करतं. एका दगडानं त्याची हॅट उडविली जाते. मग त्याला समजतं की या सुंदर नगरीत कुणी एक अज्ञात मारेकरी (The killer) वावरतो आहे आणि रोज दोघातिघांची तो हत्या करतो आहे. रोज इथल्या सुंदर तळ्यात माणसांची प्रेतं तरंगतात. त्यात लहानलहान मुलंसुद्धा आहेत. या अज्ञात मारेकऱ्याच्या भीतीमुळं लोक या नगरीतली घरं सोडून निघून गेलेत. जे थोडे उरलेत ते भीतीनं दारंखिडक्या बंद करून लपून बसलेत. थोड्या वेळानं, रजेवर गेलेल्या डेनीचं प्रेत तलावात दिसतं. ही डेनी बेरिंजरला आवडलेली असते. तिच्याशी लग्न करण्याचा त्याचा विचार असतो; पण आता तिचाही बळी जातो. हे त्या मारेकऱ्याचं काम. बेरिंजर ठरवतो की आपण आता गप्प बसून चालणार नाही. काही तरी केलं पाहिजे. काही तरी केलंच पाहिजे. त्या मारेकऱ्याला पकडून पोलिसांच्या ताब्यात दिलं पाहिजे. या सुंदर नगरीतलं मृत्यूचं हे थैमान थांबविलं पाहिजे. हा अज्ञात मारेकरी म्हणजे जीवनाला मिळालेला मृत्यूचा शाप! हा शाप संपविला पाहिजे. ही नगरी निर्माण करणाऱ्या रचनाकारानं खरं म्हणजे हे काम केलं पाहिजे; पण तो तर ढिम्मपणानं सगळं पाहतोय, खुशाल सँडविच खात आणि मद्य पीत उभा आहे.

कोण आहे हा रचनाकार? त्याच्या मिषानं देवाचीच तर प्रतिमा आयोनेस्कोनं निर्माण केली–नसावी? एका ठिकाणी तो बेरिंजरला थंडपणानं म्हणतो, 'आपण सगळेच मरणाधीन आहोत!' पण त्याला मात्र भीतीचा स्पर्श झालेला दिसत नाही. म्हणजे देवसुद्धा मृत्यूपुढं हतबल आहे की काय? 'देव मेला आहे!' असं नीत्शेनं म्हटलंय. म्हणजे देवावरसुद्धा मृत्यूची सत्ता चालते की काय? डेनी ही सेक्रेटरी रचनाकाराला रजा मागते. आपलं स्वातंत्र्य धोक्यात आलं आहे म्हणून स्वातंत्र्य मागते. म्हणून तिचा वध होतो. देवाकडं स्वातंत्र्य मागणं, मृत्यु-भीतीपासून सुटका मागणं चूक आहे काय?

दुसऱ्या अंकात बेरिंजर परत आपल्या घरी येतो. हे घर जुन्या, अंधारमय, पावसानं जलमय झालेल्या, पावसाळी करड्या प्रकाशात उभ्या असलेल्या शहरात आहे.

दुसरा अंक सुरू झाल्यावर जवळजवळ दहा–बारा मिनिटं रंगमंचावर कुणीच येत नाही. नुसते शेजाऱ्यापाजाऱ्यांचे, शाळकरी मुलांचे, शिक्षकांचे, रस्त्यावरून धावणाऱ्या वाहनांचे आवाज ऐकू येतात. नुसते आवाज. माणसं नाहीतच. म्हणजे माणसं नुसती आवाज करणारी, काहीही अर्थशून्य बडबड करणारी यंत्रं झाली आहेत.

या दहा–बारा मिनिटांनंतर दरवाजा उघडून बेरिंजर येतो आणि आपल्या अंधाऱ्या खोलीत दिवा लावतो. खोलीत आधीच त्याचा मित्र एडवर्ड येऊन बसलेला असतो. अंधारात. चूपचाप. बेरिंजर त्याला काही विचारतो, तर उत्तर देण्यापूर्वी त्याला खोकल्याची उबळ येते. म्हणजे तो आजारी आहे. आजार सोसत, खोकत-खोकत जगणारा एडवर्ड म्हणजे या जगातला यंत्रसंस्कृतीनं दुबळ्या झालेल्या माणसाचा प्रतिनिधीच आहे. त्याच्याजवळ एक ब्रीफकेस आहे. ती उघडताच तिच्यातून कर्नलचा फोटो बाहेर पडतो. मारेकऱ्याजवळही एक ब्रीफकेस असते आणि तिच्यात एक कर्नलचा फोटो असतो. एखाद्याला ठार करण्यापूर्वी त्याचं लक्ष दुसरीकडेच वेधण्यासाठी मारेकरी त्याला हा कर्नलचा फोटो दाखवीत असतो. आता तो कर्नलचा फोटो एडवर्डच्या ब्रीफकेसमधून बाहेर पडतो. एवढंच नव्हे, तर मारेकऱ्याची शस्त्रं आणि इतर सटरफटर चिजा एडवर्डच्या ब्रीफकेसमधून भराभर घरंगळून बाहेर पडतात. क्षणभर आपल्याला भयभास होतो की, एडवर्डच मारेकरी असावा; पण बेरिंजरला तसा मुळीच संशय येत नाही. तो फक्त एडवर्डला विचारतो की, या मारेकऱ्याच्या वस्तू तुझ्याजवळ कशा आल्या? एडवर्डलाही ते ठाऊक नसतं. या वस्तू त्याच्या ब्रीफकेसमध्ये नव्हत्या; पण बरं झालं, मारेकऱ्याबद्दलचे सगळे पुरावे तरी सापडले. बेरिंजर मग एडवर्डला सोबत घेऊन मारेकऱ्याच्या शोधास बाहेर पडतो.

ब्रीफकेसमधला कर्नलचा फोटो, काही खाऊचे पदार्थ आणि इतर सटरफटर वस्तू यांचा अर्थ काय? असं तर नसावं की, जीवन आपल्याला मृत्यूकडेच नेत असताना मृत्यूचा विसर पडावा म्हणून सत्ता, संपत्ती, खाणं-पिणं या वस्तू दाखवून हुलकावीत असावं आणि या पसाऱ्यात मृत्यूचा आपल्याला विसर पडून आपण पुरे बेसावध झालो की मृत्यूला आपल्यावर घाला घालायला सोपं जात असावं?

तिसऱ्या अंकात बेरिंजर एडवर्डबरोबर पोलिसस्टेशनकडं निघालाय; परंतु अर्ध्या वाटेत आल्यावर त्याच्या ध्यानात येतं की, एडवर्डच्या हातात ब्रीफकेस नाही. खोलीवरच विसरली असेल असं वाटतं, तर एडवर्ड म्हणतो, मी बरोबर आणली होती. आत्ता तर माझ्या हातात होती. मग ब्रीफकेसची रस्त्यात शोधाशोध सुरू होते. रस्त्याच्या एका बाजूला मदरपीप निवडणुकीचं भाषण करते आहे, 'मला आणि माझ्या बदकांना निवडून आणा...आपण जुलूम पुन्हा प्रस्थापित करू या आणि त्याला शिस्त आणि स्वातंत्र्य असं नाव देऊ या...एकाचं दुर्दैव म्हणजे सगळ्यांचं सुख!' अशी वेडीवाकडी व्याख्यानबाजी करीत आहे, लोक 'मदरपीप दीर्घायुषी होवो, तिची बदकं जिंदाबाद!' अशा घोषणा देत आहेत, एक दारुडा तिला

**एडवर्ड हा यंत्रसंस्कृतीने दुबळ्या झालेल्या माणसाचा प्रतिनिधी आहे....**

विरोध करतो आहे आणि इकडे शांतपणानं बेरिंजर आणि एडवर्ड ब्रीफकेस शोधताहेत. त्या दारुड्याच्या हातात एक ब्रीफकेस आहे. तीच आपली असावी म्हणून झटापट करून त्याच्या हातातून ती हिसकून घेतात; पण त्या ब्रीफकेसमधले कागद निराळेच आहेत. इतक्यात एक वाट चुकलेला म्हातारा येतो, त्याच्याही हातातली ब्रीफकेस हिसकून घेऊन उघडून पाहतात; शेवटी मदरपीपच्या हातातली ब्रीफकेस उघडून पाहतात; पण त्यातली एकही ब्रीफकेस एडवर्डची नसते. शेवटी आपली ब्रीफकेस आणण्यासाठी एडवर्ड परत बेरिंजरच्या खोलीकडं निघून जातो. एवढ्यात दोन भले दांडगे पोलिस येतात. रहदारी-नियंत्रण हे त्यांचं काम, त्यामुळं बेरिंजर ज्या मारेकऱ्याच्या शोधात आहे त्याच्याबद्दल त्यांना काहीच वाटत नाही. रहदारी-नियंत्रणाचा गोंधळ संपल्यावर ते पोलिस निघून जातात आणि बेरिंजर एकटाच मारेकऱ्याच्या शोधासाठी वाट चालू लागतो. संध्याकाळ होऊ लागते. रंगमंचाची मागील भिंत पडून जाते आणि मावळत्या सूर्याच्या दिशेनं, भिंती पडून मोकळ्या झालेल्या अंधाऱ्या रस्त्यानं, बेरिंजर चालू लागतो.

बेरिंजरच्या सुरुवातीचा चालण्याचा झपाटा एकदम कमी होतो. कारण त्याच्या ध्यानात येतं की आपण चालत आहोत, पण पुढं जात नाही, पायाखालची वाट जिथल्या तिथंच आहे, कितीही चाललं तरी. या जाणिवेनं त्याच्या अंगाचा थरकाप होतो. 'जाऊ दे! त्या मारेकऱ्याला आजच शोधण्याची अशी काय घाई आहे! उद्या बघू!' असाही त्याच्या मनात विचार येतो; पण एवढ्यात प्रत्यक्ष मारेकरीच सुरा घेऊन, त्याच्यासमोर येऊन उभा राहतो, आणि बेरिंजरचा नाइलाज होतो. या मारेकऱ्याचं रूप मात्र अत्यंत हास्यास्पद आहे. बेरिंजर लहानखुरा आहे; परंतु हा मारेकरी बेरिंग-पेक्षाही लहान आहे. इतका लहान की बेरिंजर त्याच्यासमोर एखादा राक्षस वाटावा. शिवाय त्याची दाढी वाढलेली आहे आणि डोकीवर एक फाटकी हॅट आहे. त्याला एकच डोळा आहे, वटारल्यासारखा वाटणारा. सुरुवातीला बेरिंजर त्याची समजूत घालण्याचा प्रयत्न करतो. 'तू करतो आहेस ते चुकीचं आहे. कशाला उगीच लोकांचे जीव घेतोस?' वगैरे तो बोलतो; पण मारेकऱ्यावर काहीही परिणाम होत नाही. तो नुसता 'हूं! हूं!' करीत पुढं पुढं येत राहतो. त्याची थंड आणि उदासीन वृत्ती पाहून बेरिंजरला कळून चुकतं की, इथं काही आपली डाळ शिजायची नाही. अशा माणसापुढे भाषेचा किंवा विचारांचा उपयोग नाही. एवढंच नव्हे तर आपण बरोबर आणलेल्या दोन जुन्या पद्धतीच्या थोराड पिस्तुलांचाही उपयोग नाही. शेवटी दहाबारा मिनिटं बोलबोल बोलून तो थकतो. दोन्ही हातांतली पिस्तुलं खाली ठेवतो आणि मुकाट्यानं मारेकऱ्याच्या स्वाधीन होतो.

एका अर्थानं हे नाटक माणसाच्या जन्मापासून मृत्यूपर्यंतचा प्रवास रंगविणारं ठळक चित्रं आहे. बालपणात हे जग एखाद्या नवलनगरी-सारखं वाटतं. पहिल्या अंकातली नवलनगरी या बालपणाचं प्रतीक आहे. दुसऱ्या अंकात चाळीतलं जीवन आहे. किशोरवयातलं गडबड, गोंगाट, शेजाऱ्यापाऱ्यांचे अर्थहीन संवाद, शाळा–शिक्षक यांचं हे चित्र आहे आणि तिसऱ्या अंकातलं प्रौढपण–राजकारण, पोलीस, सैनिक, आजारी मित्र यांच्या संगतीत घालविलं जाणारं आणि शेवटी मृत्यू! नको नको म्हणत असताना येणारा. लहानखुरा एकाक्ष, अबोल, उदासीन, निष्ठुर, अटळ.

मृत्यूची आपल्याला फार फार भीती वाटते, असं आयोनेस्कोनं अनेक वेळा लिहून ठेवलंय. त्याचप्रमाणं बालपणातल्या सृष्टीबद्दलही त्यानं अनेक वेळा मोठे मोहक, म्हणूनच खिन्न करणारे उद्‌गार आपल्या दैनंदिनीत लिहून ठेवलेत. पिरँदेलोप्रमाणंच आयोनेस्कोसुद्धा वास्तव-वादाचा अव्हेर करून वास्तवाचा शोध घेतो. नाट्यमयतेबरोबरच नितळ काव्यमयताही त्याच्या नाट्यलेखनात प्रकर्षानं दिसून येते. त्याची प्रतिभा वास्तवाचा शोध घेताना स्वच्छंदवादाकडं (romanticism) झुकलेली आहे. अमेरिकेतल्या एका तत्त्वज्ञानाच्या प्राध्यापकानं 'Poetry is extra-logical' (काव्य तर्काधिक असते') अशी काव्याची व्याख्या केलेली आहे. म्हणूनच इहसृष्टीपलीकडचे सत्य शोधण्याची धडपड आयोनेस्कोच्या नाटकातून एक अनोखेच काव्यरूप घेऊन प्रकट होते. ही परासृष्टीतलं सत्य शोधण्याची धडपड आज फक्त वैज्ञानिकांतच दिसून येते. म्हणूनच आयोनेस्कोच्या प्रतिभेशी नातं सांगणारी प्रतिभा असणाऱ्या अमेरिकन साहित्यिकानं विल्यम सारोयन यानं–शेवटचंच सांगून टाकलंय की 'आजपर्यन्तच्या नाटककारात बेकेट आणि आयोनेस्को हे दोघेच वैज्ञानिक आहेत!' आपल्या आजच्या जगात तर्कशास्त्राच्या मर्यादा ओलांडून विज्ञानानं कधीच पुढे झेप घेतलेली आहे. अशा आपल्या जगाशी उत्कटतेनं जवळीक साधणारं नवं नाटक आयोनेस्कोनं निर्माण केलं आहे. इंद्रियगोचर सृष्टीचा हा पसारा मिथ्या आहे आणि अगोचर चित्–तत्त्व हे एकच सत्य आहे असा शोध लावणारा आइनस्टाइन आणि व्यक्तिमत्त्वाचं काव्योदात्त गूढ शोधीत निघालेला आणि 'आपण मरायचं ते कशासाठी? काय म्हणून?' असा प्रश्न विचारणारा आयोनेस्को या दोघांत काही फरक आहे असं मानायला जागाच नाही.

आयोनेस्को ही डॅन्यूब नदीच्या खोऱ्यात जन्म घेतलेली एक अजब चीज आहे! ही नदी जर्मनीतल्या काळ्या अरण्यात उगम पावते आणि पूर्व युरोपातल्या काळ्या समुद्राला मिळते. म्हणजे जन्मापूर्वी काळे अरण्य आणि मृत्यूनंतर काळा समुद्र! या नदीच्या मुखाशी, काळ्या समुद्राचा किनारा लाभलेल्या रुमानियात त्याचा जन्म. वयाच्या तेरा वर्षानंतरचा पौगंडावस्थेतला स्वप्नरम्य कालखंड रुमानियात घालविलेला. त्यामुळं मृत्यूबद्दलचे विचार त्याच्या नाटकातून वरचे-वर येत असावेत. शिवाय पूर्वयुरोपातल्या दुर्दैवी देशातला जन्म आणि वास्तव्य यामुळं पौर्वात्यांच्या, व्यासांच्या आणि कन्फ्यूशसच्या जवळचे विचार, जन्मापूर्वीच्या आणि मृत्यूच्या पलीकडच्या सत्या-विषयीचं चिंतन नाट्यकाव्यरूप घेऊन त्याच्या लेखणीतून उतरलं यात नवल नाही. भारतीयांनी आवर्जून अभ्यास करावा असा आजचा युरोपीय नाटककार म्हणून आयोनेस्कोकडेच अंगुलिनिर्देश करावा लागेल!

□

पुस्तके

# मार्क्स आणि गांधी

लेखक : प्रा. मधू दंडवते

## समन्वयाचा प्रयत्न

समाजातील गतिमान शक्तींचा शोध घेऊन समाजाच्या वाटचालीच्या दिशेचा अचूक वेध घेणारे विचारवंत द्रष्टे ठरतात. कार्लमार्क्स आणि महात्मा गांधी हे अनुक्रमे एकोणिसाव्या आणि विसाव्या शतकातील द्रष्टे विचारवंत मानले जातात. जगातील अनेक विचारवंतांच्या दृष्टीने मार्क्स आणि गांधी हा खास अभ्यासविषय बनला आहे. आजपर्यंत जगात अनेक विचारवंत होऊन गेले त्यापैकी कुठल्याच विचारवंताला त्याच्या हयातीत सार्वत्रिक लोकमान्यता मिळालेली नाही. हाच अनुभव या दोन विचारवंतांच्या बाबतीत आहे. कम्युनिस्ट मॅनिफेस्टो १८४८ मध्येच प्रसिद्ध झाला तरी मार्क्सप्रणीत विचारांचा निष्ठापूर्वक प्रत्यक्ष अंमल १९१७ च्या रशियातील बोल्शेविक क्रांतीपासून सुरू झाला आणि मार्क्सच्या विचारांची बदलत्या परिस्थितीत अंमलबजावणी करताना काही वैचारिक बदल 'मार्क्सवादी' समाजवादी चळवळ हे चालू काळात सामाजिक पुनर्रचनेचे प्रमुख सूत्र बनले आहे. जगातील निम्म्यापेक्षा अधिक लोकसंख्या मार्क्सवादाच्या प्रभुत्वाखाली गेली आहे. गांधीप्रणीत विचार विसाव्या शतकातील असल्याने त्याचा विश्वव्यापी प्रत्यक्ष अंमल सुरू झाला नसला तरी काही विकसनशील देशांना तो अनुकरणीय वाटतो. गांधी विचारांचे महत्त्व पटायला लागल्याने त्यांचा पाठपुरावा करणारे अनुयायी निर्माण होऊन 'गांधीवाद' ही देखील प्रचलित विचारसरणी बनली आहे. सामाजिक उत्क्रांती व गतिमान समाजांच्या संदर्भात राष्ट्रीय व सामाजिक जीवन निकोप व सुदृढ बनविण्यात मार्क्सप्रणीत व गांधीप्रणीत विचारांना जागतिक मान्यता मिळत आहे.

प्रस्तुत ग्रंथाच्या लेखकाने उभय विचारवंतांच्या विचारांची मांडणी, दोहोंतील साम्यस्थळे आणि तत्त्वभिन्नता यांचा दोन ते आठ प्रकरणांमध्ये सविस्तर आढावा घेतला आहे. आवश्यक तेथे मूळ विचार त्यांच्याच शब्दात उद्धृत केले आहेत. त्याच्या तपशिलात गुंतण्याची आवश्यकता नाही. मार्क्स आणि गांधी यांसारख्या व्यक्ती क्वचितच जन्माला येतात हे मान्य केले, विशिष्ट काळ आणि स्थानिक परिस्थितीच्या संदर्भात त्यांच्या विचारांना सैद्धांतिक मूल्य प्राप्त होते हे खरे असले तरी मानवी समाजाच्या परिवर्तनाचे बाबतीत कोणत्याही एका व्यक्तीचे विचार आणि प्रयत्न मग ती व्यक्ती कितीही मोठी असो — पुरेसे पडत नाहीत हा नवव्या प्रकरणात विशद केलेला मुद्दा विशेष महत्त्वाचा आहे.

ऐतिहासिक अभ्यासपद्धती व विरोधविकास तत्त्वाचे आधारे 'शास्त्रीय समाजवाद' मांडण्यात कार्ल मार्क्स यशस्वी ठरला. श्रम—मूल्याचा सिद्धांत मांडून मूलभूत सत्य त्याने उजेडात आणले; तार्किकदृष्ट्या भावी समाजाच्या वाटचालीचे त्याने अचूक निदान केले तरी सामाजिक जीवन विविध अंगांनी नटलेले आणि परिपूर्ण असल्याने केवळ भौतिक किंवा आर्थिक दृष्टीनें केलेले समाजाचे विश्लेषण एकांगी बनविण्यात पर्यवसान होते. परिणामत: भांडवलशाहीचा अटळ विनाश, शेतकऱ्यांची निष्क्रियता हे निष्कर्ष फोल ठरले. समाजवादी चळवळ भांडवलशाही देशात न होता शेतीप्रधान देशातच प्रबळ बनली. वर्गसंघर्षविरील वर्गविग्रह हा उपाय आततायी ठरला. जड वस्तूचे मानवी मनावर निर्णायक नियंत्रण चालते ही वस्तुनिष्ठता अपुरी ठरली. मार्क्सप्रणीत विचारांमध्ये अनेक उणीवा असूनही औद्योगिक क्रांतीनंतरच्या समाजांचे परिवर्तनप्रक्रियेत समाजवादाला अग्रस्थान प्राप्त झाले, ही मार्क्सप्रणीत तत्त्वज्ञानाची फलश्रुती होय.

म. गांधींनी सैद्धांतिक विवेचनाचा खटाटोप केला नाही. त्यांची कार्यपद्धती वेगळी होती. त्यांच्यामते कृति हाच ज्ञानाचा मार्ग होता. समाज हीच त्यांची प्रयोगशाळा होती. प्रत्यक्ष जीवन जगत असताना अनुभवातून जे सत्य उमगले ते त्यांनी प्रतिपादन केले. त्यांचा भर आत्मिक प्रतिसादावर होता. गांधींच्या विचारसरणीत आध्यात्मिकतेवर अधिकांश भर असल्याने खेड्यांची स्वयंपूर्णता, आधुनिकीकरणाबाबत उदासीनता, मतपरिवर्तन व सत्याग्रहाचा मार्ग इ. बाबी विवाद्य ठरल्या आहेत. जडवस्तूवर मानवी मनाचे नियंत्रण चालते हा गांधीप्रणीत विचार देखील एकांगी स्वरूपाचा राहिला. गांधीप्रणीत विचारसरणीत उणीवा असूनही गरजांबाबत आत्मसंतुष्टता, आर्थिक व राजकीय सत्तेचे विकेंद्रीकरण, अहिंसात्मक मार्ग, व्यक्तीचे स्वातंत्र्य, श्रमाची प्रतिष्ठा इ. विचार मौलिक असून त्यांना सार्वत्रिक मान्यता लाभली आहे. भारतात गांधी-विचारापासून गेल्या तीस वर्षांत झालेल्या फारकतीमुळे निर्माण झालेल्या समस्या सोडविण्यासाठी गांधीवादाचाच आश्रय अलीकडे घ्यावा लागत आहे. स्कॅंडिनेव्हियन देशात (नॉर्वे, स्वीडन, डेन्मार्क इ.) विकेंद्रीकरणाचा अवलंब झाला. तात्पर्य, गांधी-विचारांचे मूल्य त्यांच्या पश्चात् व्यापक स्वरूपात ओळखले जात आहे. अमेरिकेसारख्या संपन्न देशातही केवळ भौतिक संपन्नता मानसिक स्वास्थ्याचा लाभ देण्यास असमर्थ ठरल्याने त्याग, गरजांबाबत आत्मसंतुष्टता हे विचार लोकप्रिय बनले आहेत.

### समन्वयी भूमिका

मार्क्स आणि गांधी यांनी सामाजिक, आर्थिक व राजकीय विचारात बहुमोल भर घातली आहे, मूलभूत सत्याचा शोध घेणाऱ्या या तत्त्वप्रणाल्या जगन्मान्य होत असल्या तरी एकेकश: ही तत्त्वप्रणाली अपूर्ण असल्याने मार्क्सचा वर्गविरहित व राज्यविरहित साम्यवादी आदर्श समाज व गांधींचा सर्वोदयी आदर्श समाज हे केवळ स्वप्नरंजन utopia भासत आहे. अशा स्थितीत आजच्या युगातील समाजांची पुनर्बांधणी अथवा पुनर्रचना

करण्याच्या बाबतीत मार्क्सवादाला अध्यात्मवादाची जोड देऊन व गांधीवादाला अधिक समाजवादी बनवून उभय विचारांचा समन्वय साधला गेल्यास समाजधारणा व समाजाच्या प्रगतीचा मार्ग निर्वेध बनविण्यात यश:सिद्धी लाभेल असा विचार अलीकडे दृढ बनत असून या गोष्टीकडे लेखकाने चित्त वेधले आहे. या दृष्टीने प्रस्तुत ग्रंथाचे प्रयोजन व मूल्य महत्त्वाचे ठरते. जगातील गतिमान अर्थरचनांच्या स्वरूपाबाबत 'समीपतावादी' सिद्धांतवाद्यांतर्फे देखील असाच विचार मांडण्यात येत आहे.

दंडवतेजी नवव्या प्रकरणाच्या अखेरीस म्हणतात, की सामाजिक, आर्थिक व राजकीय चळवळीच्या पुरस्कर्त्यांचा एक मोठा दुर्गुण म्हणजे हे लोक विशिष्ट तत्त्वप्रणालीच्या अमूर्त स्वरूपाच्या तत्त्वनिष्ठेबाबत कमालीचे हळवे असतात; परंतु त्यांच्या मूर्त स्वरूपाच्या अंमलबजावणीच्या उपायांबाबत मात्र नाराज असतात. मार्क्सवादी आणि गांधीवादी विचारांचा पाठपुरावा करणाऱ्या मंडळींनी नेमकी हीच गल्लत केली आहे. आजची वास्तविक गरज आदर्श आणि व्यवहार, अमूर्त आणि मूर्त यांतील अंतर कमी करणे ही आहे.

मार्क्स आणि गांधी यांच्या विचारातील ताठर आणि तात्त्विक भूमिकेला चिकटून न राहता चिकित्सक दृष्टीने त्यांच्या विचारातील आशय चालू काळाला योग्य ठरेल अशा रीतीने कार्यान्वित करणे ही खरी गरज आहे. मार्क्सचा वैज्ञानिक दृष्टिकोन आणि गांधींची कार्यपद्धती, व्यक्तिस्वातंत्र्य आणि तिची प्रतिष्ठा, सत्तेचा किमान वापर या मूल्यांचा समन्वय साधला गेला पाहिजे. उभय विचारांची एकात्मता साधणाऱ्या नव्या प्रेरक शक्तीमधूनच लोकांमध्ये श्रद्धा व आत्मविश्वास निर्माण होऊन आजपर्यंत अपुऱ्या राहिलेल्या इच्छा-आकांक्षांची पूर्तता करणारा आणि माणसाला सन्मानित जीवनाचा लाभ करून देणारा विश्वव्यापी नवा शक्तिमान समाज निर्माण होऊ शकेल.

सामाजिक घटनांचे आजवर प्रदीर्घ वस्तुनिष्ठ विश्लेषण झाले आहे. तथापी व्यक्ती नि समाज यांच्यासंबंधांचे सम्यक ज्ञान अपूर्ण राहिले आहे. मानवसमाजात आदर्शात्मक व्यवस्था (Normative order) आणि माणसांच्या प्रत्यक्ष वर्तनावर आधारलेली वस्तुस्थितिजन्य व्यवस्था (Factual order) यात सामाजिक उत्क्रांतीमध्ये नेहमीच तफावत राहिलेली आहे. या उत्क्रान्तीमध्ये प्रत्यक्ष समाजव्यवस्था आदर्शात्मक व्यवस्थेप्रत अथवा तिच्या नजीक नेण्याचा मानवी समाजांचा सतत प्रयत्न चालू आहे. बुद्धिनिष्ठ म्हणविणाऱ्या मानवांना हे अंतिम उद्दिष्ट साध्य करता आले पाहिजे. मार्क्स आणि गांधी यांच्या विचारांच्या एकात्मतेमधूनच आदर्श समाजाचा मार्ग सुस्पष्ट व मोकळा होत असल्याची मर्मदृष्टी (insight) लाभणे हे महान उद्दिष्ट प्रस्तुत ग्रंथामधून सफल झाले आहे असे मला वाटते.

—प्रा. ए. के. पटवर्धन, देवरुख

---

चित्रपट परीक्षण । सदानंद बोरसे

# दो मुसाफिर

## परमेश्वर मृतात्म्यास (देवेंद्र गोयल) सद्गती देवो !

एखादा दिवस असा येतो –

सुट्टीतही प्रचंड काम करावे लागते, उन्हाळ्यातही पावसाळी हवा पडते किंवा असे काहीही होते आणि आपल्याला दुपारची वामकुक्षी सोडून वा संध्याकाळचे फिरणे सोडून सिनेमाला जाण्याचा मूड येतो. म्हणजे अगदी कोणताही सिनेमा – तीन तास डोळ्यांसमोर काही तरी हलत राहील असा !

तर असा मूड तुम्हाला आला, अगदी चढला, गावातील सर्व सिनेमे 'हाउस फुल' किंवा 'ओव्हर फुल' असले आणि फक्त 'दो मुसाफिर'लाच तिकिटे मिळत असली (ही परिस्थिती केव्हाही असू शकेल) तरीही या चित्रपटाला जाऊ नका! त्याऐवजी 'घटं भिन्द्यात्, पटं छिन्द्यात्' असे उद्योग केले तरी चालतील; पण हा सिनेमा पाहण्याचा उद्योग नको !

हिंदी चित्रपटांमध्ये काही काळ असा आला होता की, सर्व चित्रपटांमधील कपट–कारस्थाने, त्यांची सोडवणूक, नायकाची सत्कृत्ये, प्रेम हे सगळे उद्योग फक्त एका मुंबापुरीतच चालायचे. आता काळ बदललाय. निर्माते अन् दिग्दर्शक शक्यतो मुंबईपासून लांब पळत आहेत. आधीच्या गर्दीचा अन् धावपळीचा परिणाम असावा बहुतेक. कारण फाँदी म्हणू नका, बंसी म्हणू नका (काही तरी उलटापालट होते आहे का ? मला वाटते, फाँसी आणि बंदी असावे.), गंगा की सौगंध म्हणू नका – एक जण गंगा–यमुनेच्या खोऱ्यात पळतोय, तर एक जण म्हैसूरच्या राजवाड्यात आसरा घेतोय. दो मुसाफिरांनी एकदम केरळातच उडी मारली आहे.

कैलाशनाथ (अशोककुमार) केरळमधील एका शहरातील बडा विधुर उद्योगपती. त्याचा एकुलता एक मुलगा विकी एकदा फिशिंगच्या वेळेस समुद्रात पडतो. तो शंभू (प्राण) नावाच्या कोळयाला सापडतो. शंभू त्याला वाढवितो आणि मग त्याची मोठेपणी कैलाशनाथशी भेट होते. (पुत्रभेटीचा घडे महोत्सव, परि तो उभया नच माहिती' असे तर ठायी ठायी घडते.) मध्यंतरीच्या काळात विकी (हे कैलाशनाथने ठेवलेले नाव) उर्फ राजू (हे शं. ठे. ना.) म्हणजे शशीकपूर बिजली (रेखा) नावाच्या कंचुकीधारी विकच्छ केरळी कन्यकेशी जुळवून टाकतात. (केरळमधील एवढ्याच एका प्रकाराचा चित्रपटभर दिग्दर्शकसाहेबांनी मनसोक्त वापर करून घेतला आहे.) याच्या जोडीला अविनाश (प्रेम चोप्रा) नामक गुंडाचे कारस्थान उधळणे, मुरारी (जगदीप), बेला (मीना टी) यांचे शुभमंगल जुळविणे अशा किरकोळ कामगिऱ्याही उरकल्या जातात. (सगळ्या नावांवर जर नजर टाकली तर केरळमधील वायलार अथवा मुन्नीकृष्णन् जोरदाररीत्या हिंदीच्या प्रचाराला लागले आहेत, याची प्रत्ययकारी अनुभूती मिळेल.)

अशी ही अनेक चित्रपटांमधून पाहिलेली

आणि माहीत असलेली कथा पुन्हा एकदा सांगून कथालेखक मुश्ताक जलीलींनी आणि पुन्हा एकदा दाखवून दिग्दर्शक देवेंद्र गोयल यांनी ( परमेश्वर मृतात्म्यास सद्‌गती देवो ! ही शक्यता परमेश्वराने हा चित्रपट पाहिला नाही तरच. ) प्रेक्षकांना पुन:प्रत्ययाचा अद्‌भुत आनंद दिला आहे.

नारळ तोडताना वर्षे उलटली जाऊन मोठा होणारा राजू, राजूची पाळलेली आई ( म्हणजे मला म्हणायचंय की, जिने राजूला पाळले– आपलं– सांभाळले, ती ) मरते तेव्हा विझणारा लामणदिवा, राजूला वारंवार पडणारे बालपणीच्या प्रसंगाचे स्वप्न, अनेक प्रसंगांतून मोठ्या राजूच्या वागण्यातून कैलाशनाथांना होणारी छोट्या राजूची आठवण असे किती किती प्रसंग सांगावेत ? प्रत्येकातून गोयलसाहेबांची शिळी प्रतिभा नुसती उतू जाते.

चित्रपटातील अशोककुमार व प्राण सोडून बाकी अभिनेत्यांचे तर मला अतिशय कौतुक वाटले. त्या दोघांनी काय, त्यांना दिलेले काम सराईतपणे निभावून नेले; पण इतरांनी स्वत:चे काम करून बाकी दिग्दर्शकाने न सांगितलेल्या जबाबदाऱ्याही उचलल्या, ‘ प्रसंगी माझ्या स्वत:च्या भूमिकेकडे दुर्लक्ष झाले तरी चालेल ’ अशा जिद्दीने उचलल्या.

शशीकपूरचे उदाहरण घ्या– म्हणजे हा चित्रपटातील नुकताच मॅट्रिक झालेला राजू, आता आहे त्याचे खरेखुरे वय चाळिशीच्या घरात, त्याला तो तरी काय करणार ? पण प्रौढ–साक्षरता वर्गातून बाहेर पडलेला ‘ बाप आणि मुलगा एकदम मॅट्रिक पास ’च्या यादीतील बाप न दिसण्याची आणि न वाटू देण्याची त्याची केवढी धडपड चाललेली. वाढलेले केस उडविणे काय, सुरकुतलेल्या चेहऱ्याने हसणे काय, नायिकेला मिठ्या मारणे काय अन् उड्या मारून धावपळ, मारामारी करणे काय– छे, सारेच कौतुकास्पद ! एवढ्या वयात एवढी जवानीची ओढ म्हणजे मनाने जवानच की हो !

तीच गोष्ट प्रेम चोप्राची. आपले खलनायकी काम करायचे, शिवाय ते जडजड उर्दूतील संवाद बोलून विनोदांचाही आधारस्तंभ बनायचे म्हणजे केवढी कसरत! (त्यातून केरळमध्ये फैलावलेले राष्ट्रभाषा प्रचार समित्यांच्या कार्याचेही पुन्हा दर्शन घडले. उर्दूप्रधान हिंदी म्हणजे समिती–ए–वर्धा असावी. ) तर अशा कामाला एकच काय दोन–पाच प्रेम चोप्राही खरे तर अपुरे पडायचे; पण आमचा प्रेम मुळातच अभ्यासू आणि कष्टाळू म्हणून तर त्याने ही दुहेरी जबाबदारी पेलली.

मग राहता राहिला जगदीप. तो तरी या दोघांच्या मागे का राहील ? ‘ चित्रपटाचा विनोद गेला जहन्नुममध्ये ! ( खरे तर हिंदी चित्रपटामधील विनोद जन्मापासून तेथेच आहे. ) आपण प्रेक्षकाला चित्रपट संपायच्या आत ॲनासिन वा ॲस्प्रोची गरज भासेल, असे काही तरी करू ’ असाच विचार त्याने केला असावा.

आता अभिनेत्यांची एवढी मजबूत फळी बांधल्यानंतर रेखा तरी उणी कशी पडणार ? तिने चित्रपटातील बाकी केरळी मुलींशी ‘ पाहू, कोण कमी कपडे घालते ? ’ची स्पर्धा लावली.

या सगळ्या उचापतीत शेट्टीसुद्धा मागे राहिला नाही. स्वत:च्या बलदंड शरीराचा आणि उग्र व्यक्तिमत्त्वाचा काही विचार न करता खुशाल त्याने फाटक्या शशी कपूरकडून आणि प्राणकडून मार खाऊन घ्यावा ? एक नारळाचे झाड छातीवर आडवे पाडून घ्यावे ? कशासाठी ? तर ‘ मूर्ती लहान पण बळ महान ’ हे नायकाच्या बाबतीत पटावे म्हणून.

असा सगळ्या अभिनेत्यांनी चित्रपटाला शेवटपर्यंत खांदा दिला आहे.

दिग्दर्शक देवेंद्र गोयल यांच्याबद्दल बोलायचे म्हणजे प. मृ. स. दे, (मृताबद्दल वाईट बोलणे इष्ट नव्हे, योग्य नव्हे. शिवाय साजून कुठे दिसते ते ? )

गीतकार अिंदिवर आणि एन्. के. हशमत यांनी पुन्हा एकदा ‘ गर्जो जयजयकार, हिंदी का गर्जो जयजयकार । ’ अशा थाटात गीते लिहून कोळ्याच्या पोरा–पोरींना ‘ प्यार से वंचित अिनके प्याले, भर दो अुनमें प्रेम का अमृत ’ असे अवघड प्रेम करायला लावले आहे

संगीतकार कल्याणजी–आनंदजी एवढा उल्लेख पुरे.

केरळ हा प्रदेश निसर्गसौंदर्याबद्दल प्रख्यात आहे, अशी एक भाबडी समजूत होती. तिचे भाबडेपण छायाचित्रकार केकी मिस्त्रींनी माझ्या निदर्शनास आणून दिल्याबद्दल मी त्यांचा अत्यंत आभारी आहे.

असा हा ‘ दो मुसाफिर ’ पूर्ण झाल्यानंतर तो परत पाहत असताना आपली ती भव्य–दिव्य कामगिरी पाहून त्या भव्यतेच्या–दिव्यतेच्या दडपणामुळे देवेंद्र गोयल गेले म्हणतात.

(प. मृ. स. दे ) □


NEW TITLES RECEIVED

| | | Rs. |
|---|---|---|
| 1 ) | The Black Cloud – ( Bestseller–Science Fiction )– Fred Hoyle | 00–65 |
| 2 ) | Passages – ( Bestseller–How everybody is affected by crises at different ages. Even males have menopauses ! ) Gail Sheehy. | 28–90 |
| 3 ) | Edgar Cayce – ( *The Sleeping Prophet* ) – The prophet predicts the resarrection of Atlantis ) Jess Stearn | 28–90 |
| 4 ) | Eternal Man – ( Occult–theories of civilizations other than ours ) Louis Pauwels & Jacques Bergier | 12–45 |
| 5 ) | The Users – ( Bestseller–Novel ) – Joyce Haber | 21–80 |
| 6 ) | Netaji Dead Or Alive ? – ( Is Subhashchandra. Bose alive ? )– Samar Guha | 40–00 |

मराठी

| | | |
|---|---|---|
| १ ) | सर्वोत्कृष्ट मराठी कथा – भाग २ रा – संपादक राम कोलारकर | ३५–०० |
| २ ) | सॉलिड वांधें – ( सामाजिक कादंबरी ) – राजा राजवाडे | १८–०० |
| ३ ) | महापौर – ( राजकीय व शृंगारिक कादंबरी ) – द्वारकानाथ लेले | १२–०० |

- पुस्तकांच्या किमती फार भडकल्या आहेत ! पुस्तके विकत घेण्यापेक्षा एखाद्या चांगल्या वाचनालयाचे सभासद व्हा व पैसे वाचवा ! !
- ‘ फिनिक्स ’ एक आगळे, एक वेगळे वाचनालय ! ! !

THE PHOENIX LIBRARY

727, Opp. Sadashiv Post, Pune–411 030

## अवती-भवती : पृष्ठ ३ वरून

ना ! असे म्हणून– जवळच्या परिसरामध्ये नेताजी म्हणून ओळखले जाणारे राजनारायणजी भोवतालच्या गर्दीत मिसळून गेले.

विक्षिप्तपणा, हेतुतः केलेला आडमुठेपणा आणि सभागृहात आणि सभागृहाबाहेर केलेली प्रक्षोभक भाषणे यामुळे राजनारायण यांना सतत प्रसिद्धी मिळत गेली. त्यांच्या विक्षिप्त वागणुकीमुळे ते कशी भल्याभल्यांची गाळण उडवून देतात याचा एक सुंदर नमुना देण्यासारखा आहे. जयप्रकाश नारायण यांचे आंदोलन सुरू झाल्यावर त्यांना बिहारमध्ये येण्यास बंदी घालण्यात आली. आपल्यावर बिहारमध्ये प्रवेश करण्याची बंदी आहे हे माहिती असूनही ते हेतुतः बिहारमध्ये येऊन दाखल झाले. स्टेशनवर उतरताच त्यांनी आजुबाजूला पाहिले. पोलिसखात्याचे बरेच अधिकारी रेल्वेप्लॅटफॉर्म धुंडाळीत आहेत हे पाहून त्यांना बरे वाटले; परंतु तरीही आपण त्यांच्या अस्तित्वाची काहीही दखल घेतलेली नाही असा आभास निर्माण करून ते त्वरेने स्टेशनबाहेर जाऊ लागले. राजनारायणजी बाहेर जात आहेत हे लक्षात येताच एक पोलिसअधिकारी तत्परतेने पुढे आला आणि नम्रतेने म्हणाला– 'साहेब, आपल्याला येथे उतरता येणार नाही. कारण बिहारमध्ये प्रवेश करण्याची बंदी आपल्यावर बजावण्यात आली आहे ! त्या अधिकाऱ्याकडे पहात ते म्हणाले– 'तसा लेखी हुकुम आहे ?' आता राजनारायण बिहारमध्ये केव्हा आणि कोठे येणार हे निश्चित माहीत नसताना हुकुम काढणार कसा ? आणि हुकुम काढला तरी तो ठेवणार कोणाजवळ ? ज्या वेळी त्यांनी लेखी हुकमाची मागणी केली त्याच वेळी त्यांना माहीत होते की या अधिकाऱ्याजवळ कोणताही लेखी हुकुम असणेच शक्य नाही आणि म्हणूनच त्यांनी पुन्हा ठासून विचारले, लेखी हुकूम आहे काय ? अधिकाऱ्याची चांगलीच तारांबळ उडाली–त्याला धड काही बोलणेही सुचेना. तो काहीच बोलत नाही हे लक्षात येताच राजनारायणजींनी त्याला बाजूला सारले आणि मोठ्या रुबाबात ते स्टेशन बाहेर पडले ! अर्थात त्यांना तसे सुखरूप जाऊ देणे पोलिसअधिकाऱ्यांनाही परवडण्यासारखे नव्हतेच. त्यांच्यापाठी काही माणसे लावून देण्यात आली आणि थोड्याच वेळात पोलिसअधिकारीही राजनारायण जेथे उतरले होते त्या भोला प्रसाद सिंग यांच्याकडे येऊन दाखल झाले. या वेळी अर्थातच बरोबर लेखी हुकुम आणण्याची खबरदारी त्यांनी घेतली होती. अर्थात होती असलेला हा हुकूम राजनारायण यांच्यावर बजावणे हे काही तितके सोपे काम नव्हते. आलेल्या पोलिसअधिकाऱ्यांना बाहेर बसवून ठेवण्यात आले. आत जाऊन राजानारायण यांच्यावर हुकुम बजावण्याचे धैर्य त्यांनी दाखविले नाही आणि बाहेर पोलिसअधिकारी बसले आहेत याची जराही दखल राजनारायण यांनी घेतली नाही. आतल्या खोलीत ते निवांतपणे गप्पा छाटीत बसले होते. अखेरीस मध्यरात्र उलटल्यावर ते बाहेरच्या बैठकीच्या खोलीत आले. तेथे पोलिसअधिकारी हजरच होते. त्यांच्याकडे एक भेदक नजर टाकून ते म्हणाले, कुठे आहे तो हुकूम ? त्यांनी हुकुमावरून नजर फिरविली आणि पोलिसअधिकाऱ्यांसमावेत आलेल्या मॅजिस्ट्रेटच्या अंगावर तो हुकुम भिरकावून देत ते म्हणाले–'या हुकुमाचा आता काहीही उपयोग नाही !' पोलिसअधिकाऱ्याने नम्रपणे विचारले, 'असे का बरं म्हणता साहेब ?' त्यावर राजानायण म्हणाले,–'या हुकमामध्ये मला बिहारमध्ये प्रवेश करून देऊ नये असे म्हटले आहे आणि मी तर चांगला भरपूर आतमध्ये येऊन निवांतपणे बसलो आहे, आता बिहारमध्ये प्रवेश करू नये असा हुकूम तुम्ही माझ्यावर बजावणारच कसा ?' कितीही झालं तरी राजनारायण बनारस हिन्दु विद्यापीठाचे वकील होते ना ! वकिली कीस काढण्यात ते थोडेच हार जाणार? त्यांनी पुन्हा एकदा ठणकावून सांगितले की हा तुमचा हुकुम अगदीच निकामी आहे ! आपण म्हणतो तो अखेरचा शब्द असे समजून राजनारायणजी पुन्हा आतमध्ये निघून गेले. पोलिसअधिकारी अस्वस्थपणे बाहेरच बसून होते. शांतपणे आपली सारी कामे उरकून राजनारायणजी पुन्हा बाहेर आले. बघू तो हुकमाचा कागद असे त्यांनी म्हणताच पोलिसअधिकाऱ्याने तो कागद पुन्हा त्यांच्या हाती दिला. पुन्हा एकदा हुकुम वाचून राजनारायण म्हणाले,-अरेच्या, यात आणखी एक गोम आहे, 'अहो, हा हुकुम माझ्यासाठी नाहीच आहे !' आता त्यांचे हे नवीन भाष्य ऐकून पोलिसअधिकारी अक्षरशः गांगरून गेले. आपल्या नवीन मुद्द्याचा खुलासा करताना राजनारायण म्हणाले, 'हुकमामध्ये वाराणसी येथील राजनारायण असे म्हटले आहे. वाराणसीमध्ये शेपन्नास राजानारायण आहेत. हा हुकूम माझ्याचसाठी आहे हे तुम्ही कसे सिद्ध करू शकाल ?' मॅजिस्ट्रेटने मध्येच खुलासा केला की 'साहेब, हा हुकुम केवळ आपल्यासाठीच आहे. त्याच्या नरम सुरावर आपला चढा सूर चढवून राजनारायण म्हणाले, 'कोण म्हणतो हा हुकूम माझ्यासाठी आहे ? मी काही वाराणसीचा राजनारायण नाही. मी संसदसदस्य राजनारायण आहे !' गोंधळलेल्या पोलिसअधिकाऱ्याने पुन्हा एकदा हुकुम नजरेखालून घातला आणि तोही गोंधळला. दरम्यान तेथे उपस्थित असलेल्या पत्रकाराने मध्येच भाष्य केले–तो हसत हसत म्हणाला, 'बिहारमधील पोलिसअधिकाऱ्यांना केवळ एकच राजनारायण माहीत आहेत !' मग राजनारायण यांनी हुज्जत थांबविली आणि फोन करण्यास प्रारंभ केला. प्रथम राजभवनचा नंबर फिरविला. आता रात्री १॥-२ वाजता राजभवनवर कोण फोन उचलणार ? पण राजनारायणजींनी शेरा मारलाच इंदिरा के गुलाम भी वैसे ही हैं ! अच्छा अब चीफ मिनिस्टर को फोन लगाव ! मुख्यमंत्री गफूर जागे होते–आणि तत्परतेने फोनवरही आले. थोडा वेळ मुख्यमंत्र्यांशी हुज्जत घातल्यावर राजनारायण म्हणाले. '१९६७ मध्ये के. बी. सहाय यांनी मला बिहार बंद केला आणि लवकरच त्यांचे मुख्यमंत्रिपद गेले. तुम्हीही त्याच मार्गाने जाणार अशी लक्षणे दिसत आहेत. अब्दुल गफूर शांतपणे म्हणाले, 'प्रत्येकाला एक दिवस जायचेच आहे !!' राजनारायण यांनी लगेच प्रतिजबाब दिला, 'जायचे तर आहेच; पण केव्हा आणि कसे हा खरा प्रश्न आहे !' असे म्हणून त्यांनी फोन खाली ठेवला. दोन–अडीच तास गोंधळ झाला होता; पण गोंधळ असूनही वातावरणात तणाव नव्हता. साराच प्रकार कसा–चुरचुरीत व सोपा होता. राजनारायण यांना एकच गोष्ट हवी होती.–त्यांच्या दृष्टीने या साऱ्या प्रकाराला पुरेपूर प्रसिद्धी मिळणे जरूर होते आणि झालेही तसेच ! बिहारमधून त्यांना हद्दपार तर करण्यात आले खरे; पण बिहारमध्ये राहून त्यांनी जे साधले असते त्यापेक्षा किती तरी जास्त त्यांनी बिहारमधून हकालपट्टी होऊन मिळविले. कोणत्याही गोष्टीचा तमाशा करायची त्यांची ही सवय त्यांना नियमित आणि भरपूर प्रसिद्धी देऊन गेली ! एखादी गोष्ट मनात घेतली की ती नेटाने करण्याकडे त्यांचा कल आहे. आरोग्यखाते त्यांनी घेतले आणि कुटुंबनियोजन हा शब्द त्यांना खटकला. त्यांनी तातडीने कुटुंबनियोजन हा शब्द काढून कुटुंबकल्याण या शब्दाची योजना केली !

राजनारायणजींची राजकीय वाटचालही मोठी मजेशीर आहे. काही निश्चित निष्ठा अथवा विचार जसा त्यांच्याजवळ नाही त्याचप्रमाणे स्वतः नेतृत्व करण्याची कुवतही त्यांच्याजवळ नाही. एखाद्या सेवकाप्रमाणे त्यांनी सतत कोणाचा ना कोणाचा अनुनय केलेला दिसतो. हनुमान आणि लक्ष्मण हे त्यांचे आदर्श नेमके याच पठडीतले असल्याचे दिसते. काही मंडळी जन्मजात राजकारणी असतात, काही राजकारणी होतात, तर काहींवर राजकारण लादले जाते. राजनारायण हे यापैकी तिसऱ्या गटात मोडतात. कुस्तीचा आखाडा हे त्यांचे खरे आवडीचे क्षेत्र. आजही ते मोठ्या अभिमानाने सांगतात की, मेहनत त्यांनी चालू ठेवली असती तर आज ते एक नामांकित

कुस्तिगीर म्हणूनच ओळखले गेले असते. राजकारणात आल्यावरही त्यांनी ही आखाड्याची नशा कधी सोडली नाही. त्यांनी काहीही हाती घेतले तरी अखेर त्याचा आखाडा करून सोडला. शेतकरी आंदोलन असो, मजूर आंदोलन असो– त्यांचे डावपेच– कुस्ती-प्रमाणेच रानगट राहिले.

१९३० च्या सुमारास कम्युनिस्टांचे प्राबल्य वाढू लागल्याने कॉंग्रेसवाले एखादा दणकट तरुण मिळतो काय याचा शोध घेत होते आणि हा बनारसचा मल्ल त्यांच्या हाती लागला. त्याला बळेच राजकारणात घेऊन, लोकांसमोर जाण्याची संधी त्याला देण्यात आली. पुढे लोहियांना प्रमाण मानून त्यांनी समाजवाद्यांबरोबर चार पावले टाकली. लोहिया असतानाच आतून सी. बी. गुप्तांशी सख्य जमविले. या गुप्तांनीच त्यांचा इंदिरेविरुद्ध चाललेला खटला आर्थिक बाजूने लढविला. गुप्ताजींच्या आग्रहाखातरच शांतिभूषण या खटल्यात त्यांच्या बाजूने उभे राहिले. आज राजनारायणजी चरणसिंग म्हणजे सारसर्वस्व मानतात; पण त्यांची ही गट्टी ७४ सालापासूनची आहे. एक दिवस अचानक राजनारायण यांनी चरणसिंग यांना फोन केला. काल-परवापर्यंत सी. बी. गुप्ता यांच्या पायाशी नम्र सेवकाप्रमाणे बसणारा हा माणूस आज आपल्याला फोन का करतो आहे हे काही प्रथम चरणसिंग यांच्या लक्षात येईना; हेही कोडे लवकरच उलगडले १९७४ च्या राज्यसभेच्या द्वैवार्षिक निवडणुका तोंडावर आल्या होत्या. राज्यसभेच्या या निवडणुकीसाठी राजनारायण उमेदवार म्हणून उभे होते आणि निवडून येण्यासाठी त्यांना चरणसिंगच्या सहाय्याची गरज होती. खासदारकीच्या मोबदल्यात राजनारायण जर पदरी येऊन बसणार असतील तर चरणसिंगांनाही ते हवे होते. भारतीय लोकदलाने राजनारायण यांना पाठिंबा दिला आणि राजनारायण पुन्हा राज्यसभेत जाऊन बसले चरणसिंग यांच्या दृष्टीने के. के. बिर्ला यांचा पराभव होणे महत्त्वाचे होते. कारण बिर्ला यांचा पराभव म्हणजे इंदिराजींना तडाखा होता. हा सारा विचार करून चौधरी चरणसिंग यांनी राजनारायण यांना पाठिंबा दिला आणि राजनारायण अजूनपर्यंत तरी चौधरीसाहेबांशी एकनिष्ठ आहेत.

राजनारायण तोंडाने समाजवादाच्या कितीही गप्पा मारीत असले तरी त्यांची रहाणी ज्यांनी जवळून पाहिली आहे त्यांना राजनारायणजींचा अवाढव्य खर्च चालतो तरी कसा याचे आश्चर्य वाटल्यावाचून रहाणार नाही. आमदारकी-खासदारकी असलेल्या जमान्यात त्यांचा खर्च महिना सहजी दहा हजार रुपयांपर्यंत असे. ते ज्या मोटारीतून फिरत असत ती मोटार गुप्ताजींनी दिलेली होती. खेरीज जनमुखसाठी काही रक्कम गुप्ताजी नियमितपणे देत असत. जनमुख हे पत्र राजनारायण चालवीत असत. याखेरीज अन्य मार्गांनीही पैसा त्यांच्याकडे येत राही. आमदार-निवासामध्ये त्यांच्या सेवेला– एक पगारी आचारी, काही नोकर, अंगाला मालिश करणारे सेवक, पत्रांचा हिन्दी तर्जुमा लिहिणारा लेखनिक आणि हिन्दी–इंग्रजी पत्रलेखक एवढा जामानिमा असे. महिन्यातून पाच-दहा तरी विमान-फेऱ्या सहजी होत असत. दरमहा तीनशे ते चारशे लिटर पेट्रोल खर्ची पडत असे आणि टेलिफोनचे बिल, ते तर विचारूच नका! टेलिफोन वापरण्याचा त्यांना छंदच आहे म्हणा ना! स्थानिक फोन तर मोजायचेच नाहीत आणि ट्रंक कॉलची संख्याही पन्नासच्या घरात सहज असते. आज हेच राजनारायणजी केंद्रामध्ये आरोग्यमंत्री आहेत. तात्पर्य काय– पक्ष कोणताही असो राजकारण हे असेच चारही अंगांनी बरबटलेले असते हो! □

## □ खुशवंतसिंग... आणि विकली

खुशवंतसिंग आणि टाइम्स ऑफ इंडिया गटाचे प्रचंड खपाचे पत्र इलस्ट्रेटेड विकली यांची जोडी कशी छान जमली होती. खुशवंतसिंग यांची ख्याती अशी की वर्षा-दोन वर्षांपेक्षा ते कधी एका जागी स्थिरावल नाहीत. मग नोकरी भले युनेस्कोची का असेना; पण ते विकलीचे संपादक म्हणून आले त्या वेळी मात्र हा पायंडा मोडला गेला. जून १९६९ मध्ये ते विकलीचे संपादक म्हणून रुजू झाले. ते ज्या वेळी संपादक म्हणून आले त्या वेळी या साप्ताहिकाचा खप सत्तरएक हजाराच्या घरात होता. तथापी या चतुरस्र संपादकाने या साप्ताहिकाला असे काही तेज प्राप्त करून दिले की, एका वेळी त्याचा खप चार लाख दहा हजाराच्या घरात होता आणि खुशवंतसिंग असेही सांगतात की, जर मला व्यवस्थापनाने परवानगी दिली असती तर खपाचा हा आकडा मी पाच लाखांच्या घरात नेऊन ठेवला असता! खुशवंतसिंग–विकली–वाचक असे गुफ्तगू गेली आठ-नऊ वर्षे कसे छान जमले होते. खुशवंतसिंग विकलीमध्ये आले ते व्यवस्थापनाशी करारनामा करून. विकली त्यांनी वाढविले आणि विकली हे आपले साप्ताहिक आहे असे आजही ते अभिमानाने सांगतात. जोपर्यंत व्यवस्थापनाचे आणि त्यांचे व्यवस्थित जमले होते, तोपर्यंत करारनामा ही आडकाठी नव्हती. वेळोवेळी मुदतवाढ देण्यात आली आणि खुशवंतसिंगही मोठ्या खुशीने विकलीचा कारभार सांभाळीत राहिले. विकलीचा वापर करून खुशवंतसिंग यांनी ज्या पद्धतीने इंदिरा व संजय गांधी यांचा पाठपुरावा केला आणि इंदिराजी सत्ताभ्रष्ट झाल्या आणि संजय पराभूत झाल्यावरही त्यांनी आपले हेच धोरण पुढे रेटले, त्या वेळी व्यवस्थापनाला नाराजी वाटणे स्वाभाविक होते आणि ही नाराजी खुशवंतसिंग यांना कळविण्यात आली. तथापी व्यवस्थापन तडकाफडकी खुशवंतसिंग यांच्यासारख्या यशस्वी संपादकाला सोडण्यास तयार नव्हते आणि विकली सोडण्याची तर खुशवंतसिंग यांची मुळीच इच्छा नव्हती. आपली भूमिका स्पष्ट करताना ते म्हणतात – एक संपादकीय सोडले तर माझी मते लादण्यासाठी मी साप्ताहिक कधीच राबविले नाही. विकलीमध्ये राष्ट्रीय स्वयंसेवक संघापासून ते थेट मार्क्सवादी कम्युनिस्टांपर्यंत सर्वांना जागा होती. विकली हे विचारांचे व्यासपीठ बनले होते. माझ्या राजकीय मतांबद्दल म्हणाल तर मला स्वतंत्र पक्षाबद्दल विशेष प्रेम! आता हा सारा पक्षच चुकीच्या दोस्तांच्या कोंडाळ्यात सापडला आहे ते सोडा! खुशवंतसिंग काहीही म्हणत असले तरी संपादकत्वाखाली प्रसिद्ध होत असलेल्या विकलीने इंदिरा–संजयचा वाजवीपेक्षा जास्त उदो-उदो केला हे नाकारता येणार नाही. बांगलादेश युद्धानंतर त्यांनी इंदिराजींची मुलाखत घेतली त्या वेळेपासून त्यांनी इंदिरेचा पुरस्कार सुरू केला आणि त्यांच्याबाबतीत विशेष म्हणायचा असला तर तो इतकाच की, इंदिराजी पराभूत झाल्यावर त्यांच्या पुरस्कर्त्यांनी त्यांच्याकडे पाठ फिरविली. खुशवंतसिंग मात्र आपल्या जागी घट्ट उभे राहिले. तर असे हे खुशवंतसिंग आता विकली सोडून जाणार आहेत. यामागे काही राजकीय दडपण आहे का? व्यवस्थापन आपल्यावर दडपण असल्याचे म्हणते; परंतु हे दडपण कोणाचे व कशा प्रकारचे हे मात्र सांगत नाही. हे मोठे विचित्र वाटते. इंदिरा गांधींच्या जमान्यात जर बिर्ला श्री. वर्गिस यांच्यासारख्या संपादकांना सक्तीची निवृत्ती देऊ शकतात, तर आज तितक्याच उच्चपदस्थांचे दडपण आले तर खुशवंतसिंगाची खुर्ची जाणार नाही का? हा तर अनुत्तरित असा प्रश्न आहे खुशवंतसिंग गेले तरी व्यवस्थापनाचे अथवा विकलीचे अडणार नाही, तसेच खुशवंतसिंग यांच्यासारख्या कर्तबगार माणसाचेही अडणार नाही. आजच बिर्लांनी त्यांना दिल्लीहून नवीन मासिक काढण्यासाठी बोलाविले आहे. इंदिराजींचे नियंत्रण असलेल्या नॅशनल हेरॉल्डसह अन्य काही ठिकाणची आमंत्रणेही त्यांच्याकडे पडून आहेत. खुशवंतसिंग यांच्या अनुपस्थितीची हुरहूर लागलीच तर ती फक्त वाचकालाच लागणार आहे! □

## अनेकांचे धन येथे, एके ठायी आले
## अनेकांच्या सेवेसाठी, येथे आतुर थांबले

आपल्यापैकीच काहींनी बचत केली, करत आहेत आणि करतीलही. तोच पैसा संचित झाला आहे आणि योग्य तो विनियोग व्हावा यासाठी, खरं तर हा पैसा देखील आतुर आहे. 'विलोपले मधु मीलनात या' म्हणणाऱ्या नवयुवतीप्रमाणे ––

स्वतःच्या आणि समाजाच्या प्रगतीसाठी आपण त्याचा उपयोग करून घ्यावा हीच अपेक्षा आहे. तुम्ही कॉलेजच्या बाहेर पडलेले उमेदीचे पदवीधर असा, किंवा विणकामाचा व्यवसाय सुरू करण्यास उत्सुक असा, वाकबगार चर्मकार असा.... तुमच्या उमेदीला पैशांची साथ द्यावयाला आम्ही आतुर आहोत.

# बँक ऑफ महाराष्ट्र

( भारत सरकारचा उपक्रम )

मुख्य कचेरी : ११७७, बुधवार पेठ,
पुणे ४११ ००२